# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार ९ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०







## अमेझॉनवरून खरेदी केली होती स्फोटके

### पुलवामा हल्ल्याबाबत मोठा खुलासा




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाला हादरवून सोडणा-या पुलवामा हल्ल्याबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. जम्मू-काश्मीरमधील पुलवामा दहशतवादी हल्ला आणि गोरखनाथ मंदिराच्या सुरक्षा कर्मचा-यांवरील हल्ल्याबाबत एफएटीएफचा एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे. पुलवामा हल्ल्यासाठी स्फोटके अमेझॉनवरून खरेदी करण्यात आली होती तर पेपालद्वारे पैसे दिले गेले होते अशी माहिती समोर आली आहे. या अहवालात दहशतवादी ऑनलाइन शॉपिंग वेबसाइट्स आणि डिजिटल मनी ट्रान्सफरचा वापर करत असल्याचे सांगण्यात आले आहे. जगात दहशतवाद्यांना पुरवण्यात येणा-या निधीवर लक्ष ठेवणारी संस्था फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सच्या नवीन अहवालात हा मोठा खुलासा झाला आहे. अहवालानुसार, दहशतवादी संघटना आता शस्त्रे खरेदी करण्यासाठी आणि निधी मिळवण्यासाठी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन पेमेंट सेवांचा वापर करत आहेत. अशातच जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. भारतातील २०१९ मधील पुलवामा हल्ला आणि (पान २ वर)

## विमानाच्या इंजिनमध्ये अडकून एका व्यक्तीचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मंगळवारी सकाळी इटलीच्या मिलान बर्गामो विमानतळावर एक भीषण अपघात घडला. व्होलोटेआ विमान उड्डाणाच्या तयारीत असताना, इंजिनमध्ये अडकून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. हा व्यक्ती स्पेनमधील अस्टुरियासला जाणा-या एअरबस ए३१९ व्होलोटेआ विमानाच्या दिशेने धावत गेल्याचे वृत्त आहे. सकाळी १०:२० वाजता घडलेल्या या घटनेनंतर विमानतळावरील वाहतूक काही काळासाठी थांबवण्यात आली होती. या अपघातानंतर स्थानिक वेळेनुसार १०:२० ते १२:०० दरम्यान विमान वाहतूक स्थगित करण्यात आली होती, असे वृत्तसंस्था रायटर्सने बर्गामो विमानतळाच्या निवेदनाचा हवाला देत दिले आहे. विमानतळाचे व्यवस्थापन पाहणा-या कंपनी सॅकबोने एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, दुपारी हवाई वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली. हा अपघात झाल्यानंतर विमानतळावर येणारी आणि विमानतळावरून जाणारी सर्व उड्डाणे सकाळी १०:२० वाजता स्थगित करण्यात आली होती, असे इटालियन वृत्तसंस्था द लोकलने आपल्या वृत्तात म्हटले आहे.



## व्यावसायिकानेच दिली होती सुपारी

### गोपाल खेमका हत्याकांडात मोठा गौप्यस्फोट

**पाटणा//वृत्तसंस्था :** बिहारची राजधानी पाटणा येथील गोपाल खेमका या प्रसिद्ध व्यावसायिकाची घरासमोरच गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याने राज्यात खळबळ उडाली होती. दरम्यान, या हत्याकांडाचा तपास करून आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आलं आहे. तसेच पोलिसांनी केलेल्या तपासामधून काही धक्कादायक माहितीही समोर आली आहे. गोपाल खेमका यांच्या हत्येमागचा मुख्य सूत्रधार अशोक साव आहे, त्यानेच त्यांच्या हत्येची सुपारी दिली होती अशी माहिती पाटण्याचे एसएसपी कार्तिकेय शर्मा यांनी दिली आहे. अशोक साव हा याआधीही अनेक गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी राहिलेला आहे. या प्रकरणी मुख्य शूटर उमेश यादवसह इतर सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. अशोक साव आणि गोपाल खेमका यांच्यामध्ये मालमत्तेवरून वाद सुरू होता. दोघांचेही व्यावसायिक हितसंबंध एकमेकांच्या आड येत होते. तसेच कोट्यवधीच्या जमिनीवरून ब-याच काळापासून मतभेद सुरू होते. हाच वाद संपुष्टात आणण्यासाठी अशोक साव याने गोपाल खेमका (पान २ वर)



## रेल्वेच्या '70 रूपयांत जेवणा'ची निव्वळ चर्चाच

**नागपूर :** रेल्वे स्थानकावर ७० रुपयांत पोटभर जेवण मिळेल, अशी बातमी रेल्वेच्या एक्सवर झळकल्याने प्रवासी खूश झाले होते. प्रत्यक्षात मात्र रेल्वे स्थानकावर, ट्रेनमध्ये त्याची सुरूवातच झाली नसल्याने आणि ती कधी होणार, हे देखिल स्पष्ट नसल्याने प्रवासी सध्या ढूंढते रह जाओंगेचा अनुभव घेत आहेत. भारताची लोकवाहिनी मानल्या जाणा-या रेल्वेत रोज कोट्यवधी नागरिक प्रवास करतात. त्यातील ८० ते ९० टक्के प्रवासी घरून जेवण सोबत घेत नाहीत. रेल्वे गाडी अथवा रेल्वे स्थानकावर मिळेल ते खाउन ही मंडळी प्रवास करतात. ते लक्षात घेता भारतीय रेल्वे कॅटरिंग आणि टूरिजम कार्पोरेशन (आयआरसीटीसी) तर्फे रेल्वे स्टेशनवर ७० रुपयांत आणि ट्रेनमध्ये ८० रुपयांत प्रवाशांना जेवण दिले जाणार असल्याची बातमी गेल्या आठवड्यात एक्सवर आली होती. त्यात मेन्यू कोणता राहणार, ते देखिल स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार, भात (प्लेन राईस १५० ग्राम), डाळ किंवा सांबार (१५० ग्राम), दही (८० ग्राम) २ पराठे किंवा (पान २ वर)



## एमआयएमचा पुन्हा 'जय भीम, जय मीम'चा नारा!

**छ. संभाजीनगर :** एमआयएमने २०१९ मध्ये प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीशी हातमिळवणी करत जय भीम, जय मीमचा नारा दिला होता. लोकसभा निवडणुकीत या युतीचा फायदा एमआयएमला झाला, पण वंचितचे प्रकाश आंबेडकर दोन्ही लोकसभा मतदारसंघातून पराभूत झाले. यातून धडा घेत नउ महिन्यांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत वंचितने एमआयएमची साथ सोडली. तेव्हापासून म्हणजे सहा वर्षांपासून एमआयएम नव्या मित्राच्या शोधात आहे. भीम आर्मीचे खासदार चंद्रशेखर आझाद रावण यांच्या आझाद समाज पक्षाशी एमआयएमने बोलणी सुरू केली आहे. महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्या घरी दोन दिवसांपूर्वी आझाद समाज पक्षाच्या प्रभारींची बैठक होउन प्राथमिक चर्चा झाल्याचे समजते. महाराष्ट्रात, मराठवाड्यात अन् छत्रपती संभाजीनगरमध्ये चंद्रशेखर आझाद रावण यांची क्रेझ असली तरी त्यांचा पक्ष अद्याप फारसा कोणाला माहीत नाही. केवळ आझाद यांच्या लोकप्रियतेच्या लाटेवर शहरातील १६ टक्के आंबेडकरी समाज त्यांच्यासोबत जाईल का? हा खरा प्रश्न आहे.

# राज्यघटनेमुळे कोणत्याही व्यक्तीला सर्वोच्च पदाची संधी-सरन्यायाधीश






### ■ सरन्यायाधीश भूषण गवई यांचे विधिमंडळ सत्कार सोहळ्यात विधान ■ न्यायदानात तटस्थपणाची ग्वाही

**मुंबई/प्रतिनिधी : भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश असून भारतीय राज्यघटना अद्वितीय आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या सक्षम राज्यघटनेमुळे देशातील कोणतीही व्यक्ती सर्वोच्च पदावर पोहोचू शकते, ही राज्यघटनेची ताकद असल्याचे प्रतिपादन भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.**

विधानमंडळाच्या वतीने आयोजित सत्काराला उत्तर देताना भारताची राज्यघटना या विषयावर सरन्यायाधीश गवई बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उपसभापती डॉ. नीलम गो-हे, उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह मंत्रीमंडळातील सर्व मंत्रीगण, दोन्ही सभागृहाचे सदस्य उपस्थित होते. राज्यघटनेचा इतिहास सांगून सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले की, एक देश आणि सर्वसमावेशक एकाच राज्यघटनेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ठाम भूमिका घेतली. यामुळेच जात, धर्म बाजूला ठेवत न्यायदानात आणि सर्व बाबतीत देश एकसंध राहण्यास मदत मिळाली आहे. देशाने राज्यघटनेचा अमृत महोत्सवी कार्यकाल पूर्ण केला आहे. गेल्या ७५ वर्षांच्या कालखंडामध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळाने राज्यघटनेला अभिप्रेत काम केले आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समान न्याय (पान २ वर)

### मराठी माणूस सर्वोच्चपदी पोहोचल्याचा सार्थ अभिमान –मुख्यमंत्री



महाराष्ट्राचे सुपुत्र भारताचे सरन्यायाधीश झाले. महाराष्ट्राचा मराठी माणूस भारताच्या सर्वोच्चपदी पोहोचल्याने राज्याला सार्थ अभिमान असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मानवता आणि संवेदनशीलता हा सरन्यायाधीश श्री. गवई यांच्या स्वभावातील महत्वाचा गुण आहे. राज्यात न्यायाधीश असताना त्यांनी विविध महत्वाच्या संदर्भात व्यापक जनहित पाहून न्यायदानाचे काम करून मार्ग काढण्यावर भर दिला. नागपूरमधील झोपडपट्टी तोडण्याच्या वेळीही त्यांनी सर्वोच्च न्यायालयात जावून त्यावर तोडगा काढून स्थगिती मिळवून दिली. अतिशय सामान्य माणूस असा असामान्य होउ शकतो, हे सरन्यायाधीश श्री. गवई यांनी दाखवून दिले आहे. आमदार निवासात असताना ते जनतेच्या राहण्याची व्यवस्था करून स्वतः व्हरांड्यात बसून अभ्यास करीत. मात्र त्यांनी अभ्यासामध्ये खंड पडू दिला नाही. टायगर कॉरिडॉरच्यावेळी रस्त्याची अनेक कामे अडलेली होती, मात्र सरन्यायाधीश गवई यांनी यावर समिती नेमून मानवतेचा दृष्टिकोन, व्यापक जनहित समोर ठेवून न्यायदान केले. यामुळे अडलेली कामे पूर्ण होउ शकली, अशी आठवण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितली. सरन्यायाधीश गवई हे समन्वय आणि चर्चेतून प्रत्येक विषयावर मार्ग काढतात.

### न्यायाधीश भूषण गवई सरन्यायाधीश होणे म्हणजे सामाजिक समतेचा विजय



सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी भूषण गवई यांची नियुक्ती सामाजिक समतेचा आणि सर्वसमावेशकतेचा विजय आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अनेक निर्णयांनी मानवता, संवेदनशीलता आणि संविधानिक मूल्यांची प्रतिष्ठा उंचावण्याचे काम केले. सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना त्यांनी न्याय, हक्क मिळवून दिला. कायद्याच्या चौकटीत राहून त्यांनी माणुसकीचे तत्व कायम जपले. केवळ न्यायमूर्ती म्हणून नव्हे तर, एक आदर्श नागरिक, कठोर परिश्रमी विद्यार्थी, आणि एक संवेदनशील माणूस म्हणूनही त्यांचे व्यक्तिमत्व प्रेरणादायी आहे. न्यायदान करताना त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय दिले असून त्यांची भाषा सौम्य असली तरी निर्णय ठाम असतात आणि म्हणून त्यांचे कर्तृत्व दीपस्तंभासारखे आहे, असेही शिंदे म्हणाले.

### सरन्यायाधीशांचा सत्कार न्यायमंडळ स्तंभाचा गौरव– अजित पवार



विधीमंडळातील सरन्यायाधीश गवई यांच्या सत्काराची इतिहासात नोंद होईल. कारण हा सत्कार लोकशाहीच्या एका स्तंभाने दुस-या स्तंभाचा केलेला गौरव असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. देशाच्या सरन्यायाधीशांचे महाराष्ट्राच्या विधिमंडळात राज्यघटनेचे विविध पैलू उलगडणारे व्याख्यान ही घटना विधिमंडळाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिली जाणारी आहे. लोकशाहीला देखील अधिक बळकटी देणारी आहे. लोकशाही व्यवस्थेत कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे तीन महत्त्वाचे स्तंभ आहेत. माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आपण मानतो. लोकशाहीची व्यवस्था अधिक सुदृढ होण्यासाठी, टिकवण्यासाठी, मजबूत राहण्यासाठी या सर्व संस्थांनी परस्परांचा मान, सन्मान, आदर ठेवून आपापल्या अधिकाराच्या मर्यादेत स्वतंत्रपणे काम करणे अपेक्षित आहे. यातूनच आपली लोकशाही बळकट होणार आहे.

### शोषित, वंचितांचा कळवळा असणारे सरन्यायाधीश–सभापती प्रा.राम शिंदे



सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सभागृहात होत असलेला सत्कार म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. अभ्यासू वृत्ती, चिकित्सक स्वभाव, धाडसी आणि प्रचंड कष्ट करण्याची तयारी असणारे आणि शोषित, वंचितांचा कळवळा असणारे सरन्यायाधीश असल्याचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले. न्यायाधीशांनी समाजाशी एकरूप राहून समाजाचे प्रश्न जाणून घेतले तर अधिक योग्य पद्धतीने न्यायदान होईल. भारताच्या राज्यघटनेचे श्रेष्ठत्व, बेसिक स्ट्रक्चर, फंडामेंटल राईट्स यांना प्राधान्य देउन समता आणि न्याय याची प्राप्ती करणारी शक्ती असणारी न्यायाधीशांची महत्त्वाची भूमिका आहे, असेही त्यांनी सांगितले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, मराठी माणूस सरन्यायाधीशपदी विराजमान झाल्याचा महाराष्ट्राला सार्थ अभिमान आहे. सूत्रसंचालन उपसभापती डॉ. नीलम गो-हे यांनी केले तर आभार अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी मानले.

## माझ्या परवानगीशिवाय प्रसारमाध्यमांशी बोलू नका

### राज ठाकरेंचे स्पष्ट आदेश



**मुंबई/प्रतिनिधी :** मराठीच्या मुद्यावर सुरु असलेल्या वादावरुन मनसेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्याचवेळी प्रसारमाध्यमांशी न बोलण्याचे आदेश राज ठाकरेंनी मनसैनिकांना दिले आहेत. पक्षातील कुणीही परवानगीशिवाय प्रसारमाध्यमांशी बोलू नये, सोशल मीडियावर व्यक्त होउ नये असे फर्मान राज ठाकरेंनी काढले आहे.

पक्षातील कोणीही सोशल मीडियावर व्यक्त होउ नये, किंवा व्हीडीओ टाकू नये. प्रवक्त्यांनी पक्षाची बाजू मांडण्यापूर्वी माझी परवानगी घ्यायची असा स्पष्ट आदेश राज ठाकरे यांनी दिला आहे. राज्यात मराठी आणि अमराठी असा वाद सुरू असून त्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी पक्षाच्या पदाधिकारांना या सूचना दिल्या आहेत. एक स्पष्ट आदेश पक्षातील कोणीही वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्या किंवा कोणत्याही डिजिटल माध्यमांशी संवाद साधायचा नाही. तसेच स्वतःचे प्रतिक्रियांचे व्हीडीओज सोशल मीडियावर टाकायचे हे पण अजिबात करायचे नाही. आणि माध्यमांशी संवाद साधण्याची अधिकृत जबाबदारी ज्या प्रवक्त्यांना दिली आहे त्यांनी देखील मला विचारल्याशिवाय, माझी परवानगी घेतल्याशिवाय कुठल्याही प्रकारच्या माध्यमांशी संवाद साधायचा नाही आणि सोशल मीडियावर व्यक्तव्हायचे नाही.

## येमेनमध्ये भारतीय नर्स निमिषा प्रियाला 16 जुलै रोजी फाशी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** येमेनी नागरिकाच्या हत्येप्रकरणी दोषी ठरलेली भारतीय परिचारिका निमिषा प्रिया हिला १६ जुलै रोजी फाशी देण्यात येणार आहे. केरळमधील पलक्कडची नागरिक आणि व्यवसायाने परिचारिका असलेल्या निमिषा प्रियाला येमेनी नागरिक तलाल अब्दो मेहदी याच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवण्यात आलं. येमेनमधील सरकारी अधिकारी आणि अब्दो तलालच्या कुटुंबाशी झालेल्या चर्चेत सहभागी असलेले सामाजिक कार्यकर्ते सॅम्युअल जेरोम बास्करन यांनी याबाबत माहिती दिली. जेरोम यांना येमेनमधील तुरुंगाच्या अध्यक्षांनी फोन करुन सांगितले की निमिषा मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. निमिषा प्रियालाही याबद्दल अधिकृतपणे माहिती देण्यात आली आहे. सॅम्युअल जेरोम बास्करन यांनी दिलेल्या माहितीनुसार सरकारी वकिलांनी तुरुंग अधिका-यांना यासंदर्भाती खटल्याचे पत्र दिले आहे. फाशीची तारीख १६ जुलै आहे, तरी पर्याय अजूनही खुले आहेत. प्रियाचा जीव वाचवण्यासाठी भारत सरकार या प्रकरणात हस्तक्षेप करू शकते, असं जेरोम म्हणाले.

'आम्ही गेल्या भेटीत कुटुंबाला एक प्रस्ताव दिला होता. आतापर्यंत त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही. मी आज चर्चा पुन्हा सुरू करण्यासाठी येमेनला जात आहे,' असंही जेरोम यांनी म्हटलं. निमिषाची आई प्रेमा कुमारी ही कोची येथे घरकाम करते. गेल्या एक वर्षापासून ती येमेनमध्ये आहे. केरळची रहिवासी असलेली निमिषा ही २०१७ मध्ये हत्येचा आरोप लागेपर्यंत अनेक वर्षे येमेनमध्ये परिचारिका म्हणून काम करत होती. निमिषा मृत तलालच्या मदतीने येमेनमध्ये एक क्लिनिक चालवत होती. निमिषा मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळल्यामुळे तिने तलालची हत्या केली. याप्रकरणी (पान २ वर)

# आज भारत बंद, 25 कोटी कामगार संपावर



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारच्या काही धोरनांविरोधात भारतातील १० केंद्रीय कामगार संघटनांच्या एका मंचाने (फोरमने) बुधवारी (९ जुलै २०२५) देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. या संपात देशातील २५ कोटींहून अधिक कर्मचारी आणि कामगार बुधवारी सहभागी होतील. या बंदचा देशभरातील आर्थिक, शैक्षणिक आदी प्रमुख संस्था आणि सेवांवरही परिणाम होईल. यात बँकिंग, विमा, टपाल आणि कोळसा खाण अशा अनेक क्षेत्रातील कामगारांचा समावेश असेल. यासंदर्भात, ट्रेड युनियन्स फोरमने एक निवेदनही जारी केले आहे. फोरमने निवेदनात म्हटले आहे, 'गेल्या १० वर्षांपासून सरकारने वार्षिक कामगार परिषदेचे आयोजन केलेले नाही. याशिवाय, असे अनेक निर्णय सातत्याने घेतले जात आहेत, जे कामगारांच्या हितांच्या विरुद्ध आहेत.

**या सेवांवर होणार बंदचा परिणाम** -हिंद मजदूर सभेचे हरभजन सिंह सिद्धू यांनी पीटीआयसोबत बोलताना म्हटले आहे की, या राष्ट्रवादी बंदचा, बँकिंग सेवा, राज्य परिवहन सेवा, टपाल सेवा आणि कोळसा खाण आणि कारखाने प्रभावित होतील.

**बँकिंग सेवा** -रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने या पार्श्वभूमीवर कुठल्याही प्रकारची अधिकृत घोषणा केलेली नाही. मात्र बँक कर्मचारी संपात सहभागी झाल्यास बँकिंग सेवांवर परिणाम होउ शकतो.

**राज्य परिवहन सेवा** -या संपामुळे देशभरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरही (पान २ वर)

## छत्तीसगडमध्ये चकमक, प्रमुख नक्षलवादी ठार


### नक्षल्यावर 8 लाखांचे होते बक्षीस

**बिजापूर :** छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यान परिसरात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत डेप्युटी कमांडर आणि स्नायपर सोधी कन्ना हा मारला गेला. त्याला पकडण्यासाठी ८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्याचा (पान २ वर)






## 'एचआयव्ही' विषाणूला दीर्घकाळ झोपवणारी थेरपी विकसीत!



**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था-** एडस्ला कारणीभूत ठरणा-या एचआयव्ही विषाणूला निष्क्रिय करण्याच्या दिशेने अमेरिकन शास्त्रज्ञांनी एक मोठी झेप घेतली आहे. संशोधकांनी एका अशा रेणूचा शोध लावला आहे, जो एचआयव्ही विषाणूला दीर्घकाळासाठी सुप्त अवस्थेत पोहोचवू शकतो. जीन थेरपीच्या माध्यमातून हे कायमस्वरूपी शक्य होउ शकते, ज्यामुळे रुग्णांना दररोजच्या औषधोपचाराच्या त्रासातून मोठी सुटका मिळू शकते. अमेरिकेतील प्रसिद्ध जॉन्स हॉपकिन्स मेडिसिनच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या या अभ्यासानुसार, मानवी शरीरातील एचआयव्ही विषाणूला निष्क्रिय करण्यासाठी जीन थेरपी अत्यंत प्रभावी ठरू शकते. हा क्रांतिकारक शोध केवळ विषाणूला कायमस्वरूपी रोखण्याची क्षमता ठेवत नाही, तर सध्या वापरल्या जार्णा-या अँटिरेट्रोव्हायरल औषधांच्या गंभीर दुष्परिणामांपासूनही रुग्णांची मुक्तता करू शकतो. हे संपूर्ण संशोधन प्रतिष्ठित सायन्स ॲडव्हान्सेस या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. शास्त्रज्ञांनी या संशोधनात अँटिसेन्स ट्रान्सक्रिप्ट नावाच्या एका विशेष रेणूची भूमिका स्पष्ट केली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगात सुमारे ३.९९ कोटी लोक एचआयव्हीने संक्रमित आहेत, त्यापैकी दरवर्षी ६.३ लाख लोकांचा मृत्यू होतो. सध्या यावर मुख्य उपचार म्हणून (पान २ वर)

## आ. धस यांच्या मुलाच्या गाडीला अपघात, 1 ठार

बीड : बीडचे भाजपचे आमदार सुरेश धस यांच्या अडचणींमध्ये वाढ होणार आहे. कारण सुरेश धस यांच्या मुलाचा भीषण अपघात झाला आहे. अहिल्यानगर-पुणे महामार्गावर ही भीषण घटना घडली असून त्यांच्या मुलाच्या चार चाकी गाडीने दुचाकीला घडक दिली आहे. यामध्ये एकाचा मृत्यू झाला आहे. अपघातामध्ये दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्यामुळे आमदार सुरेश धस आणि त्यांच्या मुलाच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. मृत पावलेल्या दुचाकी स्वाराचे नाव नितीन शेळके असे आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नांदगाव तालुक्यातील ६८ ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**नांदगाव खंडेश्वर /प्रतिनिधीः-** तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली आहे. कोणत्या ग्रामपंचायत मध्ये प्रवर्गातील सरपंच असतील हे निश्चित झाले आहे. या सोडतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण या प्रवर्गातील सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले. सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी तालुक्यातील ६८ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी आरक्षण सोडत ८ जुलै रोजी तहसील कार्यालयाच्या सभागृहात काढण्यात आली. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १२, अनुसूचित जमाती २ तर नागरिकांचा मागास प्रवर्गाकरिता १८ व सर्वसाधारण खुला प्रवर्ग म्हणून ३६ अशा एकूण ६८ ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत विशेष भूसंपादन अधिकारी प्रसन्नजीत चव्हाण व तहसीलदार अश्विनी जाधव , नायब तहसीलदार मुलमुले, निवडणूक विभाग मंडळ अधिकारी मंगेश माकडे यांच्या उपस्थितीत काढण्यात येऊन सहाय्यक म्हणून नाझर अमोल दारोडकर मंगेश गावनेर, धीरज वर्मा यांनी सहकार्य केले.



यामध्ये अनुसूचित जाती करिता सिद्धनाथ पुर खुला, जामगाव महिला ,सेलू गुड खुला, नादसावंगी महिला, धानोरा गुरव खुला ,वाघोडा महिला, कोठोडा खुला ,शिवनी रसुलापूर महिला ,मंगरूळ चव्हाळा महिला ,येरडगाव खुला, रोहना खुला ,शिरपूर महिला अनुसूचित जमाती जावरा खुला ,हिवरा बु महिला असे आरक्षण आहे.

नागरिकांचा मागास प्रवर्ग मध्ये टाकळी बु महिला, धानोरा फसी महिला ,खानापूर महिला, वाटपूर महिला ,सातारगाव महिला ,पिंपळगांव बैनाई खुला, पहूर खुला ,सुलतानपूर खुला ,कोहळा जटेश्वर महिला ,लोहगाव महिला ,पिंपरी गावंडा खुला, कणी मिर्जापुर खुला, खिरसाणा ईश्वर चिट्ठी खुला, फुबगांव खुला, खेड पिंपरी खुला ,काजना खुला ,आडगाव बु महिला, पळसमंडळ महिला असे आरक्षण जाहीर झाले.

सर्वसाधारण प्रवर्गात येवती खुला, पिंपरी निपाणी खुला, कोदरी खुला ,दाभा खुला, सारसी खुला ,धानोरा शिखरा खुला, चिखली वैद्य खुला, खंडाळा खुर्द महिला ,मांजरी मसला महिला, कंझरा महिला, फुलामला महिला, पिंपळगांव निपाणी महिला ,वडाळा महिला, वेणी गणेशपुर खुला, येणस महिला, जळू ईश्वरचिट्ठी खुला, बेलोरा हिरापूर महिला, पुसनेर महिला, धामक महिला, पाळा महिला, भंगुरा खुला, वडूरा महिला, मोखड महिला, पापळ खुला, साखरा खुला, लोणी खुला, शिवरा खुला, वाढोणा रामनाथ महिला ,माहुली चोर महिला, शेलु नटवा खुला, दहिगाव महिला, सालोड खुला, ढवलसरी महिला ,सावनेर खुला, बेलोरा धामक खुला ,जनुना महिला असे आरक्षण आहे.

# न्यु गोल्डन इंग्लिश हायस्कुलची वारी पांडुरंगाचे दारी

## -आषाढ बाल दिंडी सोहळा उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** बालाजी नगर, मोती नगर वार्ड स्थित न्यु गोल्डन इंग्लिश हायस्कुल, एन. जी. पब्लिक स्कूल तसेच साहिल प्राथ. व माध्य. शाळेच्या संयुक्त विध्यमाने आषाढ बाल दिंडी सोहळा हर्षोल्हासात पार पडला. महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठू माऊलीचे आशिर्वाद मिळवण्याकरिता वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर विद्यार्थ्यांची बालदिंडी काढण्यात आली. याप्रसंगी शाळेच्या प्रांगणामध्ये बाल वारकऱ्यांचा भक्तीमेळा फुलला होता. पहाटेच्या प्रसन्न वातावरणामध्ये, मेघराजाच्या साक्षीने, विठूमाऊलीच्या नाम गजरामध्ये निघालेल्या या दिंडी सोहळ्याकरिता संस्थेचे अध्यक्ष अनिल आसलकर उपस्थित होते. संस्थाध्यक्ष अनिल आसलकर यांनी सपत्नीक प्रभू श्री विठू माऊली व रुख्मिणी माता यांचे मूर्तीचे तसेच पालखीचे पूजन व आरती करून आशिर्वाद घेतले. यावेळी मेघराजाच्या उपस्थितीने जणू माऊलीचा कृपाशीर्वाद मिळत असल्याचे भासत होते. टाळ मृदुंगाच्या गजरात माऊलीच्या नामघोषाने दुमदुमलेल्या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. पारंपारिक वेशभूषेमध्ये बाल वारकऱ्यांनी आतिशय उत्साहाने आषाढी एकादशी दिंडीमध्ये सहभाग घेतला. संपूर्ण श्रृंगारलेली ऐटदार पालखी, डोक्यावर तुळशी वृंदावन, हातामध्ये विणा, मृदंग, भक्तिभावाने डोईवर घेतलेला ग्रंथ, पालखीवर धरलेले छत्र आणि मुखाने चाललेला 'विठ्ठल विठ्ठल विठ्ठला, पांडुरंग विठ्ठला' असा हरिनामाचा गजर हे संपूर्ण दृष्य बघून जणू पंढरी अवतरल्याचा भास होत होता. सदर दिंडीमध्ये शाळेतील कर्मचारी कांचन पांडे यांनी आपल्या सुमधुर वाणीने भजने गायलीत. परिसरातील नागरिकांनी ठिकठिकाणी पालखीचे पूजन करून विठूमाउलीचे आशिर्वाद घेतले. मोतीनगर येथून निघालेली दिंडी कालीमाता मंदिर सबनीस प्लॉट, महानुभाव आश्रम रोड मार्गे फरशी स्टॉप येथील श्री विठठल रुख्मिणी मंदिरामध्ये थांबली. मंदिरामध्ये सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी माऊलीचे दर्शन घेतले. मंदिर परिसरामध्ये शिक्षकांनी विठू माउलीच्या नामाचा गजर करीत रिंगण घातले आणि भजने गायलीत.









# ७/१२ कोरा यात्रेदरम्यान बच्चू कडूंनी घेतली आजीबाईंची भेट

## घर बांधून देण्याचं दिलं आश्वासन

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली '७/१२ कोरा कोरा कोरा' यात्रा सुरू असून यात्रेच्या माध्यमातून बच्चू कडू सर्वसामान्य शेतकरी, महिला यांच्या व्यथा जाणून घेत आहे. आज यात्रेच्या दुसऱ्या दिवशी लोही बाजार गावातून जात असताना एक आजीबाई बच्चू कडू यांना पडक्या घरात बसलेली दिसून आली. तेव्हा बच्चू कडू यांनी त्या आजीबाईंशी चर्चा करीत त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. तेव्हा आजींना राहायला पक्के घर नसून पडक्या घरात त्या राहत असल्याची माहिती त्यांना मिळाली. यानंतर क्षणाचाही विलंब न लावता बच्चू कडू यांनी त्या आजीबाईला 'आजीबाई काळजी करू नका, जोपर्यंत बच्चू भाऊ जिवंत आहे, तोपर्यंत तुम्हाला काहीही होणार नाही,' असे भावनिक आश्वासन देखील कडू यांनी आजींना दिले. 'शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाला पाहिजे,' या निर्धाराने भर पावसातही हजारो शेतकऱ्यांनी '७/१२ कोरा कोरा कोरा' यात्रेला देशाचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मगावी म्हणजेच पापळ येथून आक्रमक सुरुवात केली. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या यात्रेचा आजचा दुसरा दिवस असून ही पदयात्रा उंबरडा बाजार, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशी गावे पार करत १४ जुलै रोजी चिलगव्हाण येथे स्व. साहेबराव करपे यांच्या स्मृतिस्थळी जाहीर सभेने समाप्त होणार आहे.



दरम्यान, '७/१२ कोरा कोरा कोरा' यात्रा लोही बाजार या ठिकाणी दाखल झाली. तेव्हा शेतकरी, गावातील ग्रामस्थांनी यात्रेचे स्वागत करत यात्रेत मोठ्या उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. गावातून यात्रा जात असताना बच्चू कडू यांनी शेतकरी, कष्टकरी लोकांच्या व्यथा, समस्या जाणून घेतल्या.

# तिवसा तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतचे सरपंच आरक्षण सोडत जाहीर

## २३ ग्रामपंचायतीवर महिलाराज

**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतीचे २०२५ ते २०३० वर्षासाठीचे सरपंच पदाचे सुधारित आरक्षण मंगळवारी (दि.८) दुपारी १वाजता तिवसा येथील नवीन प्रशासकीय इमारत तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी श्रद्धा उदावंत, तहसीलदार डॉ. मयूर कळसे, पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी नारायण अमझरे यांच्या उपस्थितीत सोडतीद्वारे काढण्यात आले. तसेच लहान मुलीच्या हस्ते चिठ्ठ्या काढून सरपंचपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. दरम्यान सर्वसाधारण सरपंच पदासाठी २६, नागरिकांचा मागास प्रवर्ग १२, अनुसूचित जातीसाठीं ६,अनुसूचित जमातीसाठी भारवाडी १,अशा पद्धतीने सरपंच पदासाठी एकूण ४५ ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.




या सरपंच पदाच्या सोडतीत थोडे फेरबदल झाले असून कही खुशी कही गम अशी स्थिती निर्माण झाली आहे. गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या मातबरांचे स्वप्न धुळीस मिळाले आहे. तर अनेकांना अनपेक्षित लॉटरी लागल्याचे चित्र आहे. एकूण ४५ ग्रामपंचायतीपैकी २३ ग्रामपंचायतीवर महीलाराज असणार आहे.

**अनुसूचित जाती :-** खुला गट वणी, घोटा,माळेगाव, महिला राखीव करजगाव धामंत्री, दापोरी खुर्द

**अनुसूचित जमाती :-** भारवाडी महिला राखीव

**नागरिकांचा मागास प्रवर्ग :-** खुला गट सातरगांव, दिवानखेड,अनकवाडी, दुर्गवाडा, शिरजगांव मोझरी,डेहणी, महिला राखीव वरखेड,निभोरा दे.शेंदोळा बु, मूर्तिजापूर तरोडा,उंबरखेळ,शेंदुरजना बु.

**सर्वसाधारण :-** खुला गट तळेगाव ठाकूर, जावरा फ, ठाणाठुनी, गुरुदेव नगर, शेंदोळा खुर्द, धोत्रा, भिवापूर, कौडण्यपूर, कवाडगव्हाण, शेंदुरजना खुर्द, वरुडा, वऱ्हा, वाठोडा खुर्द, **महिला राखीव** सार्शी, सुरवाडी खुर्द, पालवाडी, मोझरी, शिवणगांव, सालोरा बु, मार्डी, कुऱ्हा, बोर्डा, चेनुष्टा,आखतावाडा, फत्तेपूर जावरा, मारडा.

पान १ व १० वरून

## अमेझॉनवरून खरेदी केली

२०२२ मधील गोरखनाथ मंदिर हल्ला याचा उल्लेख करत एफएटीएफने या घटनांमध्ये ऑनलाइन प्लॅटफ?र्मने महत्त्वाची भूमिका बजावली असे म्हटले. एका दहशतवाद्याने अमेझानवरून अॅल्युमिनियम पावडर मागवली होती, ज्यामुळे आयईडी स्फोटाची ताकद वाढली. गोरखनाथ हल्ल्यातील आरोपींनी पेपल आणि व्हीपीएन वापरून सुमारे ६.७ लाख किमतीचे परदेशी व्यवहार केले होते. आयसिस समर्थकांना निधी पाठवला आणि ठिकाण लपवले. गेल्या १० वर्षांत फिनटेक आणि डिजिटल पेमेंटच्या वाढत्या वापरामुळे दहशतवाद्यांना स्वस्त, जलद मार्ग मिळाला आहे. दहशतवादी आता ई-कॉमर्समधून ३डी प्रिंटेड शस्त्रे, रसायने आणि इतर उपकरणे खरेदी करत आहेत असे एफएटीएफने म्हटले आहे. एफएटीएफने सदस्य देशांना व्हीपीएन, पीटूपी पेमेंट आणि ई-क?मर्स प्रक्रियांवर कडक देखरेख ठेवावी लागेल, कारण हे आता दहशतवाद्यांसाठी संसाधने उभारण्याचे एक नवीन साधन बनले आहेत, असा इशारा दिला. दरम्यान, १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पुलवामा येथे सीआरपीएफच्या बसला दहशतवाद्यांनी लक्ष्य केले होते. या भ्याड हल्ल्यात ४० जवान शहीद झाले होते. याच्या प्रत्युत्तरात काही दिवसांनंतर भारतीय हवाई दलाने पाकिस्तानातील बालाकोटमध्ये सर्जिकल स्ट्राईक केला होता.

## व्यावसायिकानेच दिली होती

यांची हत्या करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्याने उमेश यादव नावाच्या शूटरला ४ लाख रुपयांची सुपारी दिली. पोलिस अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार अशोक साव याने उमेश यादव याला ५० हजार रुपये आगावू दिले होते. तर उर्वरित पैसे हत्या केल्यानंतर देण्याचे आ□ासन दिले होते. मात्र पोलिसांना त्यांच्या गुन्ह्याचा सुगावा लागला. तसेच पोलिसांनी जेव्हा अशोक साव याच्या ठिकाणांवर धाडी टाकल्या तेव्हा तिथून जमिनीच्या व्यवहारांसंबंधीची अनेक कागदपत्रे सापडली. त्यामुळे हे संपूर्ण प्रकरण जमिनीच्या व्यवहारांबाबतचे असल्याचे स्पष्ट झाले होते.

## रेल्वेच्या '70 रूपयांत

चार पोळ्या (१०० ग्राम) भाजी (१०० ग्राम) आणि लोणचे (१२ ग्राम) दिले जाणार होते. रेल्वेच्या अधिका-यांकडूनही या बातमीला गेल्या आठवड्यात दुजोरा मिळाला होता. माफक किंमतीत पोटभर जेवण मिळणार असल्याच्या या गूड न्यूजमुळे कोट्यवधी रेल्वे प्रवासी हुरळले होते. तेव्हापासून (साधरणतः एक आठवड्यापासून) शेकडो प्रवासी रेल्वे स्थानकावर रोज हे ७० रुपयांचे जेवण शोधतात. मात्र, त्यांना ते जेवण कुठेही आढळत नाही. स्टेशनवरील फूड स्टॉलवाले आणि ट्रेनमधील वेंडर्सदेखिल या जेवणाबाबत अनभिज्ञता व्यक्त करतात. अर्थात् ७० आणि ८० रुपयांचे हे जेवण सध्या प्रवाशांना ढूंडते रहे जाओंगेची प्रचिती देत आहे. या संबंधाने रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्याकडे वारंवार संपर्क करूनही बोलणे झाले नाही. त्यामुळे प्रवाशांना नेमके हे भोजन कधीपासून उपलब्ध होणार, ते स्पष्ट होउ शकले नाही. दुस-या एका संबंधितांकडे विचारणा केली असता त्यांनी जेवणाची फक्त चर्चाच सुरू आहे. अद्याप तशी काही अधिसूचना ईकडे आली नसल्याचे म्हटले आहे.

## येमेनमध्ये भारतीय नर्स निमिषा

येमेनमधील एका ट्रायल कोर्टाने निमिशाला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली होती आणि तिथल्या सुप्रीम कोर्टानेही ती कायम ठेवली होती. गेल्या वर्षी येमेनचे अध्यक्ष रशाद अल-अलीमी यांनी ३८ वर्षीय निमिशा यांच्या मृत्युदंडाच्या शिक्षेला मान्यता दिली होती. ही शिक्षा सुनावल्यानंतर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने निमिषा आणि तिच्या कुटुंबाला सर्वतोपरी मदत करण्याचे आ□ासन दिलं होतं. हत्येनंतर पळून जाताना निषिमाला अटक करुन फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. सध्या, प्रियाची आई येमेनमध्ये असून ती मृत तलालच्याच्या कुटुंबाला 'ब्लडमनी' देउन तिची मृत्युदंडाची शिक्षा कमी करण्याचा प्रयत्न करत होती. इस्लामिक कायद्यानुसार, गुन्ह्यातील पीडितांना गुन्हेगारांना शिक्षा कशी करावी याबद्दल मत मांडण्याचा अधिकार आहे. पीडिताचे कुटुंब आर्थिक भरपाईच्या बदल्यात खुन्याला माफ करण्याचा पर्याय निवडू शकते.

## आज भारत बंद,

परिणाम होउ शकतो. यासंदर्भात राज्य सरकारांकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आली नसली. मात्र, वाहतूक सेवांमध्ये मोठ्या प्रमाणात व्यत्यय येण्याची शक्यता असल्याचे संघटनांच्या निवेदनात म्हणण्यात आले आहे.

**टपाल सेवा -** या देशव्यापी संपाचा भारतीय टपाल सेवेवर मोठा परिणाम होउ शकतो. यामुळे विविध प्रकारची कागदपत्रे लोकांच्या घरी पोहोचम्यास विलंब होउ शकतो.

**कोळसा खाण आणि कारखाने -** कोळसा आणि कोळशा व्यतिरिक्त इतर खनिज कारखाने आणि संघटना देखील या संपात सहभागी होतील. यामुळे केवळ या सेवांमध्येच नव्हे तर कोळशावर अवलंबून असलेल्या इतर सेवांवरही याचा याचा परिणाम होउ शकतो.

याशिवाय शाळा, कॉलेज, बाजार आणि खासगी कार्यालये, आदींवरही या संपाचा परिणाम होईल. महत्वाचे म्हणजे, या बंदमध्ये भारतीय मजदूर संघ ही देशातील एक मोठी कामगार संघटना भाग घेणार नाही.

## छत्तीसगडमध्ये चकमक

मृतदेह आणि ३०३ रायफल जप्त करण्यात आली आहे. याबाबतची माहिती बिजापूरचे पोलिस अधीक्षक जितेंद्र यादव यांनी दिली.

जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यान परिसरात माओवादी कार्यकर्त्यांच्या हालचालींबद्दल माहिती मिळाली होती. त्यावरून डीआरजी बिजापूर, डीआरजी दंतेवाडा, एसटीएफ, कोब्रा २०२, कोब्रा २१० आणि सीआरपीएफ यांचे संयुक्त पथक ४ जुलैपासून शोध मोहिमेवर पाठवण्यात आले होते. या कारवाईदरम्यान सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये अधूनमधून चकमकी होत होत्या. चकमकीनंतर शोध मोहिमेदरम्यान सोधी कन्नाचा मृतदेह आणि शस्त्रे जप्त करण्यात आली.गेल्या १८ महिन्यांत आतापर्यंत ४१५ कट्टर माओवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. हे सुरक्षा दलांच्या कार्यक्षम नियोजन आणि धाडसी कारवाईचा पुरावा आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

**रायफल्स, काडतुसे जप्त-** छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात ज्या ठिकाणी चकमक झाली, त्या ठिकाणावरून ३०३ रायफल आणि ५ जिवंत काडतुसे, एके-४७ मॅगझिन आणि ५९ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. याशिवाय नक्षलवादी साहित्य, रेडिओ आणि दैनंदिन वापराच्या वस्तूही ताब्यात घेण्यात आल्या.

## 'एचआयव्ही' विषाणूला दीर्घकाळ

अँटिरेट्रोव्हायरल थेरपी वापरली जाते, ज्यामध्ये रुग्णाला आयुष्यभर दररोज औषधे घ्यावी लागतात. या औषधांच्या दीर्घकाळ वापरामुळे यकृताचे नुकसान, चयापचय क्रियेत बिघाड आणि हाडांची कमजोरी यांसारख्या गंभीर समस्या उद्भवतात. याउलट, जीन थेरपीचा परिणाम पहिल्याच डोसमधून दिसू शकतो आणि ती रुग्णाला कायमस्वरूपी आराम देउ शकते.

**विषाणू वाढीची प्रक्रिया होते लॉक-** एचआयव्हीच्याच अनुवांशिक सामग्रीतून तयार झालेला अँटिसेन्स ट्रान्सक्रिप्ट हा रेणू विषाणूला अशा सुप्त अवस्थेत पोहोचवतो, जिथे तो स्वतःची संख्या वाढवू शकत नाही. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, हा रेणू विषाणूच्या वाढीच्या प्रक्रियेलाच लॉक करतो. या संशोधनाचा एक महत्त्वाचा भाग १५ एचआयव्हीग्रस्त रुग्णांवर आधारित होता. त्या रुग्णांच्या परवानगीने त्यांच्या शरीरातील प्रतिकारशक्ती पेशी गोळा करण्यात आल्या. या पेशींमध्ये शास्त्रज्ञांनी अडढ रेणू टाकून विषाणू सक्रिय राहतो की नाही, हे तपासले. या प्रयोगातही विषाणू निष्क्रिय झाल्याचे दिसून आले, ज्यामुळे संशोधकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

## सातबारा कोरा आंदोलनास

काहीच केलं नाही, आता आमची जमीन घ्या किंवा आम्हाला गांजा-अफूची शेती करू द्या,' असा थेट इशारा शेतकऱ्यांनी दिला. ही संतप्त प्रतिक्रिया केवळ उद्वेग व्यक्त करणारी नसून, सरकारच्या अपयशी धोरणांवर एक जळजळीत टीका मानली जात आहे.

बच्चू कडू यांनी यावेळी बोलताना सांगितले की, 'हे आंदोलन केवळ ७/१२ कोरा करण्यापुरते मर्यादित नाही. हे आंदोलन आहे शेतकऱ्याच्या न्यायासाठी, त्यांच्या जमिनी, रोजगार आणि पुनर्वसनाच्या हक्कासाठी.' त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, सरकारने जर तातडीने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे लक्ष दिले नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

राज्यात गेल्या काही वर्षांत विविध योजनांच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी उद्योगपतींना दिल्या गेल्या. मात्र, त्या बदल्यात शेतकऱ्यांना ना योग्य मोबदला मिळाला, ना पुनर्वसन, आणि ना कुठलाही रोजगार. यामुळे ग्रामीण भागात प्रचंड असंतोष उसळला आहे. आता या असंतोषाला बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली प्रहारमंच मिळाल्याने, तो अधिक तीव्र रूप धारण करत आहे.

## शहरात घातक शस्त्रसाठा जप्त

शोध पोलीस घेत आहेत.शहरात अंमली पदार्थ आणि घातक शस्त्रांचा विळखा घट्ट होत चालल्याने पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी थेट कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार, गुन्हे शाखेच्या युनिट-२ ने गवळीपुरा परिसरातील बाबा, हुंगा आणि समीर यांच्या घरांवर छापेमारी केली. हे शस्त्रसाठे कोणत्या उद्देशाने ठेवण्यात आले होते, याचा तपास सुरू आहे. ही कारवाई उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण व त्यांच्या पथकातील महेश इंगोले, संजय वानखडे, महेंद्र येवतीकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मंगेश परिमळ, माधुरी साबळे, वर्षा घोंगडे, संग्राम भोजने, नईम बेग, अख्तर पठाण, विशाल वाकपांजर, निलेश वंजारी, सागर ठाकरे, चेतन कराळे, मयूर बोरेकर, राहुल दुधे आणि चेतन शर्मा यांनी केली. या शस्त्रांचा वापर कोणत्या गुन्ह्यांसाठी होणार होता? या मागे कोणता टोळीगट सक्रिय आहे? या शस्त्रांची खरेदी कशी झाली? याचा तपास सध्या पोलिसांकडून युद्धपातळीवर सुरू आहे.

## अंजनगांव मार्गावर सावळी दातूरा

फाट्या दरम्यान नेहमीच अपघात होतात. काही दिवसापूर्वी अपघात होऊन दोघे जण गंभीर जखमी झाले होते. या मार्गावर अनेकदा अपघात झाल्याने अनेकांना अपंगत्व आले आहे. तरी राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाने या रस्त्यावर आवश्यक तो बदल करणे गरजेचे आहे.विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकी वाहनावर दोन युवक असल्याची माहिती मिळाली आहे.विरुद्ध दिशेने येणारे दुचाकी वाहन एमपी- ४८ /९६४३ क्रमांकाची शाइन गाडी होती .सहदेव भंगी सयाम (वय २६) ,देवा मुंनीलाल सयाम (वय २८ ) भैसदेही तालुका मध्य प्रदेश मधील ते रहिवासी आहे.त्या दोन्ही जणांना परतवाडा पोलीस स्टेशन मध्ये ताब्यात घेण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. मात्र या महामार्गावर भरधाव वेगात जाणाऱ्या दुचाकी ,चारचाकी वाहनावर स्वतंत्र वाहतूक नियंत्रण शाखेचे दुर्लक्ष होत असल्याने अनेक निष्पाप नागरिकांना आपले जीव गमवावे लागत आहे, हे पुन्हा या दुर्दैवी घटनेवरून समोर आले आहे.

## रस्ते अपघात रोखण्यासाठी

असल्याने परतवाडा येथे क्रेन, टोईंग वाहनाची व्यवस्था करावी. तातडीने संपर्क आणि मदत पोहोचावी, यासाठी या सेवा पुरविणाऱ्या एजंसी पॅनेलवर घ्याव्यात. त्यांची सेवा ऑनकॉल घेण्यास मदत होईल. अपघात झाल्यानंतर याची माहिती आयआरडीए यंत्रणेवर अपलोड करावी. यामुळे जिल्ह्यात होणाऱ्या अपघातांचे विश्लेषण करण्यास मदत होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**अपघातग्रस्तांवर दिड लाखांचा वैद्यकीय उपचार-** शासनाच्या नव्या निर्देशानुसार अपघातग्रस्तांना गोल्डन अवरमध्ये तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी दिड लाखांचा वैद्यकीय उपचार मोफत मिळणार आहे. यासाठी सात दिवसांच्या आत क्लेम करावा लागणार आहे. जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून या खर्चाला मंजूरी दिल्यानंतर संबंधित रूग्णालयांना देण्यात येणार आहे.

## मेडिकल कौन्सिल नोंदणीचा तो

अशा डॉक्टरांना मॉडर्न मेडिसिन प्रॅक्टिशनर म्हणून मान्यता दिली गेली तर सामान्य रुग्ण गोंधळात पडतील. आपत्कालीन परिस्थितीत चुकीचे औषधोपचार, निदान, सर्जिकल अज्ञान यामुळे रुग्णांच्या जीवाला धोका होऊ शकतो. मान्यताप्राप्त एमबीबीएस डॉक्टरांची प्रतिमा मलीन यामुळे होऊ शकते. शासनाच्या या निर्णयाचा एमआयएम च्या वतीने निषेध करण्यात येत आहे. हा निर्णय लवकरात लवकर रद्द करण्यात यावा नाहीतर आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे. निषेध करणाऱ्यांमध्ये डॉ. अलका कुथे,डॉ. राधा सावदेकर, डॉ. दिनेश वाघाडे ,डॉ.वसंत लुंगे, डॉ. विजय कुथे, डॉ. अनिल रोहनकर, डॉ.पूनम बेलोकार, डॉ. ललिता ढोले, डॉ. रोहित गनेडिवाल, डॉ. विनीत अवसरमोल ,डॉ.तृप्ती दानखेडे, डॉ. शोभा पोटोडे, डॉ.शर्मिष्ठा बेले, डॉ. वीरूपक्क्षा कच्चेवार, डॉ. श्याम राठी, डॉ .रोहन बोबडे, डॉ.भूपेश भोंड सह इतरांचा सहभाग होता.

## अंजनगावात अवैध गर्भपात

रेकॉर्ड पोलिसांनी घेतले आहे. वर्ष २०१८ मध्ये जिल्हा शल्यचिकित्सक यांना मान्यतेसाठी बोगस डॉ. पाटील यांनी प्रस्ताव पाठवला होता. हा प्रस्ताव रद्द करण्यात आला होता. प्रस्ताव रद्द झाल्यानंतर २०१८ ते २०२५ दरम्यान येथे अवैध गर्भपात केले जात होते. या व्यतिरिक्त हर्निया आणि आणखीन काही गंभीर आजारांचे ऑपरेशन करण्यात आले. सर्व रेकॉर्ड तपासणी दरम्यान जप्त करण्यात आले. रुग्णालयाच्या बाहेर सरकारमान्य वैद्यकीय गर्भपात केंद्राची पाटी लावण्यात आली होती.ही पाटी सुद्धा ताब्यात घेतली. काही औषधी येथून मिळाल्या आहे. रुग्णांच्या जीवा सोबत येथील डॉक्टर खेळत होते. शेवटी या रुग्णालयाचा भंडाफोड झाला आणि येथे कारवाई करण्यात आली.वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नालाट यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी डॉ. युवराज पाटील विरुद्ध कलम ३१८,३१९,८८,८९ सह कलम ३४ गर्भपात अधिनियम, औषधी सौंदर्य प्रशासन अधिनियमचे कलम ४१५,४१६,३१२,३१३ अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस करत आहे.

## पीआर कार्डसाठी लोटांगण आंदोलन

रखडला आहे. या घटनेला अनेक वर्ष झाले. मनपाने याकडे डोळे झाक केली आहे. या संपूर्ण बाबीला जबाबदार असलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आंदोलन करणाऱ्यांमध्ये प्रभाकर वाळसे, देवानंद वानखडे, प्रमोद खंडारे, दिनेश स्वर्गे, दिलीप प्रधान, श्रावण वाघमारे, मुन्ना वाघमारे, अर्जुन इंगोले, महेश लोंढे यांच्यासह इतरांचा सहभाग होता.

## नोकरीचे आमिष दाखवून सहा

दिले. एका वेळेस नागपूरच्या हॉटेलमध्ये मोसिन खानशी ओळख करून देत त्याला 'अधिकारी' म्हणून दाखवले गेले. त्याच गाडीतच 'इंटरव्ह्यू' घेण्यात आला. यानंतर हाफिजने अंकुशला बनावट आयकार्ड आणि कॉल लेटर दिले. त्यात २६ फेब्रुवारी २०२४ रोजी हजर राहण्याचे लिहिले होते. मात्र तब्येत बिघडल्याने अंकुश त्या दिवशी उपस्थित राहू शकला नाही. पुढे हाफिजने अधिकाऱ्यांशी बोलतो असे सांगत उर्वरित रक्कम मागितली. त्यानंतर मात्र तो टाळाटाळ करू लागला. फक्त अंकुशच नव्हे, तर हाफिजने नागपूरचे अनिकेत लांजेवार व प्रतीक लांजेवार यांच्याकडून ४० लाख, तर प्रमोद पोकळे याचे धनंजय, आदित्य आणि कुर्हा येथील संकेत या भाच्यांकडून २६ लाख रुपये उकळले. एकूण सहा युवकांची ८४ लाख २ हजार २४० रुपयांची फसवणूक करण्यात आली.

सर्व युवकांना बनावट कॉल लेटर, बनावट आयकार्ड देत या टोळीने विश्वास संपादन केला होता. पोलीस तपासात ही फसवणूक मोठ्या प्रमाणावर सुरू असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आरोपींकडून जाळं पसरवून अनेक बेरोजगार युवकांची लूट केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

## गुजरात क्रांती भवनमध्ये बॉम्ब

तपासणी केली. एवढेच नाही तर परिसरातील दुकान आणि येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची पण तपासणी करण्यात आली. मात्र पोलिसांच्या हाती काहीही लागले नाही. शेवटी सोमवार प्रमाणे हा फोन कॉल फेक असल्याचे पोलिसांना समजले. दोन दिवसापासून येणाऱ्या फोन कॉल मुळे पोलीस विभागात खळबळ उडाली आहे. आता पोलीस फेक कॉल करणाऱ्या इसमाच्या शोधात आहे. दरम्यान दहशतवाद विरोधी पथकही शहरात दाखल झाले आहे. हे पथक या प्रकरणात आता तपास करणार आहे.

## तळवेल ते जवळा रस्ता चिखलमय,

कठीण झाले आहे. काही ठिकाणी तर पाय घसरून अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. नागरिक या दोन दिवसात चिखलात घसरून पडलेले आहेत.

या रस्त्याबाबत तक्रारी असूनही अद्याप कोणत्याही प्रशासकीय यंत्रणेकडून या समस्येकडे लक्ष दिले गेले नाही. नागरिकांनी रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी प्रशासनाकडे वारंवार मागणी केली आहे.

## तरुणीवर लैंगिक अत्याचार

दुसऱ्या दिवशी तिने हिंमत करून राजापेठ पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. मात्र पोलीस ठाण्यात माहिती देताना तिची प्रकृती अचानक खालावली. त्यामुळे पोलिसांनी तिला तत्काळ इर्विन रुग्णालयात दाखल केले. राजापेठ पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून आरोपी मयूर कराडे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला | वाशिम | बुलडाणा
■ बुधवार, ९ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# दारूबंदीचा ठराव हवेतच ; प्रशासनाच्या उदासीनतेवर महिलांचा आक्रोश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**मानोरा तालुक्यातील भिलडोंगर व गिराठा गावातील अवैध दारूचा महापूर आला आहे. अवैद्य दारू विक्रीविरोधात महिलांनी एल्गार पुकाराला आहे. आत्महत्या, शिवीगाळ, धमक्या आणि वाढती व्यसनाधीनता यामुळे गावकरी भयभीत झाले आहेत. महिला संघटनानी जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षकांना निवेदन देत कठोर कारवाईची मागणी केली आहे.**



वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील भिलडोंगर आणि गिराठा या गावांमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेली अवैध दारू विक्रीची समस्या आता गंभीर वळणावर पोहोचली आहे. गावातील ग्रामपंचायत पदाधिकारी, महिला बचत गट व सामाजिक कार्यकर्त्यांनी या समस्येविरोधात एकत्र येत मोठा आवाज उठवला असून जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक यांना निवेदन देत कठोर कारवाईची मागणी केली आहे.या निवेदनावर भिलडोंगर गावाचे सरपंच चिंतामण कळणाजी खुळे, पोलीस पाटील,

राष्ट्रीय बंजारा परिषद महिला प्रदेश अध्यक्ष सीमा राठोड, वङ्कादेही महिला विकास संघाच्या संस्थापक अध्यक्षा आरती ठोके, आजाद समाज पार्टीच्या महिला आघाडी विदर्भ प्रमुख रचना कोकरे यांच्या सह्या आहेत. गावामध्ये अवैध दारू विक्री दिवसेंदिवस वाढत असून, याचा थेट परिणाम तरुण पिढीवर होत आहे. अनेक तरुण व्यसनाच्या आहारी गेले असून त्यांचे भवितव्य अंधारात ढकलले जात आहे. विशेष म्हणजे गावात घरगुती पद्धतीने गावठी दारू तयार केली जाते, त्यासोबतच बाहेरूनही दारूच्या बाटल्या आणून खुलेआम विकल्या जात आहेत.यामुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडले असून, घराघरात वाद, मारामाऱ्या, महिलांवरील अत्याचार व रस्त्यावरून जाणाऱ्या स्त्रियांना शिवीगाळ व छेडछाड होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. महिलांना दिवसाढवळ्या रस्त्याने फिरणे कठीण झाले आहे.या दारू विक्रीच्या धंद्यामुळे गावातील तीन युवकांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती निवेदनात नमूद करण्यात आली आहे. गजानन वानखडे, लक्ष्मण वानखडे, अक्षय बंगारे या तिघांनी सततच्या मानसिक त्रासामुळे आत्महत्या केल्याचे कुटुंबियांचे म्हणणे आहे.गावकरी या दारू विक्रेत्यांविरोधात आवाज उठवतात तेव्हा त्यांना धमक्या दिल्या जातात, बेदम मारहाण केली जाते. गावात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.दारू विक्री विरोधात गावकऱ्यांनी वेळोवेळी तक्रारी दाखल केल्या आहेत. विशेषतः पोलीस स्टेशन आसगाव व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे दिनांक ६ ऑक्टोंबर २०२२, १ जुन २०२३, २५ जुलै २०२३, २७ फेब्रुवारी २०२३, ४ नोव्हेंबर २०२३ व २४ जुन २०२५ रोजी लेखी निवेदने सादर करण्यात आली होती. मात्र आजतागायत कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, त्यामुळे गावकऱ्यांचा प्रशासनावर विश्वास उडाल्याची भावना आहे.भिलडोंगर ग्रामपंचायतीने ग्रामसभेमध्ये दारूबंदीचा ठराव एकमताने मंजूर करून त्याची प्रत जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक कार्यालयात सादर केली होती. मात्र त्या ठरावाची कुठलीही दखल न घेता अवैध दारू विक्री सुरुच ठेवण्यात आली. यामुळे ग्रामसभा व ग्रामपंचायतच्या ठरावांची किंमत प्रशासनाच्या दृष्टीने किती आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

या समस्येच्या विरोधात राष्ट्रीय बंजारा परिषद महिला प्रदेश अध्यक्ष सीमा राठोड, वङ्कादेही महिला विकास संघाच्या संस्थापक अध्यक्षा आरती ठोके, आजाद समाज पार्टीच्या महिला आघाडी विदर्भ प्रमुख रचना कोकरे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर निवेदन देण्यात आले. यावेळी गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिलांनी स्पष्ट शब्दात इशारा दिला की, जर अवैध दारू विक्रीवर त्वरित कारवाई झाली नाही तर गावकऱ्यांचा संयम सुटेल आणि मोठे जनआंदोलन छेडले जाईल. याची सर्वस्वी जबाबदारी पोलीस प्रशासनावर व जिल्हा प्रशासनावर राहील.या आंदोलनात गावातील विविध महिला बचत गटांनी सक्रिय सहभाग घेतला.

## विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील घुसखोरी थांबविण्याची मागणी



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यासह राज्यातील ग्रामीण व डोंगरदऱ्यामध्ये निवासाला असलेल्या व आदिम समाजाची लक्षणे असलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गामध्ये काही प्रभावशाली जात समुदायाकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे या मागास जातीचे दाखले लाटले जात असल्याच्या विरोधात गोर सेना या सामाजिक संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या आदेशान्वये मंगरूळपिर तालुका पदाधिकाऱ्यांच्या वतीने तालुका प्रशासनाला ही असंवैधानिक कृती रोखण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले. विमुक्त जाती अ प्रवर्गातील जात प्रमाणपत्र २००० कायद्यान्वये मानवी दि.२१ नोव्हेंबर १९६१ पूर्वीचा कागदोपत्री जात पुरावा बघूनच जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंदर्भात आणि विमुक्त जाती अ या प्रवर्गातील एकूण प्रमाणपत्रांची निर्गमित अधिकृत यादी जाहीर करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेल्या न्यायनिवाड्याचे तंतोतंत पालन करण्याच्या मागणीची निवेदन तालुका गोरसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने आज तहसीलदार यांना देण्यात आले. सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या विमुक्त जाती अ प्रवर्गातील नागरिकांच्या अज्ञानाचा गैरफायदा प्रभावशाली उच्चवर्णीय (राजपूत, छप्पर बंद आदी) जाती समूहाकडून धनबळ व राजकीय पाठबळाद्वारे विमुक्त जाती अ प्रवर्गाचे जातीचे दाखले बनावट कागदपत्राच्या आधारे काढून मूळ मागास असलेल्या जातीसमूहाच्या शैक्षणिक व रोजगाराच्या वाटा अवरूद्ध करीत आहेत.

# केंद्राची समिती गावातील स्वच्छतेची घेतेय माहिती

## स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सर्वेक्षण : उपक्रम, प्रकल्पांचा आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

केंद्र शासनाच्या 'स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) २०२५' अंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये स्वच्छताविषयक सर्वेक्षणाला सुरुवात झाली आहे. भर पावसात ही समिती जिल्हाभर फिरत असून स्वच्छताविषयक उपक्रमांचा आणि प्रकल्पांचा आढावा घेतला जात आहे. आतापर्यंत मानोरा, मंगरुळपीर आणि कारंजा तालुक्यातील काही गावातील स्वच्छतेची पडताळणी करण्यात आली असुन यानंतर मालेगाव, रिसोड आणि वाशिम तालुक्यातील गावामध्ये ही समिती धडकणार आहे. मात्र, भर पावसात हे सर्वेक्षण सुरु असल्याने ग्राम पंचायतींनाही मर्यादा येत आहेत.

**'स्वच्छ भारत मिशन'; गाव स्वच्छ-सुंदर होणार :** या मिशनमधून गावच्या स्वच्छतेत सातत्य आहे की नाही हे प्रामुख्याने पाहण्यात येणार आहे. त्यामुळे गावेच्या गावे स्वच्छ होत आहेत, तसेच सांडपाणी व्यवस्थापनावरही भर देण्यात येणार आहे.



**या बाबींची तपासणी :** १. गावांमध्ये कुटुंबांच्या भेटीवेळी घरातील स्वच्छतेव्या सुविधांची स्थिती, वैयक्तिक शौचालयाचा वापर, हात धुण्याच्या सवयी

२. ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण व त्याकरिता असलेली सुविधा शिवाय सांडपाणी व्यवस्थापनाचे केलेले काम याची तपासणी केली जात आहे, तसेच सार्वजिनक ठिकाणाच्या स्वच्छतेचीही पाहणी करण्यात येत आहे.

**१००० गुणांच्या आधारे मूल्यांकन होणार :**

- ☐ ऑनलाइन प्रणालीवरील प्रगती – २४० गुण
- ☐ गावातील प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षण- ५४० गुण
- ☐ जिल्हा व तालुका स्तरावरील प्रकल्प थेट निरीक्षणासाठी - १२० गुण
- ☐ ग्रामस्थांचा प्रतिसाद - १०० गुण

'जिल्ह्यात सध्या ही तपासणी सुरू आहे. वैयक्तिक स्वच्छता, कचरा, सांडपाणी व्यवस्थापनाची यामध्ये पाहणी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील अनेक सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांना मान्यता दिली आहे; परंतु पावसाळ्यामुळे काम सुरू करता आले नाही. त्यामुळे पुढील वर्षे स्वच्छतेमध्ये जिल्ह्याची कामगिरी अजूनही चांगली आढळणार आहे.'

**विनोद खेडकर,**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी आणि स्वच्छता, जिल्हा परिषद, वाशिम

**जिल्ह्यात ग्रामपंचायती व गावे किती ?**

एकुण ग्रामपंचायती: ४९१
एकुण गावांची संख्या: ६८१

# जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा आ. साजिद खान पठाण यांचा विधानसभेत संताप

## गेल्या महिन्यात सहा खून, वीस घरफोड्या, अमली पदार्थांची खुलेआम विक्री, पोलिसांचा प्रभाव कुठे ?

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती दिवसेंदिवस ढासळत चालली असून, पोलीस यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरत असल्याची संतप्त टीका अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी सोमवारी विधानसभेत केली. राज्याच्या पावसाळी अधिवेशनात गृहविभागाच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी जिल्ह्यातील भीषण परिस्थितीचा लेखाजोखा मांडत सरकार आणि प्रशासनाला खडसावले.

आ. पठाण यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'जून महिना अकोला जिल्ह्यासाठी रक्तरंजित ठरला आहे. अवघ्या एका महिन्यात तब्बल ६ खून, तसेच २० च्या जवळपास घरफोड्यांच्या घटना घडल्या आहेत. ही अत्यंत गंभीर बाब आहे.'



त्यांनी यावेळी अवैध धंद्यांकडे लक्ष वेधत सांगितले की, 'अकोल्यात खुलेआम गांजा, चरस, गोगो व अवैध दारू यांची सर्रास विक्री होत असून, आता ही विक्री केवळ पानपट्ट्यांपुरतीच मर्यादित नसून रेशनच्या दुकानांमध्ये सुद्धा होत आहे. ही परिस्थिती धक्कादायक असून, युवापिढी अमली पदार्थांच्या विळख्यात अडकत आहे. त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असून, याला जबाबदार कोण?'

आ. पठाण यांनी यावेळी जोरदार मागणी केली की, 'पोलिस विभागामध्ये अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे पोलीसांची कार्यक्षमता मर्यादित राहते. ही रिक्त पदे तातडीने भरावीत. तसेच गेल्या दहा वर्षांपासून प्रलंबित असलेला अकोला पोलिस आयुक्तालयाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा.'

त्यांनी विधानसभेत जोरदार आवाजात सांगितले की, 'गुन्हेगारांना भीती राहिलेली नाही. पोलिस यंत्रणेवर जनतेचा विश्वास उडत चालला आहे. कायदा व सुव्यवस्था राखणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे कडक उपाययोजना केल्या नाहीत, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती आहे.' परिणामी तात्काळ कडक उपाययोजना करण्यात याव्या अशी मागणी आ. पठाण यांनी केली.

# सहकारी संस्थांची एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ च्या पार्श्वभूमीवर सहकार मंत्रालय भारत सरकार यांच्या निर्देशानुसार साजऱ्या होणाऱ्या सहकार सप्ताह (१ ते ६ जुलै २०२५) अंतर्गत ५ जुलै २०२५ रोजी (सहकार मंत्रालय भारत सरकार वर्धापन दिन) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे जिल्हा पातळीवरील क्षेत्रीय कार्यालय असलेल्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम या कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील अधिनस्त असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी, कर्मचारी, सर्व तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे गटसचिव यांचेकरीता प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था संगणकीकरण, सीएससी बाबत राजेंद्र पडघान (जिल्हा व्यवस्थापक, सीएससी इंडिया लि.), ई-ऑडिट विनायक राऊत (डीसीओ, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा वाशिम) तसेच इंदुजा लि. कंपनीमार्फत मदर डेअरी च्या वतीने दूध संकलन व निविष्ठा केंद्र चालविणेबाबत गणेश ढाकणे (इंडिया डेअरी, यवतमाळ) यांचेकडून मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच, उपस्थित पदनिर्देशित अधिकारी यांचेसोबत प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था च्या प्रभावी अंमलबजावणीकरीता चर्चा करून त्यांचे अभिप्राय घेण्यात आले व त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करुन आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या.

या कार्यशाळेला अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शंकर कोकडवार (जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्ड वाशिम) हे मान्यवर उपस्थित होते.

आर. आर. सावंत (सहाय्यक निबंधक, प्रशासन, अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम) यांचेसह वाशिम जिल्ह्यातील सर्व तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्थांचे अधिकारी, कर्मचारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सर्व कर्मचारी व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे गटसचिव उपस्थित होते.

# उद्यानविद्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने भव्य पशु लसीकरण

■ प्रतिनिधी | जळगाव जामोद ■


डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलंग्नीत स्वातंत्र्यवीर गणपतराव इंगळे उद्यानविद्या महाविद्यालय जळगाव जामोद येथील विद्यार्थ्यांनी चांगेफळ गावामध्ये गुरांचे लसीकरण राबविले. पशु वैद्यकीय दवाखाना संग्रामपूर व स्वातंत्र्य वीर गणपतराव इंगळे उद्यानविद्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लसीकरण शिबीर ४ जुलै रोजी चांगेफळ येथे घेण्यात आले. सदर शिबीरात शेतकऱ्यांना फर्या, लंपी व इतर रोगांबद्दल



मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पशु आरोग्य विमा या विषयावरही सखोल असे मार्गदर्शन शेतकऱ्यांना देण्यात आले. या वेळी डॉ. अजिस पटेल (पशुधन विकास अधिकारी), डॉ. आमले व पशुधन पर्यवेक्षक डॉ. गणेश बोचरे, डॉ. प्रवीण भारसाकडे व पशु सेवक जुबेर शेख, संग्रामपूर आणि सर्व ग्रामस्थ व इतर शेतकऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर शिबीराला उद्यानविदया महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश गवई, महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रितेश वानखडे आणि विस्तार शिक्षण विषयाचे विषयतज्ञ जिव्हेश साळी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या करिता विद्यार्थी प्रतिनिधी मयूर खवले, अथर्व मोहरील, आदेश ठोंबरे, आदित्य खोंड, ऋतिक नागे, आदित्य धाडवे यांनी अथक परिश्रम घेतले. या शिबीरात ९५ ते १०० गाई ,बैल आणि म्हशी यानां लसीकरण करण्यात आले.

## आषाढी एकादशीनिमित्त विठुरायाच्या चरणी रांगोळी अर्पण




**वाशिम :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठोबा रुख्मिणी मातेच्या चरणी भक्तिभावाने रांगोळी साकारण्यात आली. ही रांगोळी कला संस्कार कथक आणि ड्रॉइंग फाउंडेशनच्या संचालिका सौ. राधिका मनिष मंत्री यांनी साकारली असून त्यांनी विठुरायाच्या चरणी ही कलाकृती अर्पण केली. रांगोळीच्या माध्यमातून त्यांनी भक्ती, श्रद्धा आणि आपल्या कलेची साधना व्यक्त केली.

# जिल्ह्याच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी निर्धारबद्ध पावले उचलावीत - जिल्हाधिकारी

## दक्षता व नार्को समितीची बैठक संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील प्रशासनात पारदर्शकता निर्माण करणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच अंमली पदार्थविरोधी उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दक्षता व संनियंत्रण समिती आणि नार्को समितीच्या संयुक्त बैठका आज दि.७ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात पार पडल्या.

या बैठकीस पोलीस अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी, समाज कल्याण विभाग, आरोग्य विभाग, महसूल विभाग, शिक्षणाधिकारी आदी विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील विविध विभागांतील प्रलंबित तक्रारी आणि



नागरिकांच्या अडचणी यावर सविस्तर चर्चा झाली. यावेळी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी संबंधित विभाग प्रमुखांना वेळेत व कार्यक्षमतेने काम पार पाडण्याचे निर्देश दिले.

नार्को समितीच्या बैठकीत जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुरू असलेल्या उपाययोजना, पोलिस विभागाची कारवाई, तसेच युवकांमध्ये जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. शालेय व महाविद्यालयीन पातळीवर व्यसनमुक्तीसंदर्भात विशेष मोहिमा राबवाव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले.

शासनाच्या विविध योजना, सुविधा आणि जनतेच्या तक्रारींचे वेळेवर निराकरण होण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने सजग राहून काम करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी दक्षता व नैतिकतेचा अवलंब महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

महिला व बालविकास विभागाचा आढावा घेताना जिल्ह्यातील शाळकरी मुलांमध्ये व्यसनांचे घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी १४४६० (महिला हेल्पलाईन) व १०९८ (बालहक्क संरक्षणासाठीची चाईल्ड हेल्पलाईन) या क्रमांकांचा व्यापक प्रचार करण्याचे निर्देश देण्यात आले. नागरिकांनी या क्रमांकांचा वापर करून त्वरित तक्रार नोंदवावी, असे आवाहनही बैठकीतून करण्यात आले.

शासनाच्या विविध योजना, सुविधा आणि जनतेच्या तक्रारींचे वेळेवर निराकरण होण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने सजग राहून काम करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी दक्षता व नैतिकतेचा अवलंब महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २२४ ■ बुधवार ९ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# विकासकामांचे वाटप महिला सहकारी संस्थांना करण्याचे विचाराधीन - मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम** : राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निर्णयानुसार १० लाख किमतीपर्यंतच्या विकासाच्या कामांचे वाटप मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांना करण्यात येते. महिला सहकारी संस्थांची नोंदणी करण्याची परवानगी शासनाने दिली आहे. यापुढे अशा कामांचे वाटप महिला सहकारी संस्थांना करण्याचाही शासनाचा विचार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

माजलगाव (जि. बीड) येथील पाटबंधारे विभागातील कामांच्या वाटपाबाबत सदस्य प्रकाश सोळंके यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेदरम्यान सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विकासाची कामे वाटप करण्याबाबत अधिक पारदर्शकपणा आणण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती गठित करण्यात येईल. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार कामांच्या वाटपात सुसूत्रता, पारदर्शकता आणण्यात येईल.



लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, माजलगाव पाटबंधारे विभागाकडे ६ मध्यम, ५३ लघु आणि ७ कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे असे एकूण ६६ प्रकल्प आहेत. या माध्यमातून ८७ हजार ९९३ सिंचन क्षेत्राच्या व्यवस्थापनाचे काम या विभागामार्फत सांभाळले जाते.

या विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी १० लक्षपेक्षा कमी किमतीच्या अत्यावश्यक एकूण १४८ कामांची प्रापनसूची मंजूर करण्यात आली. कामांच्या वाटपाचा चौकशी अहवाल १५ दिवसाच्या आत सादर करण्याच्या सूचना देण्यात येतील. अहवालानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल, असेही श्री. पाटील यांनी सांगितले.

# गिरडच्या शाळेत विद्यार्थी उभारणार देशी बियाणे बँक

## केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांचा संकल्प; बीज दान अभियानाला उत्फूर्त प्रतिसाद



**समुद्रपूर जनमाध्यम**

तालुक्यातील गिरड येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रीय शाळेत बीज दान अभियानातर्गत विद्यार्थ्यांनी बीज उत्सव मंगळवारी ता. ८ जुलै रोजी साजरा केला.यावेळी विद्यार्थ्यांनी शाळेत देशी बियाणे बँक उभारण्याचा संकल्प केला. तर शाळा परिसरात पोषण वाटिका तयार करण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेतला. मगन संग्रहालय समितीच्या नैसर्गिक शेती विकास केंद्राच्या वतीने देशी बिज संकलन आणि बीज दान अभियान १२ जुलै पर्यंत आयोजित केले आहे. या अभियानात परीसरातील १३ शाळांनी सहभाग नोंदविला असून शेतकरी, महिला या अभियानात सहभागी होत उत्फूर्त प्रतिसाद देत आहे.

> निसर्ग घटकांच्या आणि शेतीच्या विषयावर विद्यार्थ्यांना बाल वयात विषय आवड निर्माण करने काळाची गरज आहे. आणि या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मितीचे विचार रुजविणे आणि कृतिशीलतेतून कार्य करून घेणे. हा अनुभव विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनासाठी मोलाचा आहे. **नारायण आडकीने** मुख्याध्यापक गिरड

केंद्रीय शाळेत आयोजित बीज दान कार्यक्रमात १२० विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी नैसर्गिक शेती विकास केंद्राचे प्रमुख गजानन गारघाटे, कार्यक्रम संयोजक विष्णू ब्राम्हणवाडे, सचिन उरकुडे, मुख्यध्यापक नारायण आडकीने, शिक्षक एम. आर. धनविजय, एस व्ही मरसकोल्हे, पी.डी. साबरे, शिक्षिका उषा गुडघे, एस यु गजभिये, डी.पी. पिसरवार यांची उपस्थिती होती.

शालेय विद्यार्थ्यांनी देशी बियाण्यांचे पाहुण्यांच्या हस्ते पूजन करून घेतले. विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या बियाण्यांचे प्रदर्शन आणि माहिती प्रस्तुत केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी शाळेतच बीज बँक उभारण्याचा संकल्प केला. बीज दान अभियानात संकलित केलेले बियाणे दान केले. यावेळी शाळेच्या शिक्षकांनी मागील वर्षातील पोषण वाटीका निर्मितीचा अनुभव कथन केला. तर उपस्थित पाहुण्यांनी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सामुहिक गीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# पोलीस यांनी विशेष मोहीम राबून ६ अवैध दारू विक्रेत्यांवर केली कारवाई

## १ लाख ८७ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त



हिंगणघाट जनमाध्यम : तालुक्यातील अल्लीपुर पोलीस स्टेशनच्या हद्दीत होणारे सण उत्सव शांतेत पार पडण्याचे उद्देशाने विशेष वॉश आऊट मोहीम राबवून अवैध व चोरटी दारू विक्री करणारे ६ आरोपींवर ठाणेदार विजयकुमार घुले यांनी आपल्या पोलीस चमु सोबत वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करून देशी , विदेशी व मोहा रसायन सडवा व मोहा दारूचे एकूण १८७२००. रु चा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळविला. पोलिसांनी या विशेष कारवाई मध्ये दीपक नान्ने रा. कात्री, चंद्रमणी सूर्यभान कांबळे रा. कानगाव,कैलास नान्ने रा कात्री, प्रीतम विनायक घुसे रा. एकुर्ली सागर करपे रा. शिरुड या सहा आरोपी विरुद्ध दारूबंदी कायदा अन्वये गुन्हे नोंद केले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, सहायक पोलीस अधीक्षक राहुल चव्हाण यांचे मार्गदर्शन खाली ठाणेदार विजयकुमार घुले, पोलीस उपनिरीक्षक खेडेकर व पोलीस आमदार अजय रिठे, जमादार रवी वर्मा व अन्य कर्मचाऱ्यांनी संयुक्तरित्या केली.

# कोरोना काळात बंद झालेली नागपूर-सिंदी रेल्वे बस सेवा पूर्ववत होणार

## आमदार समीर कुणावार यांच्या निवेदनाची परिवहन मंत्र्यांनी घेतली त्वरित दाखल



**हिंगणघाट जनमाध्यम:** कोरोना काळात बंद झालेली नागपूर-सिंदी रेल्वे बस सेवा पूर्ववत सुरु करण्यासाठी अनेक दिवसापासून असलेली मागणी अखेर आमदार समिर कुणावार यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना भेटून निवेदन करून पूर्ण करून घेतली. मंत्री महोदयांनी लगेच नागपूर येथील संबंधित आगाराच्या अधिकाऱ्याला आदेश केले.या बससेवेची मागणी भाजपाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष राजू गंधारे व भाजपा नेते अमोल सोनटक्के यांनी लावून धरल्यामुळे आमदार समिर कुणावार यांनी लागलीच दखल घेतली हे विशेष

सदर बस नागपूर वरून सकाळी ९ वाजता व रात्री ८ वाजता सुटेल. या बससेवेचा फायदा विद्यार्थ्यांना व बुट्टीबोरी औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्यां कामगारांना, व्यापाऱ्यांना सोयीचा होईल.

# बोरगाव गिट्टी खदान परिसरात संततधार पावसामुळे रस्ते चिखलमय

## गट विकास अधिकारी यांना मनसे चे निवेदन



**वर्धा जनमाध्यम** : मागील काही दिवसा पासुन संततधार पावसाचा जोर चालू असल्यामुळे बोरगाव मेघे येथील गिट्टी खदान परिसरातील रस्ते चिखल मय झाले आहे, या रस्त्यावर वाहन धारक. शाळेत जाणारी मुले. यांना या रस्त्यावरून जाण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. हि बाब लक्षात घेता. मनसे तालुका अध्यक्ष धर्मदीप हिवरकर. तालुका उपाध्यक्ष जीवन पोहनकर. यांनी वर्धा जिल्हा अध्यक्ष शंकर पोटफोडे. जिल्हा उपाध्यक्ष नितीन अमृतकर यांचा नेतृत्वात. मुरूम टाकण्या करिता कर्तव्य दक्ष गट विकास अधिकारी यांना निवेदन सादर केले. त्यांनी वेळ न गमावता ग्राम सेवकला बोलावून त्वरित त्या रस्त्यावर मुरूम टाकण्याचे आदेश दिले,

# अनय पंडित यांनी अवघ्या तेराव्या वर्षात पाचवे पुस्तक प्रकाशित केले



**वर्धा जनमाध्यम-** येथील दंत चिकित्सक डॉ. श्रीरंग व डॉ. रुचा पंडित यांचा मुलगा अनय पंडित याने वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी पाचवे पुस्तक लिहिले. निसर्ग, पर्यावरण आणि समाजाविषयी अतिशय संवेदनशील असणाऱ्या अनयचे पाचवे पुस्तक बाजारात आलेले आहे.

अनय भुगाव येथील भवन्स लॉयड्स विद्या निकेतनमध्ये नववीत शिकतो. वयाच्या आठव्या वर्षी त्याने कवितेच्या क्षेत्रात पाऊल ठेवले आणि आतापर्यंत पाच कविता संग्रह प्रकाशित केले आहेत. त्यांचे पाचवे पुस्तक 'पोयट्री व्हेव्ज' नुकतेच प्रकाशित झाले आहे. त्यात जागतिक नेते, क्रीडा, आई आणि निसर्गाचे रक्षण इत्यादींवर ३६ कविता आहेत. यापूर्वी त्याने माय गाईन ऑफ वर्सेस पोएट्री ट्रायल्स, मीस मेरी झिंग सेटस ऑफ पोएट्री अ?ण्ड पोएटीक हायू ही पुस्तकं त्याने लिहिली आहेत. विशेष म्हणजे त्याचे पाचही पुस्तकं अमेझॉन आणि फ्लिपकार्टवर उपलब्ध आहेत. त्याच्या पुस्तकांसाठी त्याची इंडिया अ?ण्ड एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने नोंद घेतली.

अनयला कवितांबरोबरच विज्ञान, गणित प्रविण्य आणि गणित प्रज्ञा स्पर्धा परीक्षा, विविध सामान्य ज्ञान आणि पर्यावरण क्विझ क्षेत्रातही उल्लेखनीय यश मिळाले आहे. त्याला होमी भाभा सुवर्णपदक, इस्रो-व्हीआयबीएचए क्विझमध्ये प्रथम क्रमांक, विद्यार्थी विज्ञान मंथनमध्ये जिल्हा प्रथम, एमएस सिग्नेचर पुरस्कार जयपूर तसेच २५० कविता विविध मासिकांत प्रकाशित झाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अ?पवर आतापर्यंत १० हून अधिक कविताही त्याच्या आल्या आहेत. त्याच्या कविता निसर्ग, पर्यावरण, देशभती आणि सामाजिक जागृतीवर आधारित आहेत.

# कृषी संजीवनी सप्ताहाचे यशस्वी आयोजन

## कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांच्या बांधावर



**वर्धा जनमाध्यम** : हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त, साजरा होणाऱ्या कृषी दिनाच्या अनुषंगाने, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, सेलसूरा यांनी दि. ०१ ते ०७ जुलै दरम्यान 'कृषी संजीवनी सप्ताह' साजरा केला.

देवळी तालुक्यातील दिघी, बोपापूर, गौळ, इसापूर तसेच आर्वी तालुक्यातील जांभुळधरा आणि हिंगणघाट तालुक्यातील मनसावळी या गावांमध्ये हा सप्ताह आयोजित करण्यात आला. मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख आणि मा. संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. धनराज उंदिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या शेतीशी संबंधित समस्यांचे निराकरण करणे हा होता. खरीप हंगामा दरम्यान सतत च्या पावसामुळे ताणाचा प्रादुर्भाव दिसून येतो. हे तण अतिप्रमाणात वाढू देऊ नये व पिकांची काळजी घेताना तणनाशकांचा वापर करून अधिक उत्पन्न घ्यावे असे आवाहन वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांनी या प्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना केले.

आदर्श गाव निर्मितीसाठी दत्तक घेतलेल्या दिघी गावाचे सरपंच श्री. संदीप दिघीकर यांनी कृषी विज्ञान केंद्राबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या मते, कृषी विज्ञान केंद्र शेतकऱ्यांना एक आधार वाटू लागले आहे, कारण त्यांच्यामार्फत आयोजित प्रशिक्षण आणि मेळाव्यांमुळे नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत आहे. बोपापूर येथील पोलीस पाटील श्री. सचिन वडतकर यांनीही कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांनी गावातील शेतकऱ्यांना शेती व उद्योगातील समस्यांवर सातत्याने तांत्रिक मार्गदर्शन केल्याबद्दल कौतुक केले.

खरीप हंगाम दरम्यान कपाशी, सोयाबीन व तूर पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापन विषयी कृषिविद्या विषयतज्ञ डॉ रुपेश झाडोदे यांनी तर कीड व रोग नियंत्रण, जैविक खतांचा उपयोग या विषयी पीक संरक्षण विषयतज्ञ डॉ निलेश वझीरे यांनी मार्गदर्शन केले. रोजच्या आहारात ताज्या भाज्यांमुळे शरीरास भरपूर जीवनसत्वे व खनिजे मिळतात. या दृष्टिकोनातून महिलांना घरच्या घरी आठवड्याच्या सात प्रकारच्या भाज्या मिळाव्या म्हणून परसबाग लावणे आवश्यक आहे अशी माहिती गृहविज्ञान विषयतज्ञ डॉ प्रेरणा धुमाळ यांनी दिली. शेतीसोबतच कुक्कुटपालन व दुग्ध व्यवसाय देखील अधिक उत्पन्न मिळविण्याचा मार्ग आहे तसेच पावसाळ्यात जनावरांची काळजी कशी घ्यावी व जनावरांच्या लसीकरणाचे महत्व याविषयी पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विषयतज्ञ डॉ सचिन मुळे यांनी मार्गदर्शन केले. पीक पेरणी करताना रुंद वरंबा- सरी चा उपयोग केल्यास पाण्याचा निचरा चांगला होतो व दुबार पेरणीचे संकट टाळता येऊ शकते अशी माहिती कृषि अभियांत्रिकी विषयतज्ञ डॉ सविता पवार यांनी दिली.

सदर साप्ताहिक कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचलन विस्तार शिक्षण विषयतज्ञ डॉ अंकिता अंगाईतकर यांनी केले. कृषि दिनाचे औचित्य साधून शेतकऱ्यांचा बांधावर शास्त्रज्ञांनी भेटी देऊन पिकांची पाहणी केली व उपाययोजना सुचविल्या तसेच अतिथींच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता श्री आशिष दिघीकर, श्री विजय सिडाम, कु सुनीता मुरार, कु प्रीती नेमाडे, कु यामिनी घुघुसकर, श्री रमेश ढोकणे, श्री गजेंद्र मानकर, श्री वैभव चौधरी, कु ऋतुजा कोरडे तसेच गावातील शेतकरी बंधू, भगिनी व ग्रामीण कृषि जागरुकता कार्यानुभवाचे विद्यार्थी यांनी मोलाचे योगदान दिले.

# इको क्लब च्या वतिने वृक्षारोपण



**वर्धा जनमाध्यम** : विनायक उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांद्वारे इको क्लबच्या माध्यमातून वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापक रिता वानखेडे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक प्रतिनिधी पूजा नेव्हल तर पर्यावरण आणि शिक्षण! विषयावर, मार्गदर्शक म्हणून पंकज वंजारे उपस्थित होते.

विनायक उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या इको क्लबची स्थापना करण्यात आली आहे. या अंतर्गत शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. प्रास्ताविकात पूजा नेव्हल यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी 'पर्यावरण आणि शिक्षण' विष?यावर पंकज वंजारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी वृक्षांची मानवाला असलेली लाखो वर्षांपासूनची साथ समजावून देत मार्गदर्शन केले. रिता, वानखेडे यांनी वृक्ष आपले मित्र असून त्यांच्याशी आपण मैत्री जपली पाहीजे, असे आवाहन केले संचालन नितीन जाधव तर आभार वैशाली घोडखांदे यांनी मानले.

# चोरी करणाऱ्या महिलेस न्यायालयाने सुनावली सात दिवसांची कोठडी

**वर्धा जनमाध्यम-** गोंदिया जिल्ह्यातील दाम्पत्य वर्ध्यातील सेवाग्राम रेल्वे स्थानकावर ९ वर्षांपूर्वी आले होते.बस स्थानकाच्या मार्गाने त्यांच्या जवळील तीन महिलांनी दागिने पळविले होते.याप्रकरणी एक महिला आरोपीला प्रथमच न्यायालयाने सात दिवसांचा साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहेत.तर दोन महिलांची निर्दोष मुक्तता केली आहे. गोंदिया जिल्ह्यातील डोंगरगाव येथील मंगला राधेश्याम मडावी वय (३५) या पती व मुलांसह गोंदिया वरून रेल्वेने सेवाग्राम रेल्वे स्थानकावर १४ एप्रिल २०१६ रोजी आले होते.त्यानंतर त्या दाम्पत्यांना वर्धा बस स्थानक येथे यायचे असल्यामुळे त्यांनी सेवाग्राम रेल्वे स्थानकावरुन ऑटो धरला आणि ऑटो मध्ये बसून येत असताना, आरोपी सविता संजय लोंढे,दीपा खंडारे व सपना सुरपाम सर्व रा पूलफैल,वर्धा या तीन महिलांनी फिर्यादीच्या बॅग मधून तीस हजार रुपये



किंमतीचे दागिने पळविले होते.याप्रकरणी वर्धा शहर ठाण्यात आरोपींविरुद्ध तक्रार नोंदविण्यात आली.आरोपी महिलांना अटक करीत प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले. पौरवी अधिकारी बंडू डडमल यांनी साक्षीदारांना न्यायालयात हजर करीत शासकीय अभियोक्ता ज्योती लकडे यांनी साक्ष नोंदवून घेतली. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरीत मुख्य न्यायदंडाधिकारी जि. व्ही.जांगडे यांनी दोन महिला आरोपींची निर्दोष मुक्तता केली तर सविता लोंढे या मुख्य आरोपी महिलेला कोर्ट उठे पर्यंत शिक्षा व ५ हजार रुपये दंड दंड न भरल्यास सात दिवसांचा साधा कारावासाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहेत.


# स्थानिक गुन्हे शाखेने पकडला दोन लाखांचा गांजा

**वर्धा जनमाध्यम** - शहरात दिवसेंदिवस अमली पदार्थांची विक्री जोर धरत आहेत.पुन्हा शहरात दोन आरोपींकडून सव्वा दोन लाखांचा अडीच किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.अशातच पोलीस अधीक्षकांनी चक्क याकडे लक्ष वेधून घेतले असून,अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

विद्यार्थी अमली पदार्थांच्या आहारी गेली आहेत. याकडे चक्क पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी लक्ष वेधून घेतले असून, अमली पदार्थांवर अंकुश ठेवण्याकरिता पथकाला कठोर निर्देश दिले आहे. या अनुषंगाने गजानन नगर परिसरात एका महिलेच्या घरामधून अमली पदार्थांची विक्री होत असल्याची पथकाला गोपनीय माहीती मिळताच धडक कारवाई करण्यात आली. यामध्ये मुख्य महिला आरोपी प्रणाली श्रीकांत भिसे उर्फ प्राणाली धीरज लेंडे वय (२५) रा वॉर्ड नंबर १ गजानन नगर व मयूर गजानन नाकाडे वय (२४) रा हनुमान गड गिरीपेठ पिपरी मेघे वर्धा या दोघांना ताब्यात घेण्यात आले. दोघांकडून २ लाख १२ हजार ९४० रुपये किमतीचा २ किलो ५५६ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. तर या आरोपींनी रवींद्रसिंग उर्फ कालू लखनसिंग जुनी रा गोसावी नगर बुटीबोरी याचे कडून गांजा विकत आणला असे सांगण्यात आले.ही कारवाई पोलीस अधिक्षक अनुराग जैन यांचे निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पो.उपनि. उमाकांत राठोड, प्रकाश लसुंते, पो.अं. नरेंद्र पाराशर, अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, निलीमा उमक, रवि पुरोहित, अक्षय राऊत, मिथुन जिचकार, मुकेश ढोके सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा वर्धा व फॉरेन्सिक विभागाचे स.फौ. अनिल साटोणे व पो.हवा. मंगेश धामंदे यांनी केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय





# विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद रिक्त

## विरोधकांची सरकारवर टीका; विधिमंडळात पाय-यांवर आंदोलन



**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहीण योजना अशा अनेक मुद्द्यांवरून विरोधक सत्ताधारी पक्षाला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत. यातच विरोधी पक्षनेते पद अद्यापही रिक्त असल्यावरून विरोधकांनी नाराजी व्यक्त करत सरकारवर निशाणा साधला.सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश महाराष्ट्राच्या विधान भवनात येत असताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवणा-या सरकारचा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विधिमंडळाच्या पाय-यांवर आंदोलन करून निषेध केला. विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद रिक्तठेवणे हे विधिमंडळाच्या प्रथा-परंपरांना साजेसे नाही, त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकला, असे सांगत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली. यासंदर्भात विजय वडेट्टीवार यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे.

विरोधी पक्षनेते पदाबाबत महाविकास आघाडीतील आमदारांची बैठक पार पडली. त्यामध्ये भास्कर जाधव, अजय चौधरी, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड विजय वडेट्टीवार, सतेज पाटील हे आमदार उपस्थित होते. या बैठकीनंतर विरोधी पक्षनेते पदाचा मुद्दा सभागृहात मांडण्याचा निर्णय घेण्यात आला. विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय कधी घेणार? हा प्रश्न विधानसभा अध्यक्षांना सभागृहात विचारण्यात आला. याच मुद्द्यावरून विरोधी पक्षाचे आमदार आक्रमक झाले. लवकरात लवकर विरोधी पक्षनेतेपदाची निवड करण्यात यावी, अशी मागणी आमदारांनी केली. महाविकास आघाडीचे आमदार सभागृहातून थेट बाहेर येऊन त्यांनी विधान भवनाच्या पाय-यांवर आंदोलन केले. दरम्यान, गेल्या चार महिन्यांपासून विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहे. विधानसभा अध्यक्षांकडे पाठपुरावा करूनही त्यावर निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे आता हा प्रश्न सभागृहात मांडा, असे आदेश शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आमदारांना दिले, असे समजते. विधिमंडळाच्या नियमानुसार विरोधी पक्ष नेते पद शिवसेनेला मिळावे, अशी मागणी आघाडीने सातत्याने सरकारकडे केली. विधानसभा अध्यक्षांना पत्र व्यवहार केला. परंतु, अध्यक्षांकडून अद्याप अधिकृत निर्णय झालेला नाही. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी आमदारांसोबत चर्चा केली.

## महाराष्ट्रातील सहा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण होणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** बंदरे आणि लॉजिस्टिक क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी कौशल्य विकास विभाग, बंदरे विभाग आणि अटल साल्युशेन यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. नेदरलँड्स, डेन्मार्क आणि पोलंडमधील विदेशी पतसंस्था या सामंजस्य करारातंर्गत १२० कोटी रूपयांची गुंतवणुक करणार आहेत. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, बारामती, सिंधुदुर्ग, नागपूर आणि नाशिक मधील सहा निवडक आयटीआय संस्थाचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. दरवर्षी ५००० ते ७००० विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या कौशल्यांचे प्रशिक्षण मिळून रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.विधानभवन येथे कौशल्य विकास विभाग,बंदरे विभाग आणि अटल सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, एम.डी अटल सोल्युशन इंटरनॅशनल बीव्ही नेदरलँडचे व्यवस्थापकीय संचालक एडविन सिएसवर्दा,



रु रल एन्हासन गरु पचे अंबर आयदे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, वाढवण बंदर विकास कंपनी लिमिटेडचे संचालक उन्मेष वाघ, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.प्रदीप, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वाढवणसारख्या मोठ्या प्रकल्पात आता रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील. या करारामुळे आवश्यक मनुष्यबळ निर्मिती होउन तरु णांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळतील. कौशल्य विभागाने खासगी आणि सार्वजनिक भागीदारी धोरणातून महाराष्ट्राला कौशल्य प्रशिक्षण क्षेत्रात महत्वाचे स्थान मिळवून दिले आहे. आजच्या करारामुळे राज्यातील तरु णांना वाढवणच नाही तर इतर ठिकाणीही रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असा विश्वास आहे. बंदरे क्षेत्रातील कौशल्य विकासात महाराष्ट्र जागतिक ओळख निर्माण करेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## विकासकामांचे वाटप महिला सहकारी संस्थांना करण्याचे विचाराधीन-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निर्णयानुसार १० लाख किमतीपर्यंतच्या विकासाच्या कामांचे वाटप मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांना करण्यात येते. महिला सहकारी संस्थांची नोंदणी करण्याची परवानगी शासनाने दिली आहे. यापुढे अशा कामांचे वाटप महिला सहकारी संस्थांना करण्याचाही शासनाचा विचार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

माजलगाव (जि. बीड) येथील पाटबंधारे विभागातील कामांच्या वाटपाबाबत सदस्य प्रकाश सोळंके यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेदरम्यान सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विकासाची कामे वाटप करण्याबाबत अधिक पारदर्शकपणा आणण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती गठित करण्यात येईल. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार कामांच्या वाटपात सुसूत्रता, पारदर्शकता आणण्यात येईल.

लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, माजलगाव पाटबंधारे विभागाकडे ६ मध्यम, ५३ लघु आणि ७ कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे असे एकूण ६६ प्रकल्प आहेत. या माध्यमातून ८७ हजार ९९३ सिंचन क्षेत्राच्या व्यवस्थापनाचे काम या विभागामार्फत सांभाळले जाते. या विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी १० लक्षपेक्षा कमी किमतीच्या अत्यावश्यक एकूण १४८ कामांची प्रापनसूची मंजूर करण्यात आली.

## आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातीतील अधिक गरजू युवकांना घेऊ द्यावा-राज्यपाल

**मुंबई/प्रतिनिधी :**अनुसूचित जातीतील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी आता गुणवत्तेवर प्रवेश तसेच नोक-या मिळवण्याचा प्रयत्न करावा व आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातीतील अधिक गरजू युवकांना घेउ द्यावा, असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा ८० वा वर्धापन दिन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ८ जुलै) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले की, पीपल्स एज्युकेशन सोसायटी शैक्षणिक संस्था व वसतिगृहे निर्माण करून लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याचे कार्य करीत असल्याबद्दल संस्थेचे अभिनंदन करताना आज अनुसूचित जातीतील अनेक विद्यार्थी आपल्या गुणवत्तेवर वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवत आहे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न देखील हेच होते, असे सांगून आरक्षण ही विकासाची किल्ली आहे, मात्र विद्यार्थी व युवकांनी आता जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी तयार राहिले पाहिजे. सन २०४७ पर्यंत देश विकसित भारत म्हणून उदयास येईल व ड? आंबेडकर यांचे स्वप्न साकार होईल, असा विश्वास व्यक्त करताना विकास हा सर्वसमावेशक होणे आवश्यक आहे, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते संस्थेचे दोन माजी विद्यार्थी - राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील तसेच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या २० व्यक्तींना 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

**संस्थेने स्वायत्त विद्यापीठासाठी प्रस्ताव सादर करावा -** मंत्री चंद्रकांत पाटील

आपण पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ महाविद्यालयाचे विद्यार्थी होतो याचा अभिमान वाटतो. राजकीय आणि सार्वजनिक जीवनाची पायाभरणी याच संस्थेमधून झाली आहे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीने गेल्या




८० वर्षांत महाविद्यालये, वसतिगृहे आणि विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून समाजाला शिक्षण दिले आहे. या संस्थेने स्वायत्त विद्यापीठ होण्याचा प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्वायत्त विद्यापीठ झाल्यास संस्थेला नवनवीन अभ्यासक्रम राबविता येतील असे सांगून मंत्री श्री. पाटील यांनी संस्थेच्या विकासासाठी शासनाच्यावतीने सहकार्याची ग्वाही दिली.

## शिक्षकांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू-शालेय शिक्षण मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**वस्तीशाळा शिक्षकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून सामावून घेण्यात आल्यानंतर शासन निर्णयानुसार या शिक्षकांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (डीसीपीएस) लागू झाली असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली. यासंदर्भात सदस्य अभिमन्यू पवार यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य शेखर निकम, नारायण कुचे यांनी सहभाग घेतला. शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले, केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम सुरू केल्यानंतर त्यामधील शिक्षण हमी योजनेमध्ये वस्तीशाळा योजना समाविष्ट करण्यात आली. राज्य शासनाने वस्तीशाळा योजनेबाबत नेमलेल्या अभ्यासगटाने वस्तीशाळांचे प्राथमिक शाळात रूपांतर करण्याच्या आणि दोन वर्षापेक्षा अधिक सेवा करणा-या वस्तीशाळा स्वयंसेवकांना जिल्हा परिषद आस्थापनेवर सामावून घेण्याची शिफारस केली होती. त्यानुसार वस्तीशाळा निमशिक्षकांना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून सामावून घेण्यात आले.

या वस्तीशाळामधील शिक्षकांना आवश्यक ते प्रशिक्षणही देण्यात आले आहे. स्थानिक व महिला उमेदवारांना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे अनेकांना संधी मिळाली.

## वनालगतच्या जमिनींवर सोलार कुंपणाची योजना विचाराधीन- वनमंत्री गणेश नाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** वनालगतच्या जमिनीच्या शेतक-यांना प्रति एकर वार्षिक ५० हजार रु पये देउन शासनाने त्या जमिनी ताब्यात घ्याव्यात आणि सोलार कुंपण घालावे, अशी योजना शासनाच्या विचाराधीन असल्याचे वन मंत्री गणेश नाईक यांनी विधान परिषदेत सांगितले.सदस्य सदाशिव खोत यांनी लातूर जिल्ह्यात जंगली प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होत असल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला.वनमंत्री श्री.नाईक म्हणाले, राज्यात वन्यजीवांची संख्या वाढत आहे. त्याचबरोबर शेतक-यांना त्यांचा त्रास होत आहे, ही बाब खरी आहे. वनक्षेत्रालगत सोलार कुंपणासाठी अर्थसंकल्पात २०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सोलार बनवणा-या कंपन्यांसोबत महाराष्ट्र वन विकास महामंडळामार्फत करार करण्यात येईल. येथे केवळ सोलारच्या माध्यमातून वीज निर्मितीच नव्हे तर वन्य प्राणी खाणार नाहीत आणि आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत तयार होईल असे पाम रोजा नावाचे गवत विकसित करण्याची योजना असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. वनालगत बफर झोन आणि लगतच्या शेतक-यांसाठी सोलार कुंपण घालण्याची चांगली योजना आणत असल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांचे यावेळी अभिनंदन केले. यामाध्यमातून वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमधून नागरिकांचे जीव वाचवण्यास मदत होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## बांधकाम कामगारांच्या पाठिशी शासन खंबीरपण उभे-मंत्री आकाश फुंडकर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारने कामगार, कृषी आणि शिक्षण क्षेत्रात व्यापक निर्णय घेतले असून विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, कायदे व धोरण तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. कामगारांचे हक्क, शेतक-यांची सुरक्षितता आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य या सर्व बाबींमध्ये शासनाने ठोस कृती आरंभलेली असल्याचे उत्तर कामगार मंत्री आकाश फुंडकर, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे आणि शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज विधानपरिषदेत दिले. विधानपरिषद नियम २६० अन्वये विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी मांडलेल्या प्रस्तावाला उत्तर देताना मंत्री बोलत होते. कामगार मंत्री अकाश फुंडकर म्हणाले की, कामगारांच्या कल्याणासाठी निर्णायक पावले उचलली जात असून राज्यातील बांधकाम कामगारांसाठी ३२ कल्याणकारी योजना राबविल्या जात असून, त्यापैकी २२ योजना थेट डीबीटीद्वारे लाभ देणा-या आहेत. बोगस नोंदणी आणि खोटे ठेकेदार यामुळे होणा-या गैरप्रकारांवर आळा बसावा म्हणून कामगारांची बायोमेट्रिक नोंदणी सक्तीची करण्यात आली आहे. ९० दिवसांचे ठेकेदार प्रमाणपत्र बंधनकारक असून, संबंधित कायद्यानुसार त्याची अंमलबजावणी केली जात आहे. प्लॅटफार्म वर्कर्स (जसे झोमॅटो, गिग वर्कर) यांच्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्याचे काम सुरू असून, त्यांना सामाजिक सुरक्षा देण्याची तरतूद या कायद्यात राहणार आहे. गिरणी कामगारांसाठी घरांची योजना आता अंतिम टप्प्यात असून, कामगार विभागाने ९०১ पात्रतेची तपासणी पूर्ण केलेली आहे. आता गृहनिर्माण विभागामार्फत घर वाटप सुरू आहे. सुपरमॅक्स व जनरल मोटर्स या कंपन्यांमध्ये कामगारांवरील अन्यायासंदर्भात सुनावणी सुरू आहे. शासनाने कामगारांच्या बाजूने ठाम भूमिका घेतली असून, कंपन्यांना तोपर्यंत कोणताही दिलासा दिला जाणार नाही, जोपर्यंत कामगारांना न्याय मिळत नाही.राज्यात असंघटित कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, १ कोटी ७० लाखांहून अधिक कामगार



ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत आहेत. त्यांच्या हक्कासाठी ६८ वर्च्युअल बोर्ड तयार केले असून, सामाजिक सुरक्षा योजना अंतिम रूपात आणल्या जात आहेत. बोगस माथाडी कामगार प्रकरणांवर कठोर कारवाई सुरू आहे. संबंधित अधिका-यांवर एसआयटी चौकशीने अहवाल सादर केला असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

**कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञान आणि शेतकरी हिताचे निर्णय**

महाअग्री धोरण २०२५-२९ अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता व आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती क्षेत्रात शाश्वत वाढ सुनिश्चित करण्याचा प्रयत्न आहे. या धोरणासाठी ५०० कोटी रु पये तरतूद करण्यात आली आहे. हवामान, मृदा, बाजारभाव, पिकांची स्थिती आदी डेटा एकत्र करून 'डिजिटल पायाभूत सुविधा उभारली जाणार आहे. फार्मर आयडी प्रणाली अंतर्गत १ कोटी ६ लाखाहून अधिक शेतक-यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. पीएम किसानसह सर्व योजनांसाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आले आहे. राज्यात बोगस खते व बियाण्यांवरील कारवाईसाठी ६२ भरारी पथके कार्यरत आहेत. २०५ अप्रमाणित खत नमुने जप्त करण्यात आले असून, १८३ लाखांचा १०४० टन साठा जप्त करण्यात आला आहे. एकूण ७१ परवाने निलंबित व ६९ रद्द करण्यात आले आहेत. पिक विमा योजनेंतर्गत आतापर्यंत ३२,६२९ कोटी रु पयांची नुकसानभरपाई वितरित झाली असून, ७६১ विमा हप्त्याची परतफेड झालेली आहे. सुधारित योजना राबविल्याने राज्याचा ५००० कोटींचा खर्च वाचला आहे, असे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. किमान आधारभूत किंमत बाबत राज्य सरकारने कापूस, सोयाबीनसह अन्य पिकांकरिता केंद्र सरकारकडे शिफारसी केल्या आहेत. मात्र, केंद्राने अपेक्षित दरांपेक्षा कमी ग्च्छ जाहीर केल्याने राज्य शेतकरी संघटनांमध्ये नाराजी आहे.

## अधिवेशनातून

### मेळघाटातील वन्यप्राणी व पक्ष्यांना मुबलक पाणीसाठा

**मुंबई/प्रतिनिधी :**मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यप्राणी व पक्ष्यांना मुबलक पाणीसाठा उपलब्ध व्हावा, यासाठी ५६१ नैसर्गिक पाणवठे, ४३२ कृत्रिम पाणवठे, २०२ सोलर पंप, २६९ सिमेंट बंधारे, १२३६ मेळघाट बंधारे, १५ निकट बंधारे, ६७ माती बंधारे अशी विविध कामे करण्यात आली आहेत. तसेच ज्या ठिकाणी पाणीपातळी कमी झाली आहे, अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.विधान परिषद सदस्य संजय खोडके यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता, त्यावेळी मंत्री श्री.नाईक यांनी सांगितले की, मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील नैसर्गिक जलस्त्रोत तसेच कृत्रिम पाणवठे माहे एप्रिल २०२५ मध्ये कोरडे पडलेले नाही व पाण्याअभावी कोणत्याही वन्य प्राणी किंवा पक्ष्यांचे मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले नाही.

### गौण खनिजाची अवैध वाहतूक झाल्याची माहिती प्राप्त झाल्यास पुन्हा चौकशी

**मुंबई/प्रतिनिधी :**अकोला जिल्ह्यातील अकोला-काकड रस्ता उभारणी करताना ५६ ब्रास मुरु माची टिप्परद्वारे विना रॉयल्टीने वाहतूक होत असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. एका व्हिडिओवरु न प्राप्त माहितीच्या आधारे संबंधितांना दंड करण्यात आला. यासंदर्भात त्यांनी एक कोटी ६८ लाख रॉयल्टी भरली असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य अमोल मिटकरी यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, हे काम सुरू करताना तेथील एका शेतक-याने शेतात पाणी जात असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे अशी विनंती केल्यावरु न कंपनीने तेथील मलबा उचलून इतरत्र नेला असून याबाबत अधिकची माहिती उपलब्ध झाल्यास त्याबाबत पुन्हा चौकशी करण्यात येईल, असे महसूल मंत्री श्री.बावनकुळे यांनी सांगितले.

### कोळसा वाहतुकीमुळे पिकांची होणारी नुकसानभरपाई ठरवण्यासाठी समिती गठीत

**मुंबई/प्रतिनिधी :** कोळसा वाहतुकीमुळे होणा-या नुकसानीबाबत शेतक-यांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानाच्या धोरणासाठी अपर मुख्य सचिव (मुख्यमंत्री सचिवालय) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यांमध्येही अशाच स्वरूपाच्या तक्रारी लक्षात घेता, मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून समिती गठीत करण्यात येईल अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य किशोर जोरगेवार यांनी प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री श्री. देसाई म्हणाले, कोळसा वाहतुकीमुळे होणारे पिकाच्या नुकसान भरपाईच्या संदर्भामध्ये यापूर्वी यवतमाळ जिल्ह्यातल्या काही तक्रारी प्राप्त झाल्यानंतर मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने अतिरिक्त मुख्य सचिव अतिरिक्त मुख्य सचिव मुख्यमंत्री सचिवालय यांच्या अध्यक्षतेखाली एक सहा सदस्यांची समिती यवतमाळ जिल्ह्यासाठी गठीत करण्यात आली. याच धर्तीवर चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांसाठी समिती गठीत करण्यात येईल. ही समिती तीन महिन्यात या नुकसान भरपाई संदर्भात विभागाला अहवाल सादर करेल या समितीचा अहवाल सादर करताना त्या क्षेत्रातील लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा देखील विचार करण्यात येईल.

### पोकरातील अनियमितता प्रकरणी चौकशी सुरू

**मुंबई/प्रतिनिधी :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत जालना उपविभागाअंतर्गत शेडनेट हाउस या घटकांची अंमलबजावणी करताना उल्लंघन झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. या अनियमितता व गैरव्यवहार प्रकरणी चौकशी प्रक्रिया १५ दिवसात पूर्ण होणार असून चौकशीअंती संबंधित अधिका-यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली.विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात पोकरा योजनेत झालेल्या अनियमिततेबाबत प्रश्न विचारला होता. सदस्य सदाभाउ खोत, भाई जगताप यांनी यात उपप्रश्न विचारले, त्यावेळी ते बोलत होते.कृषि मंत्री श्री.कोकाटे यांनी सांगितले की, उपविभागीय कृषी अधिकारी शीतल चव्हाण यांना १० जुलै २०२३ रोजी झालेल्या बैठकीत पदोन्नती मंजूर करण्यात आली होती. त्यानंतर श्रीमती चव्हाण यांना उपविभागीय कृषी अधिकारी या पदावरून अधीक्षक कृषी अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आली. तथापि, पोकरा योजनेत शेडनेटसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिका-यास निलंबित करण्यात आले आहे.ते पुढे म्हणाले की, या अनुषंगाने सखोल तपासणी करण्यासाठी पथके स्थापन करण्यात आली असून जालना जिल्ह्यातील ३२५८ शेडनेटपैकी २३५८ शेडनेटची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित ९०० प्रकरणांची तपासणी पुढील १५ दिवसांत पूर्ण केली जाईल.

### दिव्यांग कल्याण विभागातील सर्व रिक्त पदे पुढील तीन महिन्यात भरणार

**मुंबई/प्रतिनिधी : :** शासनाकडून विविध स्तरांवर दिव्यांग कल्याणासाठी कार्यवाही सुरू आहे. नुकतेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेउन विभागीय स्तरावर निर्णय घेण्यात आले आहेत. आतापर्यंत ३३ पदांवर नियुक्त्या झाल्या असून उर्वरित भरती प्रक्रिया सुरू असून पुढील तीन महिन्यात सर्व रिक्त पदे भरण्यात येतील, अशी माहिती दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री श्री. सावे बोलत होते. यावेळी सदस्य सर्वश्री प्रसाद लाड, भाई जगताप, परिणय फुके, शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सदाशिव खोत यांनी चर्चेत सहभाग घेतला. मंत्री श्री. सावे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार पुढील तीन महिन्यांत सर्व जिल्ह्यांमध्ये अधिका-यांची नियुक्ती पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सात एप्रिल रोजी झालेल्या बैठकीचा आढावा घेत पुढील आठवड्यात सर्व संबंधित अधिका-यांकडून लेखी अहवाल मागवण्यात आला आहे. दिव्यांग शाळांना मान्यता मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या १५ वर्षांच्या कालावधीबाबत शासन सकारात्मक आहे. या निकषांची पूर्तता झालेल्या शाळांना पूर्ण मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याशिवाय दिव्यांगांसाठी नोकरीमध्ये ५ टक्के आरक्षण, परवाना प्रक्रियेमधील अडथळे दूर करणे, तसेच स्थानिक करांमध्ये सूट देण्याबाबत संबंधित विभागांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. सर्व स्तरांवर दिव्यांगांसाठी सकारात्मक निर्णय घेण्यास कटिबद्ध असल्याचेही मंत्री श्री. सावे म्हणाले.

### वन जमिनीवर अतिक्रमण करून धार्मिक स्थळ निर्माण करणा-यांवर फौजदारी कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** वन जमिनीवर अतिक्रमण करून अनधिकृत धार्मिक स्थळ निर्माण केल्या असल्याच्या तक्रारी येत आहेत. यासाठी वन जमिनींवरील अतिक्रमणाबाबत पुढील दोन महिन्यात माहिती संकलित करण्यात येईल. अतिक्रमित जमिनींवरील अनधिकृत धार्मिक स्थळ निर्मितीच्या बाबी तपासून अशांवर फौजदारी खटला दाखल करून कारवाई करण्यात येईल, असा इशारा वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला. वन जमिनींवरील अतिक्रमण करून अनधिकृत धार्मिक स्थळ निर्मिती बाबत सदस्य प्रवीण दटके यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या उत्तरात वन मंत्री श्री. नाईक म्हणाले, वन जमिनीवर अतिक्रमण करीत धार्मिक स्थळ निर्माण करणा-या संस्थावरील कारवाईसोबतच बांधकाम करणा-या व्यक्तींवरही कारवाई करण्यात येईल. अशा अनधिकृत बांधकामावर कारवाई न करणारे किंवा सहकार्य करणा-या अधिका-यांवर चौकशी करून कारवाई करण्यात येईल.

### पीक विमा उतरवला नाही म्हणून शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहणार नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत शेतक-यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून नुकसान भरपाई म्हणून मदत दिली जाते. नुकसान झाले तर विमा कंपनीवर अवलंबून न राहता शासनामार्फत मदत दिली गेली पाहिजे, ही शासनाची भूमिका असून पीक विमा उतरवला नाही म्हणून शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहणार नाही, असे कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधान परिषदेत सांगितले.सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यातील शेतक-यांना मंजूर करण्यात आलेल्या पीक विमा रकमेबाबत प्रश्न विचारला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सतेज उर्फ बंटी पाटील यांनी सहभाग घेतला. राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील यापूर्वी शेतक-यांना झालेल्या नुकसानीच्या पीक विम्यासंदर्भात भरपाई दिली गेली आहे. उर्वरित ६९,९५४ विमा अर्जांसाठी ८९.८० कोटी इतकी अतिरिक्त विमा नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. ही रक्कम येत्या ३ ते ४ दिवसात वित्त विभागाकडून दिली जाईल, असे राज्यमंत्री जयस्वाल यांनी यावेळी सांगितले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# अमेरिका पार्टी

अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी टोकाचे वैर झालेले एलॉन मस्क यांनी अखेर परवा एका नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली. अर्थात जगातील सर्वात श्रीमंत पार्टीची स्थापना झाली. त्यांच्या या पार्टीचे नाव आहे अमेरिका पार्टी. अमेरिकेच्या राजकारणात मोठं वादळ निर्माण झालं. विशेषत: आधी त्यांनी लोकांकडून कौल मागवला होता आणि अमेरिकेतील द्विपक्षीय पद्धतीला आव्हान म्हणून तिसरा पक्ष अमेरिकेच्या राजकीय आखाड्यात उतरवणारा निर्णय घेतला. पण मस्क यांच्या नव्या राजकीय पक्षाचे भवितव्य काय? असा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर औत्सुक्याचा ठरतो आहे. भारतातही अनेक राजकीय पक्ष आले आणि गेले आणि त्यातील काहीच टिकले. बहुपक्षीय लोकशाही असतानाही इथे काहींच्या पक्षाला भविष्य उरले नाही. त्यापैकी एक तर आपण पाहिलेच की, भारतात जनता पक्षाची शकले उडाली आणि त्यातील 'एक वहा गिरा, एक वहा गिरा' अशी अवस्था झाली. आज त्या पक्षांचे अस्तित्वही नाही. पण अमेरिकेच्या द्विपक्षीय लोकशाही व्यवस्थेत तिसरा पक्ष सामील होत आहे आणि तो कितपत टिकेल हे अद्याप समजले नाही. कारण अद्याप हा पक्ष आकारास आला नाही. पण मस्क यांनी हे आव्हान स्वीकारले आणि त्यात नव्या पक्षाचे अस्तित्व नुसते टिकवणेच नव्हे, तर यशस्वी होऊन दाखवणे हेही अवघड आव्हान आहे. मस्क यांच्या नव्या पक्षामुळे त्यांना अमेरिकेतील जनतेत किती लोकप्रियता आहे हे स्पष्ट समजेल. कारण ट्रम्प यांच्या धोरणांमुळे बहुतेक अमेरिकावासी नाराज आहेत. आज अमेरिका दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे आणि अशा परिस्थितीत अमेरिका एकपक्षीय राजवटीत आहे. जे की लोकशाही नाही तर मस्क यांनी म्हटले आहे की, मी अमेरिकन लोकांना तुमचे स्वातंत्र्य परत द्यायला आलो आहे. एकेकाळचे जिगरी दोस्त आणि ट्रम्प यांचे जवळचे सहकारी मस्क यांच्यामुळेच यंदाच्या अध्यक्षीय निवडणुकीत ट्रम्प जिंकू शकले होते. पण नंतरच्या दिवसांत दोन्ही वरिष्ठांमध्ये वाजले आणि ट्रम्प यांनी मस्क यांना त्यांचा बाडबिस्तारा गुंडाळून व्हाईट हाऊसच्या बाहेर जायला सांगितले. हा अपमान सहन न होऊन मस्क यांनी लगेच दुसऱ्या नव्या पक्षाची स्थापना करण्याची घोषणा केली. अर्थात नवीन पक्ष स्थापन करण्याची घोषणा केली असली तरीही मस्क यांना लगेच निवडणूक रिंगणात उतरता येणार नाही.कारण त्यांना फेडरल निवडणूक आयोगाकडे आपल्या पक्षाची नोंदणी करावी लागेल आणि मग कदाचित पुढील वर्षी त्यांना निवडणुकीत उतरता येईल. पण त्यांनी ट्रम्प यांना आव्हान दिले आहे हे मात्र नक्की. अर्थात ट्रम्प यांच्यापेक्षा मस्क यांच्यापुढे जास्त अवघड आव्हाने आहे. मस्क यांचा आरोप आहे की, अमेरिकने काँग्रेस देशाला दिवाळखोर बनवत आहे आणि आपण ते उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाही.आधुनिक अमेरिकन राजकारणात द्विपक्षीय व्यवस्था हेच तर अमेरिकन राजकारणाचे ठळक वैशिष्ट्य आहे. पण यापूर्वी कित्येक बिलिनिअर्सनी प्रभावी राजकीय पक्ष स्थापन करण्याचा प्रयत्न केला पण अमेरिकन द्विपक्षीय व्यवस्थेला ते पराभूत करू शकलेले नाही. हाच विश्वास आहे की, ज्यामुळे ट्रम्प यांनी मस्क यांच्या नव्या पक्षाची घोषणा होताच काहीही प्रतिक्रिया दर्शवली नाही. नंतर ते म्हणाले की, मस्क यांनी तिसरा पक्ष स्थापन करणे हे हास्यास्पद आहे. २०२४ च्या निवडणुकीत मस्क यांनी ३०० दशलक्ष अब्ज डॉलर रिपब्लिकन उमेदवारांवर खर्च केले. ही मदत मस्क यांनी का केली, तर ट्रम्प यांचा पक्ष विजयी व्हावा म्हणून. त्यामुळे नंतर दोन नेत्यांमध्ये जे घडले ते सर्वत्र घडते तसेच घडले आणि उभय नेत्यांमध्ये वितुष्ट आले. पण मस्क यांचा निर्णय अमेरिकेच्या द्विपक्षीय व्यवस्थेला धक्का देणारा आहे, यात काही शंका नाही. कारण इंग्लंड असो, की अमेरिका, तेथे आजवर द्विपक्षीय व्यवस्थाच काम करत होती. क्वचित हा पराभूत व्हायचा किंवा दुसरा सत्तेवर यायचा. पण बहुपक्षीय लोकशाही व्यवस्था म्हणजे काय याचा अनुभव आता अमेरिकेला येईल. आता यापुढील महत्त्वाचा प्रश्न समोर आला आहे तो म्हणजे, मस्क यांच्या नव्या पक्षाचे नेतृत्व कोण करणार. टकर कार्लसन, मार्जोरी टेलर आणि थॉमस मॅसी ही तीन नावे असू शकतील. मुळात हा वाद राजकीय नाहीच, तर श्रेष्ठत्वाचा आहे. मस्क यांनी ट्रम्प यांच्या अध्यक्षीय निवडणुकीत प्रचंड कष्ट केले आणि ट्रम्प यांना जिंकून आणले. पण ट्रम्प यांनी त्यांचे उपकार न स्मरता मस्क यांचा पाणउतारा केला आणि त्यांना व्हाईट हाऊस सोडून जायला सांगितल्याची चर्चा आहे. पण काहीही असले तरीही कालचे मित्र आज एकमेकांचे शत्रू झाले, हे मात्र निश्चित. मस्क यांच्यावर ट्रम्प यांचे विजयी होणे अवलंबून होते, तरीही ट्रम्प यांच्याकडेही काही पॉवर्स आहेत, ज्यामुळे मस्क यांनाही मोठा फटका बसू शकतो. कारण मस्क यांचे व्यवसाय अब्जावधी डॉलर्सच्या कंत्राटावर अवलंबून आहेत. त्यामुळे ट्रम्प जितके अडचणीत आहेत तितकेच मस्कही आहेत. त्यामुळे अमेरिकेला नवीन राजकीय पक्ष मिळाल्याचे समाधान मानावे की भारतासारखेच अमेरिकेसारखेही संपन्न राष्ट्री अराजकाच्या मार्गाने चालले आहे याबद्दल खेद व्यक्त करावा या द्विधा मन:स्थितीत अमेरिकन जनता सापडली आहे. आता अमेरिकन राजकारणात एका नव्या खेळाडूची एन्ट्री होत असल्याने आणि तेही मस्क यांच्यासारखा एकेकाळचा ट्रम्प यांचा मित्र असलेला नेता त्यात असल्याने अमेरिकन राजकारणाला नवी दिशा दिली जाईल का, हाच प्रश्न आहे. जग ट्रम्प अधिकाधिक कर लादण्याच्या राजवटीवर अडून बसले असल्याने त्यातच आता या नव्या राजकीय पक्षाची भर पडली आहे. त्यामुळे आणखी काय होणार या चिंतेत जग सापडले आहे.

# युद्धकाळ आणि गुंतवणूक

**रशिया आणि युक्रेनदरम्यानचा संघर्ष हे आज सोन्याच्या किमतीवर परिणाम करणारे सर्वांत महत्त्वाचे युद्ध ठरले आहे. रशियाने युक्रेनवर हल्ला करताच सोन्याच्या किमती लक्षणीय रीत्या वाढल्या आणि आजही त्या जास्त आहेत.**



युध्दाचा परिणाम या भागात अडकलेल्या दुर्दैवी लोकांच्या जीवनावर होतोच, पण संघर्ष क्षेत्राबाहेरील लोकांच्या जीवनावरही याचा लक्षणीय परिणाम होतो. व्यापारातील अडथळे असोत, प्रवासात व्यत्यय असोत किंवा इतर घटक असो; युद्धामुळे प्रत्येकाचे जीवन प्रभावित होते आणि युद्ध जितका जास्त काळ चालते आणि संघर्ष जितका खोलवर पोहोचतो.तितके जास्त लोक प्रभावित होतात.

सोने आधीच एक लोकप्रिय सुरक्षित आश्रयस्थान आहे आणि मंदी आणि वाढत्या महागाईच्या भीतीमुळे हजारो लोकांनी आधीच सोन्याने त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे; पण युद्धामुळे सोन्याची मागणी आणखी वाढू शकते, कारण लोक अनिश्चित काळात स्थैर्य शोधतात. युद्धाचा सोन्याच्या किमतीवर परिणाम होण्याचे तीन मार्ग येथे आहेत. लोकांना आर्थिक कल्याणाची भीती वाटू लागते, तेव्हा ते बहुतेकदा त्यांना माहीत असलेल्या किंवा परिचित असलेल्या गोष्टींकडे जातात. बऱ्याच प्रकरणांमध्ये याचा अर्थ सोन्याच्या सुरक्षिततेकडे जाणे असा होतो. अनेक लोकांना सोन्याचे अनेक फायदे माहीत नसतील; परंतु त्यांना अशी जन्मजात जाणीव असते, की सोने बाळगल्याने व्यवहार सोपे होऊ शकतात. सोने पोर्टफोलिओमध्ये विविधता आणण्यास मदत करू शकते. आर्थिक बाजारपेठ कोसळल्यावर होणाऱ्या नुकसानापासून ते संपत्तीचे संरक्षण करण्यास मदत करते.

### सोने दीर्घकाळ मूल्य राखते

सोने महागाईपासून बचाव म्हणून काम करू शकते.कारण ते दीर्घकाळ आपले मूल्य राखते.इतर मालमत्ता मूल्य गमावत असतात तेव्हा ते मूल्य मिळवू शकते. लोकांना आपल्या मालमत्तेचे मूल्य कमी होण्याची भीती वाटू लागते. तेव्हा लोक सोन्याचाच आधार घेतात. युद्ध सुरू होण्याची किंवा सुरू राहण्याची भीती जितकी जास्त असेल, तितके सोन्याचे भाव वाढू शकतात कारण अधिकाधिक लोक ते खरेदी करण्याचा प्रयत्न करतात. युद्धाची तीव्रता हा सोन्याच्या किमतीवर परिणाम करणारा घटक आहे. युद्ध जितके जास्त काळ चालेल, तितके लोक स्वतःचे रक्षण करण्यासाठी सोने खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकतात. रशिया आणि युक्रेनदरम्यानचा संघर्ष हे आज सोन्याच्या किमतीवर परिणाम करणारे सर्वांत महत्त्वाचे युद्ध ठरले आहे. रशियाने युक्रेनवर हल्ला करताच सोन्याच्या किमती लक्षणीय रीत्या वाढल्या आणि आजही त्या जास्त आहेत. आतापर्यंत आपल्याला युद्धाची सवय झाली असली, तरी नवे युद्ध भडकणे सोन्याची किंमत अधिक वाढवू शकतात. सोन्याच्या किमतींवर परिणाम करणारा दुसरा संघर्ष म्हणजे मध्य पूर्वेत सुरू असलेला संघर्ष, युक्रेनमधील संकट हे सोन्याच्या किमतीवर परिणाम करू शकणारे एकमेव संकट नाही. पुढील काही वर्षांमध्ये चीन तैवानवर ताबा मिळवण्यासाठी प्रयत्न करेल. चीन हा सोन्याचा एक प्रमुख उत्पादक आणि ग्राहकदेखील आहे. त्यामुळे भविष्यात चीनशी संबंधित कोणताही संघर्ष निःसंशय पणे सोन्याच्या किमतीवर परिणाम करेल.

### संघर्षाचा सोन्याच्या किमतीवर परिणाम

युद्धाच्या परिणामांची भीती असल्याने पाश्चिमात्य लोक अधिक सोने खरेदी करत असल्याने सोन्याच्या किंमतीवर परिणाम होऊ शकतो. चिनी सोन्याचे उत्पादन जागतिक बाजारपेठेत उपलब्ध नसल्यामुळे किंवा चिनी खरेदीदार स्वतःचे रक्षण करण्यासाठी अधिक सोने खरेदी करत असल्यानेही असा परिणाम होऊ शकतो. कारण काहीही असो, भविष्यात होणारा कोणताही संघर्ष प्रमुख सोने उत्पादकांशी संबंधित असण्याची दाट शक्यता असून त्याचा सोन्याच्या किमतीवर परिणाम होऊ शकतो. भविष्यातील भू-राजकीय संघर्षाचा सोन्याच्या किमतीवर थेट परिणाम होऊ शकतो. केवळ युद्धाचा परिणाम म्हणून नाही तर, भविष्यातील कोणत्याही संघर्षाच्या परिणामी येऊ शकणाऱ्या आर्थिक आणि वित्तीय प्रणालीमध्ये होणाऱ्या बदलांचा परिणाम म्हणून देखील हे घडू शकते. रशिया आणि चीन अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करत आहेत. जागतिक आर्थिक व्यवस्थेचे भविष्य सोन्याच्या आधारावर चालणाऱ्या चलनांच्या आंतरराष्ट्रीय महत्त्वावर अवलंबून असू शकते; पण काहीही झाले तरी भविष्यात सोन्याच्या किमतीत वाढ होईल असे सर्व काही सूचित करते. वाढती अनिश्चितता, संघर्षाची शक्यता हे सर्व घटक सोन्याच्या किमतीत वाढ होण्यास मदत करू शकतात. इराण आणि इस्त्रायलमधील युद्धबंदी करारानंतर सोन्याची जागतिक किंमत दोन आठवड्यांच्या नीचांकी पातळीवर गेली. एमसीएक्स सोन्याची किंमतही २.४२ टक्क्यांनी घसरली. अमेरिकन डॉलर निर्देशांक एका आठवड्याच्या नीचांकी पातळीवर आला. यामुळे सोने अधिक आकर्षक बनले आहे.

### चांदीच्या किमतीत जागतिक वाढ

दुसरीकडे, बेंचमार्क दहा वर्षांचे ट्रेझरी उत्पन्नदेखील एक महिन्यापेक्षा जास्त काळातील सर्वात कमी पातळीवर आहे. या दोन्ही कारणांमुळे आज सोन्यात वाढ झाली आहे. सोन्यासोबतच चांदीच्या जागतिक किमतीतही वाढ दिसून आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजार अनिश्चित लाटांवर हेलकावे खात असते.तेव्हा शेअर बाजारा-प्रमाणे कॉंडिटी बाजार भावांवरदेखील त्यांचा परिणाम होत असतो. इस्त्रायल आणि इराण हे १२ दिवसांचे घनघोर युद्ध सुरू असताना शेअरबाजार आपटला. युद्ध संपले तेव्हा सेन्सेक्स ९०० अंशांनी भडकला. मात्र अजूनही रशिया-युक्रेन आणि इस्त्रायल विरुद्ध हमास ही युद्धे थांबलेली नाहीत. त्यामुळे वातावरण अस्थिरच आहे. जगातील मध्यवर्ती बँका येत्या बारा महिन्यांच्या कालावधीत सुवर्णसाठ्यात वाढ करत राहतील, असा अंदाज जागतिक सुवर्ण परिषदेने व्यक्त केला आहे.२०२५ च्या सेंट्रल बँक्स गोल्ड रिझर्व्ह अहवालानुसार ४३ टक्के मध्यवर्ती बँका पुढील वर्षात त्यांच्या सोन्याच्या साठ्यात भर घालण्याची योजना आखत आहेत. दीर्घकालीन मूल्याच्या साठवणुकीसाठी, गुंतवणुकीत वैविध्य आणण्यासाठी आणि संकटकाळात चांगला रिटर्न मिळावा अशा तीन प्रमुख कारणांमुळे सोनेखरेदीला प्राधान्य दिले जात असते. सध्या सुरू असलेल्या जागतिक राजकीय घडामोडींमुळे अर्थव्यवस्था ताणाखाली येत आहेत. अनेक देशांची निर्यात कमी होत असून जगातील दळणवळण आणि आयात निर्यात व्यापार कमी झाला आहे. म्हणूनच सुरक्षित गुंतवणुकीचे साधन म्हणून सोनेखरेदीला प्राधान्य दिले जात आहे.

### सोने-चांदीत गुंतवणूक करण्याकडे कल

वेगवेगळ्या देशांमधील मध्यवर्ती बँकांनी आपल्याकडील सोन्याचा साठा वाढवत नेला असून २०२४ मध्ये त्यात ४१ टक्के वाढ झाली आहे. सोन्याच्या किमतीने २०२५ मध्ये उच्चांकी पातळी गाठली आहे.

व्याजदरात टप्प्याटप्प्याने होणारी घट आणि भाववाढ यामुळे सोन्या-चांदीत गुंतवणूक करण्याचा कल वाढत आहे. हे लक्षात घेतले पाहिजे.


इराणच्या अणुतळांवर अमेरिकेने केलेल्या हल्लयांमुळे डॉलरमधली गुंतवणूक वाढली. डॉलर मजबूत झाल्यामुळे सोन्याच्या दरांवर परिणाम झाला, पण गेल्या पाच महिन्यांमध्ये सोन्याच्या भावात भारतात वाढ झाली आहे.

गेल्या सलग चार महिन्यांमध्ये भारतात किरकोळ भाववाढीच्या दरात नरमाई दिसून आली. परंतु मुख्य चलनवाढीचा दर वधारत आहे. अशा वेळी अनियमितपणे चढ-उतार होत राहणाऱ्या अन आणि ऊर्जा घटकाप्रमाणेच सोन्यालाही मुख्य चलनवाढीच्या मापनातून वगळले जावे, अशी सूचना क्रिसिल या पतमापन संस्थेने केली आहे. ग्राहक किंमत निर्देशांकात सोन्याचा भारांक एकूण निर्देशांकाच्या १.१३ इतकाच आहे. परंतु मुख्य चलनवाढीत सोन्याचा समावेश असल्याने देशांतर्गत दरवाढीबाबतचे संकेत बिघडू शकतात, असे क्रिसिलचे मत आहे. त्यामुळे सोन्याची तेजी किरकोळ महागाईच्या मापनात मोजली जाऊ नये, असे या संस्थेचे मत आहे. पण जगातील प्रमुख मध्यवर्ती बँकांच्या कोअर निर्देशांकात सोन्याचा समावेश हा असतोच. अर्थात त्याचे भारमान कमी असल्यामुळे कोअर चलन-वाढीच्या मापनावर त्याचा परिणाम सीमितच राहतो.

इतर देशांच्या तुलनेत सोन्याला भारतात अधिक मागणी असल्याने त्याचा निर्देशंकातील वाटाही जास्त आहे आणि त्यातून कोअर निर्देशांकाबाबत गैरसमज पसरवणारे संकेत जातात, असे क्रिसिलचे मत आहे. मात्र तरीदेखील बँक ठेवी, समभाग, कर्जरोखे यांच्याप्रमाणेच सोन्यामध्येही काही प्रमाणात गुंतवणूक करणे, श्रेयस्करव असते, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

**महेश जोशी**

# पोशिंदा 'कंगाल' पीक विमा कंपन्या 'मालामाल'



२०१६ ते २०२४ या पीक विमा कंपन्यांनी सात हजार एकशे कोटी रुपयांचा नफा कमावला तर सुमारे बत्तीस हजार कोटी रुपयांची नुकसानभरपाई शेतकऱ्यांना दिल्याची माहिती कृषी मंत्र्यानी विधान परिषदेत नुकतीच दिली. दरवर्षी अवकाळी पाऊस, वादळे, हवामानातील बदलामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकाचे नुकसान होते आणि मोठ्या अपेक्षेने बळीराजा पीक विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाईची आशा बाळगतो, मात्र याबाबत शेतकऱ्यांच्या हाती निराशाच पडते आणि कधीकधी नाममात्र नुकसान भरपाई मिळून शेतकऱ्यांची क्रूर थट्टाच केली जाते. शिवाय नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतकऱ्यांना मोठे दिव्य पार पाडावे लागते. पीक विमा योजनेचे निकष, नियम हे वारंवार बदलले जातात आणि ते शेतकऱ्यांच्या हिताचे न ठरता शासन प्रशासन यांच्यातील झारीतील शुक्राचार्य, विमा कंपन्या यांच्या फायद्याचे ठरतात. राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना पीक विमा योजनेचा कारभारदेखील काही प्रमाणात कारणीभूत आहे. विदर्भ, मराठवाडा याबरोबरच उत्तर महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्याप्रमाणावर आजही होत आहेत. गेल्या तीन महिन्यांत विदर्भात २५१ आणि ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे खुद्द सरकारनेच मान्य केले आहे.

कोणतीही शासकीय योजना चांगल्या उद्देशाने आणली तरी या योजनांचे अंतस्थ हेतू आणि खरे लाभार्थी मात्र वेगळेच असतात आणि यात लूट होते ती सरकारच्या म्हणजेच जनतेच्या तिजोरीची आणि जनतेची. गेल्या काही वर्षांपासून दरवर्षी होणाऱ्या अवर्षणामुळे शेतकऱ्यांना काहीतरी नुकसान भरपाई मिळावी या चांगल्या उद्देशाने पीक विमा योजना सुरू करण्यात आली. मात्र खरोखरच याचा फायदा अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना होतो की अन्य कोणाला, असा प्रश्न पडतो. शेतकरी वर्गाला मदत व्हावी आणि शेतीचे उत्पादन वाढावे यासाठी केंद्र व राज्य सरकारमार्फत अनेक योजना राबविण्यात येतात. जिल्हा बँका तसेच राष्ट्रीयीकृत बँका यांच्यामार्फत कमी व्याज दराने वित्तपुरवठा केला जातो, त्याचबरोबर विविध प्रकारचे अनुदान (सबसिडी) दिली जाते. त्याचबरोबर हवामानाच्या परिणामांमुळे शेती उत्पादनाच्या होणाऱ्या नुकसान भरपाईसाठी 'पीक विमा' (प्रधानमंत्री बीमा फसल) योजना राबविण्यात येते. याद्वारे शेतात लावलेल्या पिकाचा विमा उतरविला जातो. ज्या शेतकऱ्यांनी सरकारी बँका अथवा इतर बँकांकडून कृषी कर्ज घेतले असते, त्यांना हा विमा काढणे अनिवार्य केले जाते, तर ज्यांनी कर्ज घेतले नाही, तेदेखील या योजनेचा लाभ घेऊ शकतात. वर वर ही 'कृषी विमा' योजना शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविली जात असल्याचा गाजावाजा केला जातो, सरकारकडून या योजनेच्या जाहिरातीचा मोठा भडीमार केला जातो.

या योजनेमध्ये शेतकऱ्याला विमा रकमेच्या एक ते दोन टक्क्यांपर्यंत प्रिमियम भरावा लागतो. तसेच राज्य सरकारे आणि केंद्र सरकार साधारणपणे प्रत्येकी आठ टक्क्यांचा भार उचलून विमा कंपन्यांना १८ ते २० टक्क्यांचा प्रिमियम दिला जातो. अर्थातच हा प्रिमियम सरकार जनतेच्या कररूपाने जमा झालेल्या पैशातूनच दिला जातो. देशभरात पीक विमा उतरविणाऱ्या साधारणपणे दहा खाजगी विमा कंपन्या आहेत. पण जेव्हा शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची वेळ येते तेव्हा, अनेक निकष लावून, अटींची पूर्तता करूनदेखील अगदीच नगण्य, तुटपुंजी रक्कम शेतकऱ्याच्या पदरात पडते, हा दरवर्षीचा अनुभव शेतकऱ्यांना येतो. याबाबतीत भारत सरकारचीच संस्था असलेल्या महालेखापाल (CAG) च्या २०१७ साली प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टमध्ये विस्ताराने खुलासा केला गेला आहे.कोणीही तोट्याचा धंदा करणार नाही की समाजसेवा म्हणून व्यवसाय करणार नाही. योग्य तो नफा कमावण्यास कोणाचाही आक्षेप नसावा. मात्र गेल्या काही वर्षांपासून पीक विमा कंपन्या या अवाच्या सवा नफा कमावतात आणि शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसतात हा अनुभव आहे.

दरवर्षी शेतकऱ्यांना दिली जाणारी किरकोळ नुकसान भरपाई हा आजवरचा अनुभव आहे. त्याच वेळी पीक विमा कंपन्या, नोकरशहा, दलाल हेच मालामाल होतात. एक रुपयात विमा योजना ही चांगल्या उद्देशाने आणली गेली असली तरी बीड पॅटर्नने या योजनेचे खरे लाभार्थी कोण ठरत आहेत हे आता अधोरेखित झाले आहे. पीक विमा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी काढावा यासाठी सरकार आणि सगळेच जाहिरातबाजी करतात, पण नुकसान भरपाईच्या वेळी शेतकऱ्यांच्या हातात 'रेवडी' पडते. एकीकडे या विमा कंपन्या आपल्या तुंबडया भरत आहेत,तर दुसरीकडे जगाचा 'पोशिंदा' सर्व बाजूंनी नाडला जाऊन आपले जीवन संपवत आहे. शेतकऱ्यांच्या नावाने इतरच लाभार्थी ठरत असतील तर याला आळा घालण्यासाठी कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. मात्र अशी कारवाई केली जावी अशी ना कोणाची प्रामाणिक इच्छाशक्ती ना मानसिकता. या वर्षी तर दोनच विमा कंपन्यांना पीक विमा योजना राबविण्याची परवानगी देण्यात आली आहे, तर एक रुपयात विमा योजना सरकारने गुंडाळली आहे.

**अनंत बोरसे**

## चोरावर मोर...

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. रॅली, सभा, मेळाव्यांसह नेते पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेत निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाच्या कामाचा आढावा घेत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत आहेत. काँग्रेसनेही बिहार निवडणुकीसाठी आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. विधानसभेच्या निवडणुकीत महिला मतदारांना आकर्षित करण्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने काही उपक्रम हाती घेतले आहेत. मात्र, ऐन निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसच्या एका उपक्रमा वरून बिहारच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले आहे. काँग्रेसने सॅनिटरी नॅपकिन्स वाटण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. मात्र, त्या सॅनिटरी नॅपकिन्सच्या पाकिटावर काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा फोटो छापण्यात आल्यामुळे प्रचंड वाद सुरू झाला आहे. जेव्हा काँग्रेस पक्ष भाजप वर दोषारोप करत होती तेव्हा आपल्या पक्षात तसलेच दोष असण्याची शक्यता असेल याचा विचार त्यांच्या नेतृत्वाला शिवला नसेल. म्हणूनच बिहार मधील महिलांसाठी काँग्रेस द्वारा निवडणूक पूर्व वाटपाच्या नॅपकिन्सच्या पाकिटावर काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा फोटो छापण्यात आला आता त्याला काय म्हणणार याला म्हणतात 'चोरावर मोर'.

**अविनाश देशपांडे**

## इस्त्रायल-इराण युद्धाला शांतता हाच योग्य पर्याय

गेल्या अनेक वर्षांपासूनचा इस्त्रायल-इराणमधला संघर्ष आता जणू निर्णायक टप्प्यावर आला असल्याचे म्हणता येऊ शकते. यामागे धार्मिक कारणे तर आहेतच. शिवाय इराण हा पॅलेस्टाईनचा समर्थक आहे. आणि इस्त्रायल-पॅलेस्टाईन यांचे जुने वैर आहे. आणि याच मुद्दावरून इराणकडून इस्त्रायला आण्विक शस्त्रांची धमकी दिली जात असते. इराणच्या या ब्लॅकमेलिंगचा कायमचा बंदोबस्त करण्याच्या उद्देशाने हा संघर्ष सुरु झाला. मधल्या काळामध्ये इराणने लष्कर ए तोयबा पासून अनेक दहशतवादी संघटनांना पैसा आणि शस्त्रपुरवठा केला होता. ज्याची बरीच मोठी किंमत इस्त्रायलला मोजावी लागली होती. आणि हाच दहशतवाद मोडून काढण्यासाठी इस्त्रायलने आपली तगडी अशी मोसाद नावाची यंत्रणा स्थापन केली. या मोसादने अनेक दहशतवादी संघटनांचे कंबरडे मोडण्याचा प्रयत्न केला होता.

इराणने प्रत्युत्तर म्हणून केलेल्या हल्ल्यामुळे युद्ध भडकणार यामुळे संपूर्ण जग चिंतेत होते. मात्र डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांबरोबर संवाद साधून युध्द विरामाची घोषणा केली गेली. पण तरीही इराणने इस्त्रायलवर हल्ले केले. आता दोन्ही देशांमध्ये युद्धविराम झाल्याने शांतता प्रस्थापित करून चर्चेचे मार्ग खुले होण्याची गरज आहे. रशिया आणि चीनने इराणच्या बाजूने उभे राहून या युद्धात अमेरिकेला शह देण्याचा प्रयत्न केला. महासत्ता या युद्धात प्रत्यक्षात उतरली असती तर तिसरे महायुद्ध भडकवण्यास वेळ लागले नसते. मात्र ऐन निर्णायक क्षणी शांततेचा मार्ग स्वीकारण्यात आल्यामुळे जगासमोरील संकट दूर झाले. आणि हे योग्यच झाले. इराण-इस्त्रायलप्रमाणेच रशिया आणि युक्रेनमध्ये चाललेले युद्ध थांबवण्यासाठी अधिक प्रयत्न झाले पाहिजे. युद्ध हे जागतिक अस्थैर्याचे कारण ठरू शकते. युद्धात केवळ सीमा जिंकल्या जातात. पण माणसे, संस्कृती, शांततेने आणि सहकार्याने कोणतेही कठीण प्रश्न सुटू शकतात. आणि हे शहाणपण युद्धखोर देशांनी शिकायला पाहिजे.

**मधुकर चुटे**
९४२०५६६४०४

## शिक्षणाच्या क्षेत्रात कंत्राटी पद्धतीचा वरवंटा

खासगी अस्थापनेतील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची भरती कंत्राटी पद्धतीने केली जाणार असल्याची घोषणा नुकताच विधीमंडळ अधिवेशनात करण्यात आली आहे. या आधी शिक्षण विभागाने मुलांना शिकवणाऱ्या शिक्षकांची भरती कंत्राटी पद्धतीने केली आहे. आता शाळेतील शिपायांसह अन्य कर्मचारी देखिल कंत्राटी पद्धतीने भरले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शाळेतील अन्य कर्मचारी कंत्राटी पद्धतीनेच भरले जाणार यात दुमत असण्याचे कारण नाही पहिल्यांदा शिक्षकांची आणि चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांची भरती झाली आहे त्याच पद्धतीने ही सुद्धा भरती प्रक्रिया होणार त्यामुळे शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात कंत्राटी पद्धतीचा वरवंटा फिरवून सरकार ज्ञानमंदिरे मोडीत काढत आहे काय ? असा सवाल उपस्थित होतो आहे. उद्याची भावी पिढी निर्माण करणारे आणि जीवनाच्या वाटचालीतील मार्ग सुखर करणारे शिक्षण क्षेत्र या पद्धतीमुळे धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही कर्मचाऱ्यांची नोकरीची हमी नसल्याने शिक्षणाच्या बाबतीत विषेश करुन लक्ष देणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील उणीवा राहुन परीक्षेत मोठ्या प्रमाणात फटका बसायला वाव मिळणार आहे जेवढे मानधन त्याचं पद्धतीने शिक्षक व अन्य कर्मचारी काम करणार त्यामुळे शाळांचा दर्जा घसरणार असून विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे त्यामुळे कंत्राटी धोरण अवलंबतांना गांभीर्याने विचार करणे अपेक्षित आहे.

**राजू जाधव**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# भारतीय जनता पार्टी व नागरीकांच्या वतीने कचरा भेट आंदोलन



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद : नगर परीषद पुसद मधे प्रभाग क्रमांक १४ च्या वतीने मुख्याधीकारी नगर परीषद पुसद यांना भारतीय जनता पार्टी पदाधिकारी पुसद व नागरिकांच्या वतीने नगरपरिषद पुसद मुख्याधिकारी कक्षा बाहेर कचरा टाकुन जाहीर निषेध केला. अत्यंत तिव्रपणे आंदोलन करण्यात आले. यापुर्वी अनेकवेळा निवेदन देऊन भेटी घेऊन, भारतीय जनता पार्टी पुसद पदाधिकारी यांनी वारंवार विनंती केल्या होत्या. परंतु नगरपरिषद पुसद हे गुत्त ठेकेदार यांना सोडायला तयारच नव्हते.

शेवटी आज दि ८ जुलै२०२५ सकाळी ११:०० वाजता सौ. अनिता भारत चव्हाण (पाटील), सौ.स्वातीताई सुभाष पवार माजी नगरसेविका प्रभाग क्रमांक १४ पुसद यांच्या वतीने भाजपा जेष्ठ नेते विनोद जिल्हेवार यांच्या मार्गदर्शनात कै. वसंतराव नाईक चौक पुसद येथुन कचरा गोळा करत स्टेट बँक चौक, नविन पुसद, कोषटवार शाळा, नगरपरिषद पुसद येथे कचराभेट आंदोलन करण्यात आले. नगर परीषद पुसद येथे मुख्याधिकारी यांनी तगडा पोलीस बंदोबस्त असतांनाही भाजपा पदाधिकारी हे नगर परिषद पुसद मधे शिरले, या कचराभेट आंदोलनात भारत पाटील, निखिलभाऊ चिद्दरवार, शाम जोशी, महेश नाईक, अजय पुरोहीत, विश्वास भवरे, रवि मानचंदाणी, दर्शन जोगदंडे, सुरेश तिवारी, शेखर वानखेडे, नारायण पाटील मुडाणकर, योगेश राजे, कैलास गावनर सर, विजय पुरोहीत, माधवराव भरगाडे, गोविंदराव कुकडे, दिपालीताई जाधव, रुपालीताई जयस्वाल, शितलताई उतळे, सुष्माताई भाल, सुभाष पवार, दिलीपमामा रायपुरकर, रमेशसेठ सोमाणी, सुरज कुरील, विक्रांत जिल्हेवार, अभिजीत पवार, महेश काळे, सतीष कानडे, राहुल कुरील तसेच प्रभागातील नागरिक सविताताई परटकर, स्मिता बिडवई, हिनाताई खोडियार, मनिषाताई देशमुख, शिवराजेवार ताई, रश्मिताई करे, संगिताताई भोरे, प्रमिलाताई राव, खोलगडेताई, प्रमोद दिंडे, अभिजीत गंधेवार, गणेश चेलमेलवार, आदित्य सोनी, खेमानंद मेहता, स्वप्निल गवळी, दिपक चिरडे, डॉ किरण तगलपल्लेवार, निखिल गाडेवार येरावार लेआऊट, सह असंख्य नागरिक ललित सेता, अनिल चेंडकाळे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# जिल्ह्यातील उद्योजकांच्या समस्या तातडीने निकाली काढा : जिल्हाधिकारी

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : नवीन उद्योग सुरु करण्यासोबतच अस्तित्वातील उद्योगांना उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करून उद्योग वाढीस प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे जिल्ह्यात नवीन उद्योग येण्यास चांगले वातावरण तयार करण्यासह उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी काम करा. प्रलंबित समस्या तातडीने निकाली काढा, अशा सूचना जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केल्या.

महसूल भवन येथे जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा उद्योग मित्र समितीचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सुशील गरूड, वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, परिवहन, कामगार, पोलिस, भूमि अभिलेख आदी विभागाचे अधिकारी व उद्योजक, औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यातील काही औद्योगिक वसाहतींमध्ये रस्ते, अखंडीत वीज, पाणी व्यवस्था पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याचे उद्योजकांनी सांगितले. काही ठिकाणी भूखंडाची मोजणी, सिमांकन नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. ज्याज्या ठिकाणी आवश्यक सोई सुविधा उपलब्ध नाही तेथे त्या निर्माण करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. मारेगाव, उमरखेड येथे उद्योजकांना भूखंड वितरीत करण्यात आले परंतू या भूखंडाचा ताबा देण्यात आला नसल्याच्या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याच्या सूचना करण्यात आल्या. औद्योगिक वसाहतींमध्ये सुरक्षा, अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण, मजबुतीकरण, स्वच्छता, वसाहतींमध्ये अतिरिक्त भूखंड, उमरखेड येथील औद्योगिक वसाहतीच्या फिडरला देयात आलेले ईतर वीज कनेक्शन, औद्योगिक क्षेत्रात वीज पुरवठा व दुरसंचार कनेक्शन, पुसद औद्योगिक क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा झाली. संबंधित विभागांनी मुद्यांवर वेळेत कारवाई करावे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

# घाटंजीतील शेतकरी अंतराळात!

## यश सलाम याची भन्नाट कल्पना "मिशन शिरिया"

जनमाध्यम प्रतिनिधी




घाटंजी - आजपर्यंत आपण पुस्तकातून, ऐकण्यातून समजलो असेल की अंतराळ काय आहे? तिथली स्थिती कशी आहे? आपण मनावर जरी घेतलं तरी आपण तिथपर्यंत पोहोचत नाही. पण प्रत्येकाचा स्वप्न असते की, आपण तेथे जावं, पण ते प्रत्येकाला शक्यही नसते. मात्र घाटंजी मधील एक शेतकरी अंतराळात गेला. त्याला यश सलाम यांनी पाठविलं. मिशन होतं, मिशन शिरिया.

तर आपण पाहूया मिशन सीरिया काय मिशन आहे. मिशन सीरिया हे एक ॲक्शन कॉमेडी लव्हस्टोरी मूवी आहे, हे मूवी मोबाइलमध्ये शुटिंग करून तयार केली आहे. मूवी मध्ये 3D ॲनिमेशन चा वापर करून वेगवेगळे सिन तयार केले आहे. ही मूवी YouTube वरील Zacky Blaze या नावाचा चॅनेल वरील पाहता येईलच. या मूवी मध्ये नामदेव नावाचा एक शेतकरी अचानक रॉकेटमध्ये बसून सीरिया नावाच्या ग्रहावर पोहचतो, नामदेवला त्या ग्रहावर राहणारे विचित्र लोक भेटतात, आणि त्या ग्रहवरील राहणारी सोफिया नावाच्या एका मुली सोबत नामदेवला प्रेम होते, त्या नंतर नामदेव सोफिया सोबत लग्न करून तिला परत पृथ्वी वर आणतो. अशी ही कहाणी आहे. सदर मुवि तयार करण्यासाठी ५ महिन्याचा वेळ लागला. १ महिने स्टोरी लिहने, सगळी लागणारी वस्तू गोळा करणे आणि लागणारे आवश्यक कपडे शिवणे लागली.

मुवि मधली वेगवेगळी पोषक मुव्ही मधील नामदेव (यश सलाम) यांची आई विद्या सलाम यांनी शिवून तयार केली. आणि त्या नंतर पुढील ३ महिने वेगवेगळ्या ठीकानावरील जाऊन शुटिंग केली. आणि शेवटी १ महिना मुवि मध्ये संगीत देणं, आवाज डबिंग करून आणि 3D ॲनिमेशन तयार करून एडिटिंग केली. या मुव्ही मध्ये कलाकारांमध्ये (हिरो) नामदेव - यश सलाम (हिरोईन) सोफिया - वैष्णवी करनेवार आर्यन - एफनान सय्यद भोला - हेमंत सुंकटवार मोहित - समीर खान. स्टोरी आणि निर्माता - यश सलाम कॅमेरा मॅन - गौरव पटाडे, पोषाख - विद्या सलाम 3D ॲनिमेशन & एडिटिंग - यश सलाम, डबिंग - देवेश डंभारे यां सर्वांनी त्यांची भूमिका अचूकपणे निभावली आहे. मुव्ही निर्माता यश सलाम हा राजीव गांधी चौक घाटी, घाटंजी येथे राहत असून त्याचे शिक्षण - बी.कॉम पदवीधर झालेले आहे. पण त्याला यात रुची असल्याकारणाने त्यांनी सदर मूवी बनवली आहे. मूवी सर्व ठिकाणी प्रसारित झाल्यानंतर आता त्याला त्याच्या अभिनयासाठी जाहिराती सुद्धा मिळू लागल्या आहे. त्याच्या यशाचे कौतुक सर्वत्र होत आहे. सदर ॲनिमेशन फिल्म बघितल्यानंतर लक्षात येते की, सदर मूवी मध्ये दृश्याला दिलेलं बॅकग्राऊंड म्युझिक, दिल फेक संवाद, त्यात केलेले हास्यविनोद व सर्व कलाकारांचा शोभनीय अभिनय पाहिला तर सदर मुव्ही घाटंजीतील कलाकारांनी केली यावर विश्वासही बसत नाही. मात्र ही वस्तुस्थिती आहे. सदर मूवी सध्या सोशल मीडियावर खुप गाजत आहे.

# वीजदर वाढीविरोधात उद्योग-व्यापार आणि ग्राहक संघटनांचे संयुक्त निवेदन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : महाराष्ट्र राज्यात विजेच्या दरात झालेल्या प्रचंड वाढीमुळे संपूर्ण जनतेत चिंता व्यक्त होत आहे. या दरवाढीविरोधात उद्योग, व्यापार, नवीकरणीय ऊर्जा क्षेत्र आणि ग्राहक संघटनांनी एकत्र येत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य वीज नियामक आयोगाला (MERC) विरोध दर्शविला आहे.

संयुक्त निवेदनात म्हटले आहे की, २५ जून २०२५ रोजी MERC ने वीजदर वाढीबाबत सुधारित आदेश जारी केला. ही कारवाई, ग्राहकांकडून आक्षेप मागवण्याची प्रक्रिया न पाळता, गुपचूप करण्यात आली. यामुळे सामान्य ग्राहकांमधून उद्योगांपर्यंत सर्वच स्तरांवर दरवाढीचा मोठा फटका बसला आहे. एलटी ग्राहकांसाठी दरात प्रति युनिट २१.८८ आणि एचटी ग्राहकांसाठी ११.४० ग्रिड सपोर्ट शुल्क लावले गेले आहे. सौर ऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांना पूर्वी २० तासांची मिळणारी बँकिंग सुविधा आता केवळ ८-१० तासांपर्यंत मर्यादित करण्यात आली आहे. सरकार दरकपातीचा दावा करत असले तरी, बिल सिम्युलेशनमध्ये सर्वच श्रेणीत ग्राहकांना जास्त दराने बिल आकारले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. शेती, उद्योग, आणि सामान्य नागरिकांवर परिणाम: संयुक्त संघटनांनी इशारा दिला आहे की, विजेच्या या वाढलेल्या दरामुळे अनेक लघुउद्योग बंद पडण्याच्या मार्गावर असून, नवउद्योग किंवा सौर प्रकल्प सुरू करण्यासही अडथळा येत आहे. घरगुती वापरासाठी विजेची किंमत वाढल्यामुळे सर्वसामान्यांचे बजेटही कोसळू शकते. परिणामी उद्योग स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक अस्थैर्य निर्माण होण्याची शक्यता आहे. संघटनांनी मागणी केली आहे की, MERC ने सुधारित आदेश तत्काळ रद्द करावा आणि जनतेच्या आक्षेपानंतरच अंतिम निर्णय घ्यावा. वीज हे मूलभूत हक्काप्रमाणे सर्वांना परवडणारे हवे, अशी ठाम भूमिका या निवेदनातून मांडण्यात आली आहे.

# पतीने सुरा मारुन केला पण्नीचा खून; पतीला पोलीसांने केले अटक

जनमाध्यम प्रतिनिधी




पुसद - वसंतनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत हाकेच्या अंतरावर असलेल्या टिपू सुल्तान चौक येथे राहत्या घरी पतीने पत्नीला गळ्यावर सुरी मारुन खून केल्याची घटना आज दिनांक 08 जुलै 2025 रोजीच्या रात्री 3(तीन) वाजताच्या दरम्यान दुर्दैवी घटना घडली आहे घटनेने परिसरामध्ये एकच खळबळ उडाली आहे सानिया मोहम्मद आसिफ कुरेशी (लग्नानंतरचे) वय अंदाजे २२ वर्ष रा. टिपू सुल्तान चौक असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे.

आसिफ शफी कुरेशी वय 28 वर्ष रा.टिपू सुल्तान चौक खुन करून अटक झालेल्या पतीचे नाव आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार आसिफ व सानिया यांचे दोन वर्षापूर्वी रिती रिवाजाप्रमाणे लग्न (विवाह) झाला होता विवाह झाल्याच्यानंतर त्यांचे मध्ये वादविवाद नेहमीच होत असे त्यामुळे ते माहेरी गेली होती अशातच 2-3 दिवसापूर्वी समाजातील काही लोकांनी तिला समजूत काढली होती व पतीच्या येथे पाठविले होते अशातच पती-पत्नीमध्ये वाद झाल्यामुळे पतीने पत्नीला सुऱ्याने गळ्यावर वार केल्यामुळे तीचा जागीच मृत्यू झाला घटनेची माहिती वसंतनगर पोलीस ठाण्याला कळताच आरोपी पतीला ताब्यात घेतले आहे व पत्नीचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालयामध्ये शवविच्छेदनाकरिता पाठवण्यात आला, सदर प्रकरणाचा अधिक तपास वसंत नगर येथील ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात शिवप्रसाद आवळकर हे करीत आहे.

# कधीकाळी ढाणकी शहरात सुरू असलेले नायब तहसील कार्यालय पूर्ववत करा : शिवसेना (शिंदे)

जनमाध्यम प्रतिनिधी



ढाणकी : शहराला लागून असलेला बंदी भाग हा जवळपास ५० किलोमीटरच्या अंतरावरील परिसर असून, शेवटच्या टोकावरून कुठल्याही प्रशासकीय कामास उमरखेड या तालुक्याच्या ठिकाणी येऊन, दिवस दिवसभर वाट पाहून येथील नागरिकांना कधी काम झाल्यावर तर कधी रिकाम्या हाताने परतावे लागते.

बंदी भागातील दराटी, खरबी, भवानी, चिखली, कोर्टा, गाडी-बोरी, थेरडी, सोनदाभी, मोरचंडी, मुरली, सहस्त्रकुंड ह्या गावच्या नागरिकांना, उमरखेड येथे येणे जाणे परवडणारे नसून, वेळ जाणे, चांगल्या रस्त्या अभावी दगदगीचा होणारा प्रवास, आरोग्यास, अपघातास आमंत्रण असणारा प्रवास यामुळे त्या लोकांची फरफट होते.

कृपया या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन, कधीकाळी ढाणकी येथे नायब तहसील कार्यालय हे आठवड्यातून दोन दिवस सुरू असायचे, त्यामुळे सदर विभागातील लोकांचा वेळ वाचायचा आणि काम उमरखेडला न जाता ढाणकी येथेच होऊन जायचे. अगदी विद्यार्थ्यांच्या शासकीय कामासाठी लागणारी कागदपत्रे सुद्धा ढाणकी इथूनच भेटायचे. सदर गोष्टींचा विचार करता नायब तहसील कार्यालय, आठवड्यातून दोन दिवस पूर्ववत ढाणकी येथे सुरू केल्यास संबंधित नागरिकांची होणारी गैरसोय टळेल. अशा आशयाचे निवेदन ढाणकी शिवसेना शिंदे गटातर्फे पालकमंत्री संजय राठोड यांच्या कार्यालयात देण्यात आले. याप्रसंगी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, शिवसेना उमरखेड तालुका प्रमुख प्रवीण पाटील मिरासे, उमरखेड शहर प्रमुख ॲड. संजय जाधव, ढाणकी शहर प्रमुख संजय सलेवाड, सुनील मांजरे, शेख इरफान, सुरेश जाधव यांसह जिल्ह्यातील शिवसेनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# वेचक

## घाटंजीतील हरिओम अग्रवालची सीए परीक्षेत यशस्वी झेप!



घाटंजी - घाटंजी येथील हरिओम मनोज अग्रवाल याने सीए (चार्टर्ड अकाउंटंट) परीक्षेत यश मिळवून संपूर्ण तालुक्याचा अभिमान वाढविला आहे. काल जाहीर झालेल्या सीएच्या अंतिम परीक्षेच्या निकालात त्याने यशस्वी कामगिरी केली आहे. हरीओमने आपले प्राथमिक शिक्षण समर्थ महाविद्यालय, घाटंजी येथे पूर्ण केले. त्यानंतर सीए परीक्षेच्या तयारीसाठी अमरावती येथील आर सीएफ अकॅडमीमध्ये प्रवेश घेतला होता. कठोर परिश्रम व अभ्यासाच्या जोरावर त्याने अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली. विशेष म्हणजे, 2020 साली हरिओमचा सख्खा भाऊ नयन मनोज अग्रवाल यानेही सीए परीक्षेत यश मिळवले होते. घाटंजी सारख्या आदिवासीबहुल भागातून गेल्या पाच वर्षांत केवळ चार विद्यार्थी सीए झाले असून, त्यामध्ये हरिओमचा समावेश होणे ही अभिमानाची बाब आहे. आपल्या यशाचे श्रेय हरिओमने आजी, आई-वडील, भाऊ व मामा यांना दिले असून, सध्या संपूर्ण परिसरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## महागाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार निळे साहेब यांनी नंददीप फाऊंडेशन बेघर मनोरुग्ण सेवेला केली आर्थिक मदत

महागाव - पोलीस स्टेशन हद्दीतून तिन बेघर बेवारस निराधार निराश्रित महीला प्रभूजींना आपल्या प्रकल्पावर निवारा देण्यात येत आहे. आजचे सेवाव्रती - नंददीप चे संदीप शिंदे, सुशीलाबाई नागपूरे वृद्धाश्रम आर्णी चे खुशाल भाऊ नागपूरे, मानुसकीची भिंतचे गजानन जाधव, पंजाब भाऊ ढेकळे, अनंता भाऊ चतूर, स्वप्नमीत्र फाऊंडेशन पूसद चे शांतीसागर इंगोले, ग्रीन मिशन पूसद चे रमेश खंबोळे, अरूण नागुलकर, महागावचे रंजीत राऊत, ज्ञानेश्वर शिंदे, बंटी इंगळे, मुरलीधर गावने, अजय नाटकर, व महागाव पोलीस स्टेशन चे ठाणेदार मा. धनराज निळे, API अंधूरे, यांचे नंददीप च्या सेवा कार्याची दखल घेऊन दोन हजार रुपयांचे सहकार्य केले. त्याबद्दल ठाणेदार निळे साहेबांचे फाऊंडेशन तसेच सर्व स्तरातून मनापासून आभार व्यक्त केल्या जात आहे.

## बोदडी येथे आठ दिवसांत २० जनावरांचा मृत्यू

घाटंजी : तालुक्यातील बोदडी येथे गत आठ दिवसांत अचानक २० जणावरे दगावली. जंगलमध्ये चराईसाठी बैल, गाय जातात ती जणावरे व घरीच राहणारी लहान जनावरेही दगावली. यामुळे बोदडी गावातील गोपालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी नैनिश डफळे यांनी सांगितले की, त्यांच्या मालकीचा बैल दिवसभर चरून घरी आणला असता सायंकाळी अचानक पोट फुगायला सुरुवात झाली. बैलाने जीव सोडला अशाच पद्धतीने गावातील वीस जनावरे मृत्युमुखी पडले. याबाबतची माहिती माजी उपसरपंच आकाश राठोड यांनी तहसीलदार विजय साळवे, तालुका पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना दिली.

## जागेच्या कारणावरून वाद

उमरखेड : जागेच्या कारणावरून वाद उपस्थित करीत एकाला शिवीगाळ करण्यात आली. एवढेच नव्हेतर संबंधिताला लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले. ही घटना ६ जुलै रोजी तालुक्यातील चोखामेळा वॉर्ड येथे घडली. शोभा सोनटक्के (६२) रा. संत चोखामेळा वार्ड उमरखेड असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी उमरखेड पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपी कुणाल अनिल खुडे (३०) रा. संत चोखामेळा वार्ड उमरखेड याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

# महिला विद्यालय येथे मुख्याध्यापक सहविचार सभेचे आयोजन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - महिला विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेला बाभूळगाव, यवतमाळ, राळेगाव कळंब, नेर, आर्णी, दारव्हा या तालुक्यातील मुख्याध्यापक उपस्थित होते.

व्यासपीठावर शिक्षण विभागाचे माननीय शिक्षणाधिकारी माध्यमिक,रविंद्र काटोलकर, पोलीस अधिक्षक कुमार चिंता, सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सूर्यवंशी, माननीय उपशिक्षण अधिकारी माध्यमिक प्रदीप गोडे योगेश डाफ,अनिल शेंडगे, स्मिता घावडे, गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर पाटील भोयर, तसेच विविध तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री उपाध्ये उपस्थित होत्या. सभेच्या सुरवातीला शाळेच्या व्यवस्थापन मंडळाचे सचिव श्रीधर देशपांडे यांच्या मातोश्री स्व. सुशीला व्यंकटेश देशपांडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.सभा दोन सत्रात घेण्यात आली, उद्घाटन सत्रातील कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी काटोलकर यांनी केले. आपल्या प्रस्ताविकामध्ये त्यांनी शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षेबाबत शाळेच्या प्रत्येक घटकांनी जागरूक असावे असे सांगितले.सूर्यवंशी यांनी शालेय विद्यार्थी शाळेत कोणत्या वाहनाने येतात त्या बाबत शाळेने सखोल माहिती ठेवावी असे आवाहन केले.पोलीस अधिक्षक यांनी विद्यार्थ्यांना त्यांचे हक्क आणि जबाबदारी याची माहिती शाळेने द्यावी असे आवाहन केले. तसेच शालेय सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस विभागाने सुरू केलेल्या ऑपरेशन प्रस्थानची माहिती दिली. दुसऱ्या सत्रात माध्यमिक शिक्षणाधिकारी काटोलकर यांनी सत्र 2025 -26 या शैक्षणीक वर्षाच्या नियोजनाचा आढावा घेतला त्यात त्यांनी विविध शासकिय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पालकांनी जागृती, विद्यार्थ्यांचे प्रभावी अध्ययन यासारख्या अनेक महत्वाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन व आभार राहुल द्रोणे यांनी केले. या कार्यक्रमाला सातही तालुक्यातील मुख्याध्यापक उपस्थित होते.

# धनशक्ती' विरोधात 'जनशक्ती'चा पुन्हा एल्गार...

## स्वतंत्र आघाडी स्थापन करणार : रजनीकांत बोरेले

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा : राज्यात लवकरच जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून, पांढरकवडा नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठीही राजकीय हालचालींना वेग आला आहे. सत्ताधारी व विरोधी पक्षांकडून उमेदवार निश्चितीचे प्रयास सुरू असतानाच, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत धनशक्तीला पराभूत करून मोठा विजय मिळविणारे अपक्ष नेते रजनीकांत बोरले यांनी आता नगरपरिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत रजनीकांत बोरले यांनी दोन्ही राष्ट्रीय पक्षांच्या विरोधात जनशक्तीच्या जोरावर मोठ्या मतांनी विजय मिळवला होता. या निवडणुकीत प्रचंड प्रमाणात धनबलाचा वापर झाला असतानाही, जनतेच्या विश्वासाच्या बळावर रजनीकांत बोरले यांनी आपली ताकद दाखवून दिली. 'ना जातीसाठी, ना पक्षासाठी, फक्त न्यायासाठी' या भूमिकेवर ठाम राहून त्यांनी नीतिमत्तेच्या आधारावर लढा दिला आणि विजय संपादन केला. त्यांच्या या यशामुळे पांढरकवडा परिसरात स्वच्छ प्रतिमेच्या नेतृत्वाची गरज लक्षात घेऊन, जनतेतून त्यांच्याकडून नगरपरिषद निवडणुकीत उतरावे, अशी मागणी होत आहे. या मागणीनंतर रजनीकांत बोरले यांनी स्वतंत्र आघाडी उभी करून जातिवाद, पक्षवाद, भ्रष्टाचाराचा अंत आणि सर्वांगीण विकासाच्या मुद्यावर निवडणुकीच्या रणधुमाळीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे. नगरपरिषद निवडणुकीत प्रत्येक प्रभागात स्वच्छ, निष्कलंक, लोकहितवादी आणि विचारवंत उमेदवार उभे करण्याची तयारी सुरु झाली आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी रजनीकांत बोरले यांच्याशी थेट संपर्क साधावा. त्यांनी आपल्या निवडणूक लढण्याच्या इच्छेबाबत लेखी अर्ज रजनीकांत बोरले यांच्याकडे प्रत्यक्ष किंवा त्यांच्या मोबाईल क्रमांक वर संपर्क किंवा व्हॉट्सॲप द्वारे अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. रजनीकांत बोरले हे वन मॅन आर्मी प्रमाणे संघर्ष करत असून, त्यांनी धनशक्ती विरोधात जनशक्तीला प्रबळ पर्याय ठरले आहे. त्यामुळे नगरपरिषद निवडणुकीतही विकासोन्मुख आणि स्वच्छ प्रशासन देण्याचे उद्दिष्ट ठेवून इच्छुक उमेदवारांची स्वतंत्र आघाडी उभी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# जन सुरक्षा विधेयक हाणून पाडा : प्रेमकुमार बोके

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - महाराष्ट्र सरकार आणत असलेला जनसुरक्षा कायदा हा समाजात जनजागृती करीत असलेल्या विविध सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, लेखक व सर्वसामान्य नागरिक यांच्या विरोधात असून या कायद्याच्या आडून सरकार संविधानाने दिलेला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकारच हिरावून घेत आहे असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते प्रेमकुमार बोके यांनी केले आहे.

सध्यासुरु असलेल्याविधानसभेच्या अधिवेशनात सरकार महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक मांडणार असून त्यापूर्वीच महाराष्ट्रात या विधेयकावरुन प्रचंड वादळ उठले आहे.नक्षलवादी संघटनांना पायबंद घालण्याच्या नावाखाली हा कायदा आणला जात असला तरी सरकारचा हेतू मात्र पूर्णपणे वेगळाच आहे. कारण या संपूर्ण विधेयकात नक्षलवादी संघटना हा शब्द कुठेच नसून केवळ सरकारी धोरणा विरोधात बोलणाऱ्या संघटना, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार किंवा जागृत सामान्य नागरिक यांचा आवाज बंद करण्यासाठी हा कायदा आणला जात आहे असे या कायद्याच्या अभ्यासकांचे मत आहे. हा कायदा जर लागू झाला तर सरकारला अमर्याद अधिकार प्राप्त होणार असून त्या माध्यमातून कोणत्याही सामाजिक संघटनेला किंवा त्या संघटनेच्या कार्यकर्त्याला बेकायदेशीर ठरवून त्याला केव्हाही अटक करण्याचे अधिकार सरकारला प्राप्त होणार आहे. त्यानंतर दाखल होणारे गुन्हे हे अजामीनपात्र असून अतिशय कठोर शिक्षेची तरतूद या कायद्यात केलेली आहे. त्यामुळे या कायद्याच्या आडून सरकार सामान्य नागरिकांचे मूलभूत अधिकारच हिरावून घेत असून सरकारच्या विरोधात बोलणाऱ्या लोकांना कायमचे चूप करण्यासाठी सरकार हा कायदा करीत आहे.

# महसूल विभागाच्यावतीने राजस्व अभियान उपक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांचे विविध प्रमाणपत्राचे वाटप



जनमाध्यम प्रतिनिधी

बाभुळगाव : येथील प्रताप विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बाभूळगाव येथे महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या वतीने राजस्व अभियान उपक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांचे विविध प्रमाणपत्र काढण्याकरिता शिबिर घेण्यात आले. यामध्ये जातीचे प्रमाणपत्र, अधिवास, नॉन क्रिमिलियर, राष्ट्रीयत्व, उत्पन्न प्रमाणपत्र इ. यावेळी निवासी तहसीलदार दिलीप बदकी, संस्थेचे सचिव जयंतभाऊ घोंगे, मंडळ अधिकारी तथा नोडल अधिकारी प्रफुल घोडे, केंद्रप्रमुख मेहबूब शेख, संचालक शशिकांत कापसे, मुख्याध्यापिका स्वाती घोडे, उपमुख्याध्यापक उमाकांत राठोड, पर्यवेक्षक मनोज नगराळे, तलाठी निखिल सुने, अभय जाधव, स्वाती धुळे, प्रणय भोयर, देवेंद्र आत्राम, राजेंद्र जीवतोडे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थिती शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमाणपत्र काढण्यासाठी वेगवेगळ्या गावावरून पालक आणि पाल्य यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कुठलीही शैक्षणिक अडचण निर्माण होऊ नये या हेतूने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्री बदकी साहेब यांनी तात्काळ प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येईलअसे सांगितले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

जनमाध्यम प्रतिनिधी




राळेगाव - तालुक्यातही येवती येथील तलाठी कार्यालयात आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान २०२५ अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर मा. उपविभागीय अधिकारी राळेगाव व तहसीलदार राळेगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ७ जुलै रोजी ग्रामसभेचे आयोजन करून गावात व परिसरातील नागरिकांमध्ये व्यापक प्रसिद्धी देण्यात आली होती. ग्रामस्थांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले व लाभार्थ्यांची यादीही अंतिम करण्यात आली. शिबिरात महसूल विभागामार्फत एकूण ४०४ प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यामध्ये उत्पन्न, जात, अधिवास, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्रे, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी आदींचा समावेश होता. आधार दुरुस्तीसाठी कॅम्प लावण्यात आला होता ज्याचा लाभ अनेक नागरिकांनी घेतला. आरोग्य विभागाच्या वतीने ६८ रुग्णांची तपासणी करून औषधांचे वाटप करण्यात आले, तर कृषी विभागाने १७ शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन दिले. ग्रामपंचायतीमार्फत ७९ रहिवाशांना आवश्यक दाखले देण्यात आले.येवती तसेच आजूबाजूच्या गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला. शासनाच्या विविध योजनांचा लाभ एका ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून महसूल प्रशासनाचे व शासनाचे आभार मानले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पी.आर.पोटे पाटील आयुर्वेद कॉलेजचा यशस्वी अभ्यास दौरा

## डोमेस्टिक स्टडी टूरला विद्यार्थ्यांनी केला विमानाने प्रवास

**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील शिक्षण न देता प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळावा, या उद्देशाने पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस-आयुर्वेद, अमरावतीने इन्स्टिट्यूट स्पॉन्सर्ड डोमेस्टिक स्टडी टूअर चे आयोजन केले होते. हा विशेष अभ्यास दौरा अमरावती ते अहमदाबाद असा ४ ते ७ जुलै २०२५दरम्यान आयोजित करण्यात आला होता. या अभ्यास दौऱ्याकरिता विद्यार्थ्यांचे विमानाने प्रवास तसेच पंचतारांकित हॉटेल मध्ये राहण्याचा संपूर्ण खर्च पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या वतीने करण्यात आला.

या अभ्यास दौऱ्यासाठी केवळ उच्च शैक्षणिक गुणवत्ता व नियमित उपस्थिती असलेल्या ४३ निवडक गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. या दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांना अहमदाबाद येथील अमुल तसेच वडोदरा येथील वासु हेल्थकेयर अश्या नामांकित औद्योगिक कंपन्यांना तसेच आरोग्य वन-वनौषधी उद्यान यांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी मिळली. त्याच बरोबर त्यांनी ऍैल द ळहगूब आणि स्थानिक ऐतिहासिक व शैक्षणिक स्थळांचे प्रत्यक्ष अनुभव घेतला. अशा अभ्यास सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, व्यावसायिक जाण, संवादकौशल्य व भविष्याच्या औद्योगिक वाटचालीसाठी आवश्यक असलेली सज्जता निर्माण होते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ श्यामसुंदर भुतडा यांनी केले.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रक्रियेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले असून,देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक वारसाचा अनुभव घेण्याची संधीही उपलब्ध झाली. या अभ्यास दौऱ्याचे प्रमुख समन्वयक प्रा.डॉ.ओवी शिंदे व प्रा.डॉ.पारूल नांदगावकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास दौऱ्याबाबत संपूर्ण नियोजन व मार्गदर्शन केले. तसेच प्रा.डॉ. रणजीत देशमुख,प्रा.डॉ. मेघा गौरखेडे, प्रा. डॉ. सोनाली ठाकरे, प्रा.डॉ.भारती बिरे यांनी परिश्रम घेतले.हा उपक्रम संस्थेच्या अनुभवाधारित गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याच्या दृष्टीकोनाचे प्रतीक असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा साठी राबविण्यात आलेला एक उल्लेखनीय टप्पा ठरणार आहे.

### शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता नाही, वादळात छप्पर गेले उडून

# अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात

**अमरावती/का.प्र.**

विभागीय मुख्यालयाचे शीर्षक असलेल्या अमरावती शहरातील काही महानगरपालिका शाळांची अवस्था सर्वात दुर्गम भागांपेक्षाही वाईट आहे. शहरातील गवळीपुरा आणि निंभोरा या शाळांपर्यंत पोहोचण्यासाठी कोणताही मार्ग नाही. लहान मुलांना शाळेत पोहोचण्यासाठी शेताच्या कडेला असलेल्या चिखलातून मार्ग काढावा लागतो. अशा परिस्थितीत अनेक वेळा मुले घसरून चिखलात पडतात. त्यांना दुखापत होत आहे.

आपण जीव धोक्यात घालून शाळेत पोहोचलो तरी वादळात शाळेचे छप्पर उडून गेले आणि आपल्याला जीर्ण इमारतीत बसून अभ्यास करावा लागतो. शिक्षणाचा स्तर इतका आहे की,पाचवीच्या वर्गातील विद्यार्थी साध्या प्रश्नांची उत्तरेही देऊ शकत नाही. सोमवारी झालेल्या शाळेच्या तपासणीदरम्यान हे उघड झाले. नगर शिक्षण अधिकारी प्रकाश मेश्राम यांनीही या उणिवांना पाठिंबा दिला आणि या सर्व समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचा दावा केला.नगर शिक्षण अधिकाऱ्यांनीही कबूल केले की शिक्षण विभाग वेळेत वास्तविक परिस्थिती बदलण्यास सक्षम नाही.

**चिखलाने माखलेल्या रस्त्यातून जावे लागते शाळेत**

शहरातील निंभोरा महानगरपालिका मराठी शाळेत जाण्यासाठी कोणताही मार्ग नाही. विद्यार्थ्यांना रेल्वे क्रॉसिंगजवळ सोडलेल्या अरुंद उघड्या आणि चिखलाने माखलेल्या गल्लीतून शाळेत जावे लागते. हा मार्ग दुरुस्त करण्याचा प्रस्ताव काही महिन्यांपूर्वी देण्यात आला होता. परंतु तो प्रस्ताव आतापर्यंत प्रशासकीय फायलींमध्ये अडकला आहे. त्यामुळे ही शाळा अजूनही मार्गाशिवाय आहे.

**विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणे**

शाळेची इमारत जीर्ण झाल्यामुळे बहुतेक वेळा मुलांना बाहेर व्हरांड्यात शिकवले जाते. पहिली ते पाचवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना एकाच छताखाली शिकवले जाते. अशा गोंधळलेल्या शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थी काय शिकतील आणि काय नाही हे अकल्पनीय आहे. हे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे.

**आम्ही अनेक प्रस्ताव पाठवले आहेत**

शाळेची दुरुस्ती, रस्ते बांधणे आणि इतर सुविधांची व्यवस्था करण्यासाठी शिक्षण विभागाला अनेक प्रस्ताव दिले आहेत. संबंधित प्रस्तावांमध्ये शाळेची दुरुस्ती, नवीन खोल्या बांधणे आणि नवीन अंगणवाडी सुरू करणे यांचा समावेश आहे.

- **गोपाळ अभ्यंकर,** मुख्याध्यापक, महानगरपालिका शाळा निंभोरा

**रस्त्याची तात्काळ सुधारणा करणार**

शहरातील निंभोरा आणि गवळीपुरा शाळांमध्ये रस्ता नाही. दोन्ही शाळांसाठी रस्ता तयार करण्यासाठी महानगरपालिका बांधकाम विभागाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. परंतु पावसाळा आहे. त्यामुळे, रस्ता तातडीने सुधारण्यासाठी कार्यवाही केली जाईल. इतर विषयांसाठीही योग्य नियोजन केले जात आहे.

- प्रकाश मेश्राम, शिक्षण अधिकारी, महानगरपालिका


# पुढील पाच वर्षे ३० ग्रामपंचायतींमध्ये महिलांचे राज्य

### ओबीसी प्रवर्गात ८ महिला सरपंच आणि सर्वसाधारण प्रवर्गात १३ महिला सरपंच

**अमरावती/का.प्र.**

सुधारित आरक्षणानुसार तालुक्यातील ५९ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी सोमवारी तहसील कार्यालयात महिला आरक्षणाची रूपरेषा तयार करण्यात आली. त्यानुसार पुढील पाच वर्षे ३० ग्रामपंचायतींमध्ये महिलांचे राज्य राहील. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गात ७ महिला, अनुसूचित जमाती प्रवर्गात २ महिला आहेत -

ओबीसी प्रवर्गात ८ महिला सरपंच आणि सर्वसाधारण प्रवर्गात १३ महिला सरपंच आहेत.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तहसीलदार विजय लोखंडे यांना या सोडतीसाठी अधिकृत केले होते. उपविभागीय अधिकारी अनिल भाटकर नियंत्रण अधिकारी म्हणून उपस्थित होते. यावेळी नियोजित जातीच्या वर्गात, लोंटेक, सावर्डी, खुर्द, आवळा, ब्राह्मणवाडा भगत, कठोरा पिंपळखुटा आणि धानोरा कोकाटे ग्रामपंचायतींमध्ये महिला सरपंच पदावर विराजमान होणार आहेत, तर इंदला, उतखेड, जळका, पिंपरी यादगिरे, कापुस्तलणी, वडगाव जिरे, सुकळी येथील सरपंचपद अनुसूचित जमातीसाठी (खुले) राखीव आहे.



अनुसूचित जमातींमध्ये पोहरा, अंतूरा यांचा समावेश आहे.भानखेडा, शेवती जहांगीर येथे महिलांसाठी आरक्षण आहे तर अनुसूचित जमातीसाठी (खुले) आरक्षण आहे. इतर मागासवर्गीयांमध्ये, ब्राह्मणवाडा गोविंदपूर, गोपाळपूर, बोडणा, नांदगाव पेठ, यावली शाहिद, कुंड साजापूर, वालगाव आणि कस्तुरा येथे महिलांसाठी आरक्षण आहे तर मलकापूर, तेंभा, देवडा, सालोरा, कामुंजा, करजगाव, रेवासा, शिराळा ग्रामपंचायतीमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (खुले) आरक्षण आहे.

# विठूरायाच्या पंढरीत १०८ रुग्णवाहिकेद्वारे १०९५ भाविकांची आरोग्यसेवा



**अमरावती/का.प्र.**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विठूरायाच्या पंढरीत भाविकांना आपत्कालीन वैद्यकीय सेवा देण्यासाठी १०८ रुग्णवाहिका अहोरात्र कार्यरत होती. या वेळी १०९५ भाविकांना आरोग्यसेवा देण्यात महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेला यश आले आहे.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविक, वारकरी विठूरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात येत असतात. या वेळी पंढरीत तत्काळ आरोग्य सेवा मिळाली पाहीजे अशी सूचना राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश अबिटकर यांनी केली होती. त्यानुसार राज्याच्या आपत्कालीन वैद्यकीय सेवेने डायल १०८ नावाचा कक्ष उभारण्यात आला होता विशेष नियंत्रण कक्षाद्वारे भाविकांना आरोग्य सेवा देण्यात आली. राज्यात भारत विकास गृप (बीव्हीजी) द्वारे १०८ रुग्णवाहिका सेवा पुरवली जाते. भाविकांच्या सेवेसाठी १०८ रुग्णवाहिकासेवेद्वारे शहरात २४ रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या. यात १४ रुग्णवाहिका ॲडव्हांस लाईफ सपोर्ट तर १० रुग्णवाहिका बेसिक लाईफ सपोर्ट या प्रकारातल्या होत्या. विशेषबाब म्हणजे ३५ डॉक्टर,३० चालक, १० प्रशासकीय अधिकारी व नियंत्रण कक्षातील १० कर्मचाऱ्यांनी अरोग्यसेवा देण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली.

**अशी दिली आरोग्य सेवा-** हृदयविकार : ११, वैद्यकीय : ९८१, इतर : ८०, पॉली ट्रॉमा : २२, हल्ला : १,एकूण : १०९५

# पंकज धंदर अक्षर मानव चित्रपट विभाग जिल्हा कार्याध्यक्षपदी

**अमरावती/का.प्र.**

चाळीसगाव येथे संपन्न झालेल्या त्रैमासिक अक्षर मानवच्या बैठकीत अक्षर मानव संघटनेच्या अमरावती चित्रपट विभागात शहरातील फिल्म मेकर, अभिनेता, प्रशिक्षक व सामाजिक कार्यकर्ते पंकज धंदर यांची अक्षर मानव चित्रपट विभागाच्या अमरावती जिल्हा कार्याध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.



अक्षर मानवचे महाराष्ट्राचे प्रदेश अध्यक्ष प्रा.प्रविण जावळे, उपाध्यक्ष योग गुरू दिपेश मोहिते, चित्रपट विभागाचे राज्य अध्यक्ष प्रा. प्रशांत भोले यांच्या परवानगीने महाराष्ट्राचे राज्य कार्यवाह तथा विदर्भाचे पालकमंत्री आझाद खान यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी अक्षरमानव संघटनेच्या अमरावती जिल्हा सचिव अश्विनी खान-वितोंडे,जिल्हा उपाध्यक्ष माया वाकोडे, जिल्हा संघटक शिवाजी कोकाटे प्रामुख्याने उपस्थित होते.

पंकज धंदर गेल्या २० वर्षांपासून ‘अमरावती युवा स्पंदन सिनेमा प्रोडक्शन’ आणि अमरावती स्पंदन परिवार बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून सामाजिक विषयांवर लघुचित्रपट निर्मिती, फिल्म मेकिंग वर्कशॉप, शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम करत आहेत. स्वतः पटकथा लेखक-दिग्दर्शक-अभिनेता-छायाचित्रकार-एडिटर-निर्माता अश्या विविध विभागांमधे कार्यरत असतानाच ‘बिइंग आर्टिस्ट अकेडमी ऑफ फ़िल्म अँड थियेटर आर्ट्स, अमरावती’ च्या माध्यमातून ते सातत्याने नवोदितांना सिनेमा करियर जागरूकता चळवळ, चित्रपट निर्मितीचे रीतसर प्रशिक्षण उपक्रम राबवून सिनेसाक्षरता संस्कार देण्याचे काम ते संपूर्ण आत्मीयतेने करीत आहेत.

‘माणसाच्या माणुसकीलाच करतो आम्ही वंदन’ या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन पंकज धंदर यांचा प्रवास सिनेमा क्षेत्राच्या माध्यमातून सामाजिक - मानसिक परिवर्तन साधण्याचा एक सशक्त प्रयत्न ठरत आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस अमरावतीच्या सांस्कृतिक वर्तुळातून भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# कुटीर रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर साचले पाण्याचे डबके

### रस्त्याची दुरावस्था, जागोजागी चिखल



**अचलपूर/वार्ताहर**

परतवाडा शहरातील कुटीर रुग्णालय येथे उपचारासाठी अचलपूर तालुक्यातील नव्हे तर मेळघाटसह आजूबाजूला असलेल्या शहरी ,ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने येतात.सध्या पावसाळा सुरू असल्याने कुटीर रुग्णालयाचा प्रवेश द्वारातील मुख्य रस्त्यावरच अनेक ठिकाणी पाण्याचे डबके,चिखल असल्याने रुग्णांना याचा फटका सहन करावा लागत आहे.पायदळ जाणाऱ्या नागरिकांना सुद्धा फटका बसत आहे.एकीकडे या रुग्णालयात दररोज अनेक रुग्णवाहिका ये-जा करते.तसेच चारचाकी, ऑटो, दुचाकी वाहनांची मोठी गर्दी असते. यामुळे तत्काळ या प्रवेशद्वार मधील मुख्य रस्त्याची सुधारणा करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# २५ जुलैपासून श्रावण महिन्याला प्रारंभ


**अमरावती/का.प्र.**

आषाढी एकादशी आटोपली असून यंदा गुरुवार, २४ जुलैला आषाढ अमावस्या आहे.२५ जुलैपासून श्रावण महिन्याला सुरुवात होणार आहे. या महिन्यात सृष्टीला जसा पाना, फुलांनी बहर येतो, त्याचप्रमाणे सण-उत्सवांचीही बहर येतो. चारही श्रावण सोमवारी शहरातील गडगडेश्वर, तपोवनेश्वर, कोंडेश्वर, पाताळेश्वर,भुतेश्वर तसेच इतर लहान, मोठया मंदिरांमध्ये महादेवाच्या दर्शनासाठी गर्दी होणार असून, उत्साह, लहान यात्रा असे धार्मिक वातावरण राहणार आहे.

श्रावण शुध्द पंचमी अर्थात नागपंचमीला मंदिरांसह घरोघरी नागदेवतेची पूजा होणार असून लाहया, फुटाणे, वटाणे, करंजीचा फुलोरा, हलव्याचा प्रसाद घरोघरी करुन त्याचे वितरण केले जाणार आहे. दरम्यान सुवासिनी श्रावणातील दर मंगळवारी मंगळागौरीचे व्रतही करतील. ८ ऑगस्टला नारळी पौर्णिमा तसेच ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा सण साजरा होणार आहे.शुक्रवारी १५ रोजी राष्ट्रीय उत्सव स्वातंत्र्य दिन शासकीय कार्यालये तसेच शाळा, महाविद्यालयांसह विविध ठिकाणी साजरा होणार असून, याच दिवशी श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आहे.श्रावण महिन्यातील पिठोरी अमावास्या २२ ऑगस्ट रोजी असून या दिवशी जिल्हयात पोळयाला बैलजोड्यांना सजवून पुरणपोळीचा नैवद्य अर्पण केला जाणार आहे.

## संक्षिप्त

### वडाळगव्हाणची मुलगी टी सिरीज कंपनीच्या मंचावर



**खल्लार-** दर्यापूर तालुक्यातील वडाळगव्हाण या लहानशा गावातील मुलगी चित्रपट सृष्टीतील नामांकित असलेल्या टी सिरीज या कंपनीच्या मंचावर पोहचली आहे.प्रीती तायडे असे मुलीचे नाव असून ती दर्यापूर तालुक्यातील वडाळगव्हान या लहानशा गावातील रहिवासी असून अत्यंत सामान्य कुटुंबातील आहे.ती मेहनत व जिद्द, व कलागुणांच्या जोरावर टी सिरीज सारख्या नामांकित कंपनीच्या मंचावर जाऊन पोहचली आहे. ग्रामिण भागातील मुली देखिल जिद्द व मेहनतीच्या पुढे जाऊन गावाचे नाव लौकिक करु शकतात.

### पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना

**अमरावती-** कृषि क्षेत्राच्या उत्पादन वाढीच्या दरामध्ये फळ पिकांचा प्रमुख सहभाग आहे. फळ पिकांचे बाजारमूल्य अधिक असल्याने शेतक-यांना चांगले उत्पन्न मिळते. मात्र फळपिकाचे अपेक्षित उत्पन्न न आल्यास येणारा तोटा हा मोठा असतो. ही बाब विचारात घेऊन शेतक-यांच्या फळपिकांना हवामान धोक्यांपासून संरक्षण देऊन त्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यासाठी विमा संरक्षणाची गरज आहे. ही बाब लक्षात घेता अमरावती विभागात प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षासाठी राबविण्यासाठी राज्य शासनाने मान्यता दिलेली असून अमरावती विभागातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक प्रमोद लहाडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. अमरावती विभागात अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यात मृग बहार २०२४ मध्ये संत्रा, मोसंबी, लिबु, पेरू, डाळिंब, सीताफळ, चिकू या फळपिकाकरिता अधिसुचित क्षेत्रामध्ये योजना राबविण्यास अनुमती देण्यात आली आहे. या योजनेमध्ये सहभागी होण्याकरीता ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फारमर आय डी) बंधनकारक राहील. तसेच पिक आणि फळपीक विमा योजनेत सहभाग घेणाऱ्या शेतकऱ्यांना ई-पिक पाहणी मध्ये नोंद करणे अत्यावश्यक आहे. ई-पिक पाहणी मधील नोंद व विमा उतरवलेले पीक यात विसंगती आढळल्यास सदर विमा अर्ज रद्द होईल, याची सर्व विमाधारक शेतकऱ्यांनी दक्षता घ्यावी.

### गुरुकुंज आश्रमात गुरुपौर्णिमा महोत्सव

**तिवसा-** अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने गुरुकुंज आश्रमात गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन केले असून, हा महोत्सव राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या महासमाधी स्थळी १० जुलै रोजी होणार आहे. गुरुवार १० जुलै रोजी पहाटे ४ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या महसमाधीचे सर्वाधिकारी लक्ष्मण गमे यांच्या हस्ते पूजन करण्यात येणार आहे व सकाळी ५ ते ६ या वेळेत सामुदायिक ध्यान व त्यावरील चिंतन प्रचार प्रमुख प्रकाश महाराज वाघ करणार आहे. सकाळी ८ ते ९ या वेळेत यावली शहीद येथील श्रीगुरुदेव सेवा मंडळ खंजिरीं भजनाचा कार्यक्रम सादर करणार आहे. सकाळी ९ ते १० व १० ते ११ या वेळेत खुशबु कठाणे व निखिल मढावी यांचे अभंग गायन होणार आहे. सकाळी ११ ते १२ या वेळेत धनंजय लोहटे यांचा भक्तिसंगीताच कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२ ते १ ज्ञानेश्वरी दिदि गुरुमहिमा या विषयावर प्रवचन करतील. दुपारी १ ते २ या वेळेत विवेक गावडे यांचे अभंग गायन होईल. दुपारी २ ते ३ शिल्पा पाटील यांचा भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी ३ ते ४ डॉ. प्रशांत ठाकरे यांचे गुरुमाहात्म्य या विषयावर बाळासाहेब वाईकर अभंग गायन सादर करतील. सायंकाळी ७ ते ७.३० सामुदायिक प्रार्थना व त्यावरील चिंतन ॲड. दिलीप कोहळे हे करतील. सायंकाळी ७.३० वाजता महाआरती व जयघोषाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

### शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती-** जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, इतर मागास वर्ग आणि आर्थिक मागास प्रवर्गातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा मोफत पुरविण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता ८ वी ते १० वी (शालेय), कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घ्यायचा आहे, त्यांच्यासाठी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अभ्यासक्रमात शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर, तो पोर्टलवरून डाउनलोड करून त्याची प्रिंट काढून संबंधित वसतिगृहात ऑफलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.अमरावती जिल्ह्यातील वसतिगृहे अमरावती स्थानिक वसतिगृहांमध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन प्रवेशासाठी पुढील वसतिगृहे उपलब्ध आहेत.विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज संबंधित वसतिगृहांकडे सादर करावेत. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०७२१-२६६१२६१ वर संपर्क साधण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

### ‘पर्यावरण, ऊर्जा आणि जल संवर्धन’ विषयावर आज जनजागृती कार्यक्रम

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्रादेशिक समन्वय संस्था, उन्नत भारत अभियान, राष्ट्रीय सेवा योजना, रासायनिक तंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘पर्यावरण, ऊर्जा व जल संवर्धन’ या विषयावर एक दिवसीय जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन उद्या ९ जुलै रोजी विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्या सभागृहामध्ये करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे भूगर्भशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक डॉ. डी. बी. मालपे उपस्थित राहणार असून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उन्नत भारत समन्वयक डॉ. एम.बी. कुंभारे, रा.से.यो. संचालक डॉ. निलेश कडू, रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. यादवकुमार मावळे यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एच.आर. देशमुख भूषविणार आहे.

# सार्वजनिक विद्यापीठे, अशासकीय महाविद्यालयांमधील रिक्तपदांच्या भरतीस वेग येणार

## अभियांत्रिकी संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीस मान्यता- मुख्यमंत्री

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठ आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर रिक्त पदे भरल्यास नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनुसार उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदभरती रिक्त पदांच्या भरतीस सकारात्मक प्रतिसाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आला. तसेच अभियांत्रिकी शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीसही अनुकूलता दाखवण्यात आली. अकृषी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. विधानभवन येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विविध विषयांवर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विद्यापीठांच्या प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव श्री. सौरभ, नियोजनचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक विनोद मोहितकर, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर आदींसह अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात तंत्रज्ञान विद्यापीठांची संख्या कमी असून, ही विद्यापीठे पूर्ण क्षमतेने सुरू ठेवणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी प्राप्त होतील व गुणवत्ता वाढेल. लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठात १०५ अध्यापकीय पदे, एक शिक्षक समकक्ष पदास मंजुरी देण्यात यावी असे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले. याचबरोबर इतर विद्यापीठाप्रमाणे तंत्रज्ञान विद्यापीठात आठ कोटी रुपये दैनंदिन व प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी प्रदान करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली. तसेच ७८८ अध्यापकीय पदे, २,२४२ इतकी शिक्षकेतर पदे भरण्यात मान्यता देण्यात आली आहे. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील ५,०१२ पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच व्ही.जे.टी.आय व श्री. गुरूगोबिंदसिंग अभियांत्रिकी महाविद्यालय नांदेड यासह राज्यातील इतर शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठास एकूण ६०३ पदांचा सुधारित आकृतीबंधही मंजूर करण्यात आला.

### विज्ञान व तंत्रज्ञान विभाग स्थापन करावा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विज्ञान व तंत्रज्ञान काळाची गरज असताना, सर्वच विभागात आपण तंत्रज्ञानाचा वापर करीत आहोत. विज्ञान व तंत्रज्ञान विभाग अनेक राज्यात कार्यरत असून, इतर राज्यातील कार्यप्रणालीचा अभ्यास करून, महाराष्ट्रात हा विभाग कसा सुरू करता येईल याबाबत रूपरेषा तयार करता येईल याबाबत त्यांनी यावेळी सूचना दिल्या.



### सार्वजनिक ग्रंथालयांना प्रोत्साहनपर विशेष अनुदान

ग्रंथालय अनुदानात ४० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला मा. मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली असून, हा प्रस्ताव तातडीने वित्त विभागाकडे पाठवावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच 'अ', 'ब', 'क' 'ड' श्रेणीतील ग्रंथालयांची तपासणी करून त्यांच्या श्रेणीवाढीस तत्त्वतः मान्यता देण्यात आली असून, त्यासाठी लागणाऱ्या वाढीव अनुदानाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करावा. याचबरोबर राज्यातील १,७०६ ग्रंथालयांची मान्यता रद्द केलेल्या प्रमाणात नवीन ग्रंथालयांना शासन मान्यता देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले तसेच राज्यातील ५०, ७५, १०० वर्ष पूर्ण करणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांना प्रोत्साहनपर विशेष अनुदान मंजूर करण्यास मान्यता दिली.

---

### मॉडेल सौर ग्राम स्पर्धेमध्ये राज्यातील ६३ गावांचा सहभाग

## विजेत्या गावाला केंद्राकडून एक कोटी रुपयांचे अनुदान

**अमरावती/का.प्र.**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेऊन देशातील प्रत्येक जिल्ह्यात एक मॉडेल सौर ग्राम निर्माण करण्यासाठी सुरू केलेल्या स्पर्धेसाठी राज्यातील सहा जिल्ह्यातील ६३ गावांची निवड करण्यात आली आहे. यशस्वी गावाला केंद्र सरकारकडून एक कोटी रुपयांचे अनुदान मिळणार असून या स्पर्धेत भाग घेणाऱ्या गावांपैकी सहा महिन्यात सर्वाधिक सौर ऊर्जा क्षमता निर्माण करणाऱ्या गावाची विजेता म्हणून निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.



राज्यातील शंभर गावांना सौर ऊर्जेचा वापर करून ऊर्जा स्वयंपूर्ण बनविण्यासाठीची सौर ग्राम योजना महावितरणने यापूर्वीच सुरू केली असून त्याच्या अंतर्गत आतापर्यंत १४ गावे सौर ग्राम झाली आहेत. महावितरणच्या योजनेखेरीज आता केंद्र सरकारच्या मॉडेल सौर ग्राम योजनेमुळे गावांना ऊर्जा स्वयंपूर्ण बनविण्यास अधिक चालना मिळणार आहे. महावितरणला मॉडेल सौर ग्राम योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

किमान पाच हजार लोकसंख्या असलेल्या गावांना मॉडेल सौर ग्राम योजनेसाठीच्या स्पर्धेत भाग घेण्याची संधी आहे. विविध जिल्ह्यांमध्ये गावे निवडण्याची प्रक्रिया सुरू आहे. सध्या सहा जिल्ह्यातील काही गावांची योजनेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांना घरोघरी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंतर्गत छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. तसेच त्या गावातील पथदिवे सौर ऊर्जेवर चालविणे, गावाची पाणी पुरवठा योजना सौर ऊर्जेवर चालविणे अशी विविध कामे सरकारी योजनांच लाभ घेऊन करण्यात येतील. ही स्पर्धा सहा महिने चालणार आहे.

संबंधित ग्राम पंचायतींनी गावकऱ्यांना प्रधानमंत्री सूर्य घर योजनेचा लाभ घेण्यास प्रोत्साहन देणे तसेच सार्वजनिक योजनांसाठी सौर ऊर्जेचा वापर करणे अपेक्षित आहे. स्पर्धेचा कालावधी संपल्यानंतर त्या त्या गावात एकूण किती सौर ऊर्जा क्षमता निर्माण झाली याचा अभ्यास करून जिल्ह्यातील विजेत्या गावाला केंद्र सरकारकडून एक कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे.

मॉडेल सौर ग्राम योजनेसाठी महाराष्ट्र राज्यातील परभणी जिल्ह्यातील सहा, अकोला जिल्ह्यातील २६, भंडारा जिल्ह्यातील सहा, बुलढाणा जिल्ह्यातील १५, वर्धा जिल्ह्यातील नऊ आणि गोंदिया जिल्ह्यातील एका गावाची निवड करण्यात आली आहे. या गावांमध्ये स्पर्धेला सुरुवात झाली आहे व जिल्ह्यानुसार नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यापर्यंत मुदत आहे. योजनेसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करून त्या समितीमार्फत जिल्ह्यामध्ये योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी देखरेख व समन्वय करण्यात येत आहे. या समितीकडून सुरुवातीला गावांची निवड करण्यात येते व त्या गावांमध्ये स्पर्धा होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने २९ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला मंजुरी दिली होती. या योजनेत महिना तीनशे युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे या हेतुने घरावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून थेट अनुदान मिळते. एक किलोवॅटला तीस हजार रुपये, दोन किलोवॅटला साठ हजार रुपये आणि तीन किलोवॅटला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. राज्यात आतापर्यंत दोन लाखाहून अधिक वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

---

### विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाची प्रवेश प्रक्रिया सुरू

## संशोधनात विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी मोठी संधी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील एम.एस्सी. (भौतिकशास्त्र) भाग-१ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून संशोधनामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सुवर्ण संधी उपलब्ध होणार आहे.

**तीन दशकांपासून अध्यापन व संशोधनाची परंपरा**

भौतिकशास्त्र विभागात गेल्या तीन दशकांपासून दर्जेदार अध्यापन व संशोधनाची समृद्ध परंपरा आहे. भौतिकशास्त्र विभागात प्रायोगिक व सैध्दांतिक शिक्षणाला विशेष महत्व देण्यात येते.

**संशोधनाशी निगडीत विषय**

विद्यार्थ्यांना क्वांटममेकॅनिक्स, इलेक्ट्रोडायनॅमिक्स, सॉलिड स्टेट फिजिक्स, न्यूक्लियर फिजिक्स, स्टॅटिस्टिकल मेकॅनिक्स यांसारख्या मूलभूत विषयांबरोबरच आधुनिक संशोधनाशी निगडीत विशेष विषय भौतिकशास्त्र विभागामध्ये शिकविले जातात.

अभ्यासक्रमामध्ये प्रयोगशाळेतील सखोल प्रशिक्षण, सायंटिफिक इन्स्ट्रमेंट्स हाताळण्याचा अनुभव तसेच विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सैध्दांतिक ज्ञानासोबत प्रायोगिक कौशल्ये विकसित केली जातात. विद्यार्थ्यांना संबंधित विषयाबाबतचे कौशल्य आत्मसात होण्यासाठी याबाबत विभागामध्ये व्हॅल्यू ॲडेड कोर्स सुध्दा शिकविल्या जाते.

**प्रतिष्ठेच्या फेलोशिप्स**

विभागातील विद्यार्थ्यांनी महाज्योती, सारथी यासारख्या प्रतिष्ठित फेलोशिप्स मिळवून विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला आहे. तसेच विभागातील प्राध्यापकांना विविध राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन सहयोग व्याख्याते म्हणून आमंत्रित केल्या जाताते. त्यांच्या पेटंट, उच्च दर्जाची संशोधने, प्रकाशने, संदर्भ ग्रंथ हे महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या तुलनेत विशेष उल्लेखनीय आहेत.



**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कार्यक्रम**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विभागाद्वारे वेळोवेळी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यशाळा, परिषदा व सायंटिफिक सेमिनारचे आयोजन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर चालणाऱ्या संशोधनातील नवीनतम घडामोडींची माहिती मिळते. याशिवाय अनेक विद्यार्थी नेट, सेट, गेट अशा स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून देशातील प्रमुख संशोधन संस्थांमध्ये प्रवेश घेत आहेत.

**अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर करिअरच्या संधी**

एम.एस्सी. (भौतिकशास्त्र) अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोग, इस्त्रो, सी.एस.आय.आर., डी. आर. डी. ओ., बी.ए.आर.सी., आय. आय. एस्सी., टी.आय.एफ.आर., आय. आय. टी. अशा प्रतिष्ठित संस्था व संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी उपलब्ध होतात. तसेच खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल, ऊर्जा, आयटी, शिक्षण, संरक्षण, अंतराळ संशोधन अशा क्षेत्रांमध्ये नोकरीच्या अमर्याद संधी आहेत.

**अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत**

विभागाने यापूर्वी अनेक विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन करून नेट, सेट, गेट, जेस्ट परीक्षेत घवघवीत यश मिळवून दिले आहे, त्यामुळे विद्यार्थी विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था, तसेच औद्योगिक क्षेत्रात प्राध्यापक, संशोधक, सल्लागार, शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे.

---

### उल्हासी व्यक्तीमत्व

## उल्हास मराठे

नावाप्रमाणेच नेहमी उल्हासीत असलेले आमचे उल्हासभाऊ बाळकृष्ण मराठे. उल्हास मराठे, संपादक दै. हिंदुस्थान हे नाव पत्रकारीतेच नव्हे तर राजकीय क्षेत्र असो सामाजीक क्षेत्र, आर्थिक क्षेत्र अशा अनेक क्षेत्रात नाव आहे. यासाठी कार्यही तसेच करावी लागतात. असे सदैव मदतीचा हात असलेले आमचे उल्हासभाऊ यांचा आज ९ जुलै रोजी वाढदिवस. भाऊंचे शिक्षण एम.ए. एम. कॉम (त्या काळातील) पदव्युत्तर पदवीपर्यंत झालेले असून सुद्धा भाऊंनी सरकारी नोकरी पत्करली नाही.स्वाभिमानाने जगायचे, कुठेही न थांबता व मागे न पाहता कामे करायचे हा भाऊंचा शिरस्ता. जे थांबले ते संपले हे ध्येय पुढे ठेऊन उल्हासभाऊंचा आज वयाच्या ७५ व्या वर्षी पदार्पण करीत आहेत.

७५ वर्षाकडे पदार्पण करीत असतांना अजुनही भाऊ त्याच जोमाने काम करतात. भाऊंनी सुरूवातीला पेपरचे पार्सल टाकण्यापासून कामाची सुरूवात केली. त्यानंतर पुर्वी पेपरमध्ये फोटो छापुन येण्याकरीता ब्लॉक तयार करण्यात येत असे, म्हणून उल्हासभाऊंनी ब्लॉकमेकिंगचा स्वत:चा व्यवसाय सुरू केला. 'ब्लॉकमेकिंगचे' काम करीत असतांना ब्लॉकचे इचिंग करण्याकरीता ७५% ॲसिड वापरावे लागत असे व ते काम उल्हासभाऊ स्वत:च्या हाताने करीत होते. अशाप्रकारे आपल्या कार्याची सुरूवात केली व आज त्यांचे नाव प्रत्येक क्षेत्रात झालेले आहे. यासाठी आमच्या वहीनी म्हणजेच ज्योती वहीनी यांचा अर्धांगिनी म्हणून सिंहाचा वाटा आहे.

भाऊंनी आपल्या जिवनामध्ये कधीही पैशाला महत्व दिले नाही व उच्च निच किंवा मालक नौकर असा काहीही भेदभाव केला नाही तर नेहमी माणुस जुळवण्याचे व जोपासण्याचे काम केले आहे.एकदा उल्हासभाऊंच्या संपर्कात व्यक्ती आला की भाऊंनी त्याला कधीही सोडले नाही तर त्याला टिकवून ठेवण्याचे काम केले आहे. त्यांचेच उदाहरण द्यायचे म्हटले तर आम्ही भाऊंच्या ब्लॉकमेकींगच्या अंबा प्रोसेसमध्ये काम करणारे. स्मिता साठे, वसंता साठे,



वाढदिवसानिमित्त

खडसे, दिनेश टाले, मी स्वत: साधना भोरे, आम्ही सर्व कर्मचारी म्हणून लागलो पण भाऊंच्या व वहिनींच्या मनमिळावू स्वभावामुळे त्यांच्या कुटूंबातील मेंबर कधी झालो हे कळलेच नाही.

उल्हासभाऊ, ज्योती वहीनी, २ मुले डॉ. रविंद्र उल्हास मराठे हा आज अध्यक्ष ग्राहक तक्रार निवारण आयोग येथे कार्यरत आहे तर लहान मुलगा राहुल इंजिनिअर झाला. तसेच दोन्ही स्नुषा स्नेहल रविंद्र मराठे व केतकी राहुल मराठे व चार नातवंड असा भाऊंचा परिवार.परिवारातील खेळीमेळीचे वातावरण बघुन हेवा वाटतो. भाऊ व वहीनींनी मुलांवर केलेले संस्कार तर आहेतच पण सुनांवर देखील आहेत. वहीनी, भाऊ असो वा नसो परंतु घरी आलेल्यांचा मोठी सुनबाई स्नेहल तेवढ्याच आदराने सत्कार करते.

भाऊ नेहमी म्हणतात ' अतिथी देवो भव:'. उल्हासभाऊंचे वडील ति.बाळासाहेब मराठे म्हणजे आप्पांनी दिलेला वसा उल्हासभाऊंचे कुटूंब आजही जोपासत आहे. आलेल्या संकटांतून मार्ग काढतांना प्रचंड आत्मविश्वास व हिम्मत पाहिजे असते आणि तो आत्मविश्वास ति.उल्हासभाऊंमध्ये आजही आहे. गरीबांना मदत करणे हा उल्हासभाऊंचा व वहीनींचा स्वभाव.

ते नेहमी म्हणतात मान, सन्मान हा मागितल्याने मिळत नसतो तर तो आपल्या कर्तव्याने मिळत असतो त्यासाठी सदैव कर्तव्य करीत रहावे. देव नेहमीच पाठीशी असतो. जी माणसे आपल्या जीवनातील बदलांना सकारात्मक प्रतिसाद देतात तिच माणसे दमदारपणे पुढील आयुष्य जगू शकतात हे आम्ही उल्हासभाऊंजवळूनच शिकलो. माणसाचं जेवढे प्रेम आहे तेवढेच प्रेम भाऊंचे निसर्गावर व प्राणिमात्रांवर पण आहे. आपण लावलेल्या झाडांची फळे आपणच खाल्ली पाहीजे असा स्वार्थ न ठेवता, अगदी एरव्ही बाजारातून आणलेल्या फळांच्या बिया आपण उकीरड्यावर टाकून देतो परंतु त्या बिया व सुकलेले हार किंवा फुले हे जमा करून त्या बिया व फुले भाऊ व वहीनी मेळघाट व पोहऱ्याच्या जंगलात नेऊन टाकतात. त्यांच्या फळांची अपेक्षा न करता असे अविरत कार्य भाऊंचे चालत असते. त्यांच्या कामात जिद्द व चिकाटी आहे, एकदा हाती घेतलेले काम ते पूर्ण झाल्याशिवाय कधीच सोडत नाही बाप दाखव नाही तर श्राद्ध कर असे काम असते.


निर्भीडपणे ते आपले विचार दै. हिंदुस्थानच्या अग्रलेखातून मांडत असतात. हा वारसा ते त्यांचे वडील बाळासाहेब, अरूणदादा यांच्याप्रमाणे आजही जोपासत आहेत. उल्हासभाऊंच्यामुळे आम्हाला मिळालेले बाळकडू आजही आम्हाला आमच्या प्रगतीमध्ये मार्गदर्शक ठरत आहे. माझ्या आई वडीलांनंतर उल्हासभाऊंनी माझ्या आई वडीलांची जागा घेतली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. उल्हासभाऊंना वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा..

● साधना अशोक भोरे
परिसेविका,
सामान्य रूग्णालय, अमरावती
मो.९४२१६०२९७६

---

# चातुर्मासः

## सात्विकतेचा काळ



हिंदू परंपरेनुसार आषाढ शुक्ल पक्ष देवशयनी एकादशी पासून ते कार्तिक शुद्ध एकादशी या चार महिन्याच्या अंतराला 'चतुर्मास' म्हणजेच 'चातुर्मास' असे मानतात. जैन धर्मानुसार चातुर्मास आषाढ शुक्ल चतुर्दशी पासून सुरू होऊन कार्तिक पौर्णिमेपर्यंत चालतो. पुराणानुसार हिंदू धर्म - संस्कृतीनुसार तसेच विविध कालगणनेच्या आधारे अनेक तिथ्या, सण,शुभकाळ, पर्वकाळ व महापर्वकाळ येतात. यापैकीच चातुर्मास सुद्धा एक पर्वकाळ होय.

चातुर्मासाचा हा काळ अत्यंत पवित्र मानला जातो. या काळात आषाढ महिन्यांचे वीस दिवस, श्रावण, भाद्रपद आणि अश्विन या तीन महिन्यांचे संपूर्ण तीस दिवस आणि कार्तिक महिन्याचे अकरा दिवस समाविष्ट असतात. आपल्या शास्त्रांद्वारे दर्शविलेल्या मानवाचे एक वर्ष म्हणजे देवांचा एक दिवस आणि एक रात्र असते. त्यामुळे चातुर्मासाचा हा काळ देवांच्या योगनिद्रेपासून तर जागेपर्यंतचा काळ समजला जातो. सृष्टीचे पालनहार भगवान श्रीहरी विष्णू आषाढी देवशयनी एकादशी पासून क्षीरसागरात (विश्वसागरात) शेष शय्येवर योगनिद्रेस प्रारंभ करतात. कार्तिकी एकादशी पर्यंत ते निद्रावस्थेत असतात.

या चातुर्मासाच्या काळात देव निद्रावस्थेत असताना वाईट शक्तीपासून आपले रक्षण व्हावे, या हेतूने व्रते,विधी, दान,जप केली जातात. विविध ग्रंथांची पारायणे, वाचन, चिंतन, मनन, अध्ययने केली जातात. या चार महिन्यांच्या काळात विविध सण-उत्सवे मोठ्या प्रमाणात साजरी होतात. अत्यंत पवित्र अशा चातुर्मासाच्या काळामध्ये आषाढी एकादशी, गुरु पौर्णिमा, आषाढ अमावस्या, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, भगवान शंकराच्या आराधनेचा संपूर्ण श्रावण मास, गोकुळाष्टमी पोळा, हरितालिका, ऋषिपंचमी, गौरी- गणपती, नवरात्र उत्सव,दसरा, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी, तुळशी विवाह कार्तिक पौर्णिमा आदींसारखे सुखदायक,मनाला, शरीराला आणि आध्यात्मिक उन्नतीला साधक ठरणारे सण आणि उत्सव साजरे होतात.

चातुर्मासाचा हा काळ भौतिकदृष्ट्या सुगीचे दिवस घेऊन येतो.तसेच चातुर्मासाचा हा काळा प्रामुख्याने पावसाळी असतो,या काळात रोगांचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात असते. मानवी आरोग्याला अपाय ठरेल अशा खाद्य घटकांना निषिद्ध मानले गेले आहे. श्रावण मास हा अत्यंत पवित्र असून या महिन्यात मासाहाराचा पूर्णपणे त्याग करतात. कांदा, लसूण, वांगी आदींसारखी पचनास जड असणारे व तामसी पदार्थ वर्ज्य मानले आहेत. या उलट पचनास हलके व सात्विक आहार सेवनाचा निर्देश दिला आहे. आरोग्यास अपाय होईल अशा पदार्थांना आपल्या पूर्वजांनी अतिशय विचारांती ही तत्वे सांगितलेली आहे. जी आजच्या जीवनशैलीस व पर्यावरणीय दृष्टिकोनातून चातुर्मासाच्या दरम्यान आहार-विहारांची संहिता ही मोलाची भूमिका बजावत असतात. पवित्र व सात्विक असा चातुर्मासाचा उल्लेख ब्रह्मवैवर्त पुराण, पद्मपुराण, भागवत पुराण, गरुड पुराण, स्कंदपुराण आणि भविष्यपुराणामध्ये आलेला आहे. एकंदरीत चातुर्मासाकडे धार्मिकदृष्ट्या न बघता विज्ञानाच्या दृष्टीने सुद्धा बघणे जरुरी आहे.

● शशिकांत म.तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
मो : ९१३०८३५४५८
shashikanttote1979
@gmail.com

# अखेर... शिकस्त शाळेची गटशिक्षण अधिका-याकडून पाहणी

## खेट्री जि. प. शाळेचा अहवाल सादर होणार





■ प्रतिनिधी | खेट्री ■

खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या शिकस्त वर्ग खोल्यांमुळे विद्यार्थ्यांना पावसात उघड्यावर बसून शिक्षण घ्यावे लागत असल्याबाबत दैनिक जनमाध्यमने ७ जुलैच्या अंकात वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर शिक्षण विभाग खडबडून जागा झाला.

या वृत्ताची तात्काळ दखल घेत गटशिक्षण अधिकारी शोभा मेहरे आणि अभियंता कोरडे यांनी ८ जुलै रोजी खेट्री येथील शाळेची पाहणी केली. त्यांनी संबंधित बांधकामाचा सविस्तर अहवाल तयार करून तो लवकरच जिल्हा परिषदेला सादर करण्यात येणार असल्याची माहिती दिली. गेल्या वर्षभरापासून शाळेच्या वर्गखोल्यांचे छत खराब असून टिनपत्रे उडाल्याने पावसाचे पाणी वर्गांमध्ये साचते. त्यामुळे विद्यार्थ्यांना भर पावसात उघड्यावर शिक्षण घ्यावे लागत होते. पालकांनी वेळोवेळी तक्रारी करूनही याकडे दुर्लक्ष करण्यात येत होते. परंतु जनमाध्यमने या प्रश्नावर प्रकाशझोत टाकल्यानंतर अखेर प्रशासन हलले असून विद्यार्थ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आता याप्रकरणी पुढे काय होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



खेट्री येथील जिल्हा परिषद शाळेच्या दुरुस्तीचा मुहूर्त निघेना

# जल जीवन मिशनच्या खोदकामामुळे रस्त्यांची ऐशीतैशी

### पिंपळखुटा ग्रामस्थांचा जीव मेटाकुटीला ; चिखलमय रस्त्यावरून करावा लागतोय प्रवास

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या पिंपळखुटा गावात जल जीवन मिशनअंतर्गत करण्यात आलेल्या पाईपलाईनच्या खोदकामामुळे रस्त्यांची अक्षरशः वाट लागली आहे. अनेक महिन्यांपूर्वी जल जीवन मिशन योजनेतून पाण्याची पाइपलाइन टाकण्यासाठी रस्ते खोदण्यात आले, मात्र नंतर रस्त्यांची दुरुस्तीच न केल्यामुळे पावसात तीच माती चिखलात परिवर्तित झाली आहे.

गावातील मुख्य रस्त्यांवर साचलेल्या चिखलामुळे ग्रामस्थांची ये-जा चिखलातून करत करत तारेवरची कसरत झाली आहे. विद्यार्थ्यांना शाळेत जाणे, नागरिकांना बाजारहाट व दवाखान्यात पोहोचणे म्हणजे दिव्यच झाले आहे. गावकऱ्यांनी अनेकदा ठेकेदार आणि प्रशासनाकडे रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी केली, पण त्यांनी कानाडोळा केल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

ग्रामस्थांच्या मते, ठेकेदार व प्रशासनाची मनमानी व निष्काळजीपणा हे यामागचे प्रमुख कारण आहे. खोदकामानंतर रस्ते पूर्ववत न केल्याने सध्या गावातील सर्वच रस्ते चिखलमय आणि धोकादायक बनले आहेत. यामुळे नागरिक संतप्त झाले असून ' लवकरात लवकर रस्त्यांची दुरुस्ती केली नाही, तर जल जीवन मिशनचे काम थांबवू! असा थेट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या गंभीर स्थितीकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे, अन्यथा ग्रामस्थांचा रोष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

**कंत्राटदार व प्रशासनाचे दुर्लक्ष : ग्रामस्थ वैतागले!**

कंत्राटदार व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थ त्रस्त गेल्या अनेक महिन्यांपासून जल जीवन मिशनचे काम रखडले आहे. रस्त्यांच्या खोदकामामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. पावसात ही माती चिखलात बदलली असून संपूर्ण गावात अस्वस्थता पसरली आहे. ग्रामस्थ प्रशासनाच्या विरोधात रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत.



'जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पाईपलाईन टाकल्यानंतर रस्त्यांची दुरुस्ती करणे गरजेचे होते, पण ठेकेदारांच्या हलगर्जीपणामुळे संपूर्ण रस्ते चिखलमय झाले आहेत. जर त्वरित उपाययोजना झाली नाही, तर गावकरी जल जीवन मिशनचे काम थांबवण्यास भाग पाडतील.'

**रवी महानकर,**
संस्थापक अध्यक्ष, वीर भगतसिंग शेतकरी सेना, पिंपळखुटा

# शहरात अंधाराचे साम्राज्य: रस्त्यावरील लाईट बंद

✔ नागरिक त्रस्त, मनपा विद्युत विभागाचे दुर्लक्ष
✔ शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांचा आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर गेल्या काही दिवसांपासून रस्त्यावरील लाईट बंद असल्याने अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. या समस्येकडे महानगरपालिका आणि विद्युत विभागाने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांनी दिला आहे.

शहरातील मध्यवर्ती ठिकानासह सिव्हिल लाईन चौक ते पोस्ट ऑफिस चौक, जिल्हाधिकारी बंगला ते अशोक वाटिका चौक, उड्डाण पुलाचा ब्रिज, सरकारी बगीचा ते इंटक भवन, निमवाडी ते गीतानगर, प्रमुख महामार्ग, तसेच रेल्वे स्टेशन मालधक्का ते फतेह चौक या मार्गांवर रात्रीच्या वेळी लाईट बंद असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावरील लाईट बंद असल्याने वाहनचालक आणि



पादचाऱ्यांना मोठा त्रास होत आहे. अंधारामुळे अपघातांचा धोका वाढला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना रात्री प्रवास करणे असुरक्षित वाटत आहे. शहरातील अनेक भागांमध्ये लाईट बंद असल्याने गुन्हेगारीच्या घटनांमध्येही वाढ होण्याची शक्यता आहे. महानगरपालिका आणि विद्युत विभागाने ही समस्या त्वरित सोडवावी. यासंदर्भात विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी लवकरच ही समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले आहे. तरीही, नागरिकांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे.जर ही समस्या लवकर सोडवली गेली नाही, तर आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल. असा इशारा शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांनी प्रशासनाला दिला आहे.

# सैनिकी मुलां-मुलींच्या वसतिगृहात प्रवेश सुरू

**अकोला :** अकोला येथील सैनिकी मुलां- मुलींच्या वसतिगृहात आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी इयत्ता १० वी व त्यापुढील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे.

प्रवेशाचे अर्ज वसतिगृहात उपलब्ध आहेत. हे वसतिगृह सिव्हिल लाईन परिसरात आकाशवाणी चौकानजिक आहे. अकोला शहराबाहेर वास्तव्य करणाऱ्या ग्रामीण व इतर भागातील आजी व माजी सैनिकांच्या पाल्यांना प्रवेश देण्यात येईल. या संधीचा जास्तीत जास्त आजी, माजी सैनिकांच्या पाल्यांनी लाभ घ्यावा. अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै आहे.

# जिल्हा बँक ग्रामीण भागाच्या उन्नतीचा स्तंभ -पोलीस अधीक्षक अर्चित चांडक



■ प्रतिनिधी | अकोला ■

सहकारी बँक, सोसायट्या ह्या ग्रामीण भागाच्या उन्नतीचा स्तंभ असून, बँकेतून सहजपणे मिळणाऱ्या कर्जामुळे कृषी, शिक्षण, कुटीरोद्योग तसेच उद्योगांना बळकटी मिळते. सहकारी बँका सोशल कॅपीटलचा पाया असून, सहकारातून सर्व घटकांत आर्थिक सुबत्ता येते, असे प्रतिपादन जिल्हा पोलिस अधीक्षक चर्चित चांडक यांनी येथे केले. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त रविवारी जिल्हा मध्यवर्ती बँकेचा प्रबोधन मेळावा स्थानिक पोलीस लॉनमध्ये घेण्यात आला. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर जिल्हा बँकचे संचालक डॉ.जयराज कोरपे, महादेवराव भुईभार, श्री शिवाजी महाविद्यालाचे प्राचार्य रामेश्वर भिसे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकरी अनंत वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती.चांडक पुढे बोलताना म्हणाले, सहकारी बँकेची विश्वासर्हता, पारदर्शक कारभारामुळे या बँकेबाबत शेतकऱ्यांसह नागरिकांत आपलेपणाची भावना आहे. बँकदेखील ही भावना जोपासत असून, ग्रामीण भागाला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिकतेला आर्थिक स्थैर्यातून समृध्दीकडे नेत आहे. त्यामुळे सहकाराचे महत्व वाढत असून, ही व्यवस्था आपल्या पूर्वजांनी उभी केली.

# सांस्कृतिक वारसा जोपासणे ही काळाची गरज - मंगेश वानखडे

■ प्रतिनिधी | अकोला ■

येथील श्री समर्थ शिशू वाटीका व श्री संताजी इंग्लीश प्रायमरी स्कूल येथे आषाढी एकादशीनिमित्त भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भगव्या पताकांनी सजवलेल्या आणि पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी सजलेल्या या दिंडीमुळे बाळापूर रोड परिसर पंढरीमय झाल्याचा अनुभव सर्व उपस्थितांनी घेतला.

पालखीचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक मंगेश वानखडे यांनी केले व ते पुढे बोलताना सांगितले की, सांस्कृतिक वारसा जोपासणे ही काळाची गरज आहे व विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची बीजे रोवण्यासाठी शाळेत सणांची सर्जनशील मांडणी अत्यंत आवश्यक आहे. भक्तीभाव, सांस्कृतिक जाणीव आणि पर्यावरणाचे भान या तिन्ही मूल्यांचा समतोल विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्यासाठी विद्याभारतीद्वारा संलग्नित श्री समर्थ शिशू वाटीका व श्री संताजी इंग्लीश प्रायमरी स्कूल नेहमीच पुढाकार घेत असते. प्रत्येक सण एक शिक्षण देतो आणि तो विद्यार्थ्यांनी अनुभवावा हीच आमची भावना आहे असे प्रतिपादन मुख्यध्यापक मंगेश वानखडे यांनी व्यक्त केले.



६ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्ताने श्री संताजी कॉन्व्हेंट स्कूल, बाळापुर रोड भिरड वाडी जवळ अकोला येथे दरवर्षीप्रमाणे विठ्ठल-रुक्मिणीसह वारकरीच्या वेशभूषेत फेरी काढली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध संतांच्या वेशभूषा, टाळकरी, लेझीम, मृदुंग, भगवे ध्वज घेऊन रस्ता रंगतदार केला. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या पालखी सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला, भजन अभंग गायन आणि नृत्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी संस्कृती जपण्याचा संदेश दिला. बालवर्गातील चिमुकल्यांपासून ते सर्व विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा साकारत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सामूहिक नृत्य व अभंग-भजन सादरीकरणाला पालकांनी भरभरून दाद दिली. शाळेतील शिक्षकांनीही भक्तिरसपूर्ण गायन सादर केले. पालकांनी मुलांचे विविध कलागुण मोबाईलमध्ये कैद केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका ज्योती फंदाट, अश्विनी खोत, मंजूषा देशमुख, विठ्ठल नांदूरकर, श्रध्दा गौड, मनिषा हाते, पूजा सांगळे, विनिता घुगे, तृप्ती इधोळ, शारदा गोमासे, प्रेरणा वानखडे, प्रिती काळे, दिव्या राऊत, जय राने, प्रतिक्षा दाते, गायत्री जुमळे, श्रृती काटकर, रुपाली वसतकार, वर्षा कवडे, रिना सिरसाट, शारदा भाकरे, ज्योती बोरकुटे, प्रिती वानखडे, प्रियंका कांबळे, सोनाली सोनोने, सौरव सिरसाट इत्यादी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीक स्पर्धेत घ्यावा -कृषी विभागाचे आवाहन

**अकोला :** अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीकस्पर्धा सन २०२५-२६ साठी राज्यस्तरावरून कृषी विभागामार्फत पीकस्पर्धा जाहीर करण्यात आल्या असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतक-यांनी या पीक स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी अजित कुंभार व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेस प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यांमध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल.

**Change In Name**

I HAVE CHANGE OF MY NAME FROM OLD NAME : **ABDUL QADEER** TO NEW NAME **ABDUL QUADEER ABDUL MUNAF** (AS PER MY DOCUMENTS) ADRES S : AT POST KHETRI TQ.PATUR DIST AKOLA

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

**वि. ०७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३५९/२०२४ — प्रोसेस नं. ११५७१/२०२४
चौ.ता. ०७/०८/२०२५ — दिनांक : ३१/०७/२०२५

**अर्जदार :** श्रीमती. लता धम्मपाल लाटकर पत्ता - रा. देवी खदान ३५, कौलखेड रोड, चांदुर, गांधी नगर, अकोला ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** उषा शांताराम लाटकर पत्ता - रा. देवी खदान, भागदिय हॉस्पीटील, योगेश ठाकुर यांच्या घराजवळ, ता. जि. अकोला
**मयताचा पत्ता :-** मयत : धनपाल शांताराम लाटकर
**पत्ता :-** रा. देवी खदान, ३५, कौलखेड रोड, चांदुर, गांधी नगर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत धनपाल शांताराम लाटकर यांचे दि.०८/०८/२०२१ रोजी खडकी, अकोला, ता. व जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०७/२०२४ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७७४/२०२५ — प्रोसेस नं. १०६१३/२०२५
चौ.ता. १६/०७/२०२५ — दिनांक : ०५/०७/२०२५

**अर्जदार :** १. सौ. दिपाली प्रदिप खरबडे रा. कपिलवस्तू नगर, नोवेल स्कूल जवळ, लकी किराणाच्या मागे, कौलखेड रोड, अकोला. ता. जि. अकोला २. वैशाली आशिष नारनवरे रा. फ्लॅट नं. ६, अतुल्य रेसीडेन्सी पाथर्डी रोड, नभांगण लॉनच्या मागे, इंदिरा नगर, सिडको कॉलनी, नाशिक. ३. सौ. सोनाली किरण पट्टेबहादूर रा. ए - ५०४, विश्वसृष्टी अपार्टमेंट, पापडे वस्ती जवळ, भालेराव नगर, हडपसर, पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. महेंद्र जयरामजी शिरसाट २. मनोरमा महेंद्र शिरसाट
**पत्ता :-** रा. दोघेही रा. कपिलवस्तू नगर, नोवेल स्कूल जवळ, लकी किराणाच्या मागे, कौलखेड रोड, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत महेंद्र जयरामजी शिरसाट यांचे दि.१६/१२/२०१२ रोजी राहते घरी अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत मनोरमा महेंद्र शिरसाट यांचे दि.०५/०७/२०२३ रोजी पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १६/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रक. रची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८८०/२०२५ — प्रोसेस नं. ७४४५/२०२५
चौ.ता. ०५/०८/२०२५ — दिनांक : ०२/०५/२०२५

**अर्जदार :** १) दिपक ऊर्फ मुकुंदराव दत्तात्रय शेलोकार २) सुमित दिपक ऊर्फ मुकुंदराव शेलोकार रा. विठ्ठल नगर, मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला, ३) सौ. केतकी अक्षय भुते रा. प्राध्यापक कॉलनी, रुख्मीनी नगर, अमरावती, ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शिला दिपक उर्फ मुकुंदराव शेलोकार
**पत्ता :-** रा. विठ्ठल नगर, मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शिला दिपक उर्फ मुकुंदराव शेलोकार यांचे दि.०९/०२/२००० रोज गायकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालय, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०५/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११९१/२०२५ — प्रोसेस नं. १०३५७/२०२५
चौ.ता. १८/०८/२०२५ — दिनांक : ०३/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती शांताबाई दिंगबर नहाटे २. श्रीमती रजनी सुहास नहाटे ३. अभिजीत सुहास नहाटे ४. आशुतोष सुहास नहाटे सर्व रा. गोडबोले प्लॉट, श्रीराम टॉवर जवळ, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुहास दिगंबर नहाटे
**पत्ता :-** रा. गोडबोले प्लॉट, श्रीराम टॉवर जवळ, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुहास दिगंबर नहाटे यांचे दि.२७/०४/२०२५ रोजी डाबकी रोड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११३०/२०२४ — प्रोसेस नं. १०१६४/२०२५
चौ.ता. १३/०८/२०२५ — दिनांक : ०१/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती रजनी विनोद सदाफळे २. संकेत विनोद सदाफळे दोघेही रा. ज्ञानदीप, गणेश नगर, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : विनोद जयदेवराव सदाफळे
**पत्ता :-** रा. ज्ञानदीप, गणेश नगर, लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विनोद जयदेवराव सदाफळे यांचे दि. १२/०४/२०२५ रोजी अकोला ता. जि अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११२९/२०२५ — प्रोसेस नं. १०६३४/२०२५
चौ.ता. ०८/०८/२०२५ — दिनांक : ०७/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती आशा अनंत काळे रा. गौरक्षण रोड, निवारा कॉलनी नं ४ जवळ, अनुपम एस.बी. आय. कॉलनी, अकोला ता. जि. अकोला. २. जयंत अनंत काळे रा. फ्लॅट नं ४, दिशा कार्तिक, उस्मानपुरा, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद ३. समिर अनंतराव काळे रा. गौरक्षण रोड, निवारा कॉलनी नं ४ जवळ, अनुपम एस.बी. आय. कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अनंत देविदास काळे
**पत्ता :-** रा. गौरक्षण रोड, निवारा कॉलनी नं ४ जवळ, अनुपम एस. बी. आय. कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अनंत देविदास काळे यांचे दि. २१/०९/२०१९ रोजी राहते घरी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०८/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# एनाडा साझ्याला कायमस्वरूपी तलाठ्याची प्रतिक्षा

**आष्टी (श.)/ जनमाध्यम**

तालुक्यातील एनाडा साझ्याला कायमस्वरूपी तलाठी नसल्याने शेतकऱ्यांची गोची होत चालली आहे.एक ना धड भाराभार चिंधा असा प्रकार एनाडा साझा बद्दल झाला आहे.त्यामुळे एनाडा साझ्याला कायमस्वरूपी तलाठ्याची प्रतिक्षा लागली आहे.

आष्टी तालुक्यातील एनाडा साझ्या मध्ये एनाडा,पिलापुर, जोलवाडी आणि लहान आर्वी ग्रामपंचायत कक्षेतील म सुजातपूर आणि विठ्ठलापूर असे एकुण पाच मौजे येतात.या साझ्यातील कायमस्वरूपी तलाठी कु. आश्वीनी जेनेकर यांचे प्रशासकीय कामकाज व्यवस्थीत नसल्याने पिलापुर, जोलवाडी आणि लहान आर्वी ग्रामपंचायतने ठराव घेऊन बदली केली होती.तेव्हा पासुन आज पर्यंत



## वर्षभरात बदलले सात तलाठी
### तहसिल कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

तहसिल कार्यालयाने सात तलाठी बदलवून दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चांगलीच गोची झाली आहे.कु.आश्वीनी जेनेकर यांची बदली झाल्या नंतर तलाठी सिध्दार्थ उगवकर, कु.अर्चना कोकाटे,पुन्हा सिध्दार्थ उगवकर त्यानंतर तलाठी अंसार शेख,कु.शिवानी साठवणे त्यानंतर पवन बांबळकर आणि आता पुन्हा सातव्यांदा तहसील कार्यालय आष्टी यांनी १०-६-२०२५ रोजीचे पत्र क्रमांक ५८८ नुसार तलाठी कु. चारुशीला गायगोले यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे कळले आहे.

एनाडा साझ्यातील पाचही मौजे क्षेत्रफळाने जरी लहान असले तरी संवेदनशील मौजे असल्याचे तालुक्यात प्रसिद्ध आहे. अशा या ठिकाणी एका वर्षामध्ये सहा ते सात तलाठी बदलतेय म्हणजे प्रशासनाच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांची गोची करणे आहे.

तत्कालीन तहसीलदार हंसा मोहणे यांनी एनाडा साझ्याला हेतू पुरस्पपणे दोन दोन महिन्याकरिता आजपर्यंत सात तलाठी नियुक्त केले.

मात्र आता नव्याने रुजू झालेल्या कर्तव्यदक्ष तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांनी एनाडा साझ्याकडे लक्ष देऊन एनाडा साझ्याचा पदभार तलाठी पवन बांबडकर यांच्याकडेच कायम ठेवावा अशी एनाडा साझ्यातील शेतकऱ्यांची मागणी होत आहे.

# वंदनीय राष्ट्रसंतांच्या कार्याचा आष्टी तालुक्यात प्रसार आणि प्रचार वाढविणार

## तालुका कार्यकारणी बैठकीत गुरुदेव भक्तांचा निर्धार

**आष्टी(श.)/ जनमाध्यम**

आपल्या सर्वांना वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिप्रेत असलेला भारत घडवायचा आहे.त्यासाठी आष्टी तालुक्यातील सर्व गुरुदेव भक्त एकत्र एकवटले असून वंदनीय राष्ट्रसंतांच्या कार्याचा प्रसार आणि प्रचार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या आदेशान्वये आष्टी तालुका श्रीगुरुदेव सेवा मंडळाची बैठक रविवारला गुरुदेव सेवा मंडळ शाखा नवीन आष्टी येथे पार पडली.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गुरुदेव सेवक ईश्वर वरकड तर प्रमुख अतिथी म्हणून वर्धा जिल्हा सेवाधिकारी प्रभाकर गायकवाड, गुरुदेव सेविका शैला वाघ, मार्गदर्शक गुणवंत मानमोडे,आष्टी तालुका सेवाधिकारी तारेश बोडखे



उपस्थित होते.

यावेळी सर्व गुरुदेव भक्तांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विविध कार्य मनोभावे पूर्ण करण्याचा मानस व्यक्त केला.महाराजांच्या सामुदायिक प्रार्थना गावागावात झाल्या पाहिजे,राष्ट्रसंत जयंती आणि पुण्यतिथी महोत्सव,ग्रामगीता जीवन विकास परीक्षा करिता तालुक्यात केंद्र आणि विद्यार्थी संख्या वाढविणे,राष्ट्रवंदना,सुसंस्कार शिबिर घेणे,शाळा महाविद्यालयामध्ये राष्ट्रसंतांचे विविध कार्यक्रम,आष्टी येथे तालुकास्तरीय संमेलन आयोजित करण्याचे ठरविण्यात आले आहे.

सदर कार्य फार अफाट असून प्रत्येकाचा सहभाग यासाठी असायलाच पाहिजे.तरच राष्ट्रसंतांचे स्वप्न पूर्ण होईल. यासाठी प्रत्येकाने मनोभावे कार्य करण्याचा मानस व्यक्त केला. यावेळी सन २०२५-२६ या वर्षामध्ये घेण्यात येणाऱ्या ग्रामगीता जीवन विकास परीक्षेच्या अर्जाचे वाटप प्रत्येक केंद्राच्या प्रमुखांकडे करण्यात आले आहे.

सदर बैठकीला ग्रामगीताचार्य विनोद पेठे,गजानन भोरे,शोभा गावनेर,माया सावरकर, सुरेश अहीव,रेवाशंकर वाघ,प्रमोद बुरंगे,राजेंद्र सावरकर,अंबादास कुडुपले,सुरेश मोरे,आशिष मोहोड,प्रमोद कापसे,सुधीर वाघ,अमोल सोटे,स्वप्निल पोहकार,अण्णाजी भालेराव,दिपक पोटे,अॅड.संकेत बालपांडे यांच्यासह तालुक्यातील गुरुदेव भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचालन गजानन भोरे महाराज,प्रास्ताविक विनोद पेठे तर आभार तारेश बोडखे यांनी मानले. त्रिवार जयघोषाने बैठकीची सांगता झाली.

# लोणसावळी-शेकापूर रस्त्यावरील पुलाला पडले जीवघेणे भगदाड

## खा. अमर काळे यांनी केली रस्त्याची पाहणी

**वर्धा / जनमाध्यम**

लोणसावळी-शेकापूर मांडवा रस्त्यावरील असलेल्या पुलाला मागील अनेक दिवसांपासून जीवघेणा मोठ भगदाड पडले असून या रस्त्यावरून शेतकरी,विद्यार्थी,व अनेक वाहनांची ये जा करतात, अनेक वेळा संबंधितांना पूल दुरुस्ती संदर्भात मागणी करूनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहत असतांना सदर खड्डा दिसून येत नाही या पुलावर पडलेल्या खड्ड्यांमुळे दुर्दैवी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही,दिनांक ७ जुलै रोजी खासदार अमर काळे यांनी सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली,तसेच लोनसावळी ते डोरली रस्त्यावर मोठी विदारक परिस्थिती असून या रस्त्यावर



असलेल्या पुलच वाहून गेल्याने जाण्यासाठी योग्य मार्ग उरलेला नाही,मोठी कसरत करून शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना जाणे येणे करावे लागते,याही रस्त्याची खासदार अमर काळे यांनी पाहणी केली,तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ फोन लावून सदर परिस्थिती लक्षात आणून देत सदर दोन्ही पुलाचे काम व दुरुस्ती करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या,यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

# तलाठी कार्यालयाचे ९० महिन्यांचे भाडे थकले

## मेंढे यांचे निवेदन

**वर्धा/ जनमाध्यम**

कोपरा (चाणकी) येथील उत्तम हरिभाऊ मेंढे यांनी तलाठी कार्यालयाला किरायाने खोली दिली. मात्र, ९० महिने झाले असूनही किराया मिळाला नसल्याने मेंढे शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवित आहे. मात्र, याकडे अद्यापही कुणीच गांभीर्याने दखल घेत नसल्याने पालकमंत्र्यांना निवेदन देत न्याय देण्याची मागणी त्यांनी केली.

कोपरा गावात तलाठी कार्यालयाला जागा द्यायला कुणी तयार नव्हते. उत्तम मेंढे यांनी प्रति महिना १ हजार रुपये नियमानुसार शर्ती, अटीसह सन २०१२ पासून खोली किरायाने दिली. पण, नोव्हेंबर २०१७ पर्यंत ९० हजार रुपये थकीत भाडे तलाठी कार्यालय विभागातून मिळाले नाही. गेल्या आठ वर्षांमध्ये अनेक वेळा प्रत्यक्ष जाऊन मागणी केली. परंतु, संबंधित कार्यालयातून समाधानकारक माहिती मिळत नाही. माहिती विचारली असता आमच्याकडे फंड अजूनपर्यंत आलेला नाही, अशी कारणे सांगून चालढकल करीत असल्याचा आरोप उत्तम मेंढे यांनी केला आहे.जिल्हाधिकारी कार्यालयातून थकीत किराया देण्याबाबत पत्र पाठविण्यात आले होते. मात्र, दखल घेतली नाही. थकीत किराया पंधरा दिवसाच्या आत द्यावा, अन्यथा खोली खाली करून द्यावी, अशी मागणी पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

उत्तम मेंढे यांनी पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून किराया तत्काळ देऊन मला न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे. याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

## विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने गायीचा मृत्यू

**सेलू**-तालुक्यातील सेलडोह शिवारात पडीत जागेवर जनावरे चरत असताना तुटलेल्या विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने गायीचा मृत्यू झाला. ही घटना सेलडोह शिवारात घडली.सिंदी-सेलडोह मार्गावर गावालगत असलेल्या पडीत जागेवर बैल तसेच एक गाय चराईसाठी सोडली. त्याच ठिकाणी वीज वितरण कंपनीचा विद्युत तार तुटून पडलेला होता. याची माहिती कोणाला नव्हती. चारा खात असताना विद्युत तारेला स्पर्श झाल्याने गायीचा मृत्यू झाला. यामध्ये शेतकरी प्रशांत सोनटक्के यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांना मदत देण्याची मागणी होत आहे.

# गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप



**हिंगणघाट / जनमाध्यम**

निळकंठ मुरार घटवाई विद्यालय, वडनेर येथे विद्यार्थ्यांना सामाजिक दायित्व म्हणून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी इयत्ता पाचवीच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत चा प्रवास सुकर व्हावा, या दृष्टिकोनातून सायकल वाटप कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राजेंद्र डागा, अध्यक्ष, लोक शिक्षण मंडळ, शिखरचंद मुनोत, उपाध्यक्ष, लोक शिक्षण मंडळ, रोशन डागा, सचिव, लोक शिक्षण मंडळ, सातपुते, सहसचिव, लोक शिक्षण मंडळ, संध्या डागा, श्वेता डागा, पूजा बोथरा, मनोज कासवा, विवेकजी लोढा, गौरव , कु. निधि डागा, विद्यालयाचे प्राचार्य रवींद्र गोडे , मुख्याध्यापक चवडे , उपप्राचार्या बोंडे , घनश्याम जवादे, वस्तीगृह निरीक्षक, बंसी व विद्यालयाचे शिक्षक वृंद उपस्थित होते.

# आयुर्वेद भारती संस्कृतीशी निगडीत वैद्यकशास्त्र - खा. अमर काळे

**वर्धा/ जनमाध्यम**

भारतीय जीवनशैलीचा आयुर्वेदाशी फार निकटचा संबंध प्रकर्षाने जाणवते. चार वर्षापुर्वी कोरोनाच्या महामारीमुळे संपूर्ण देशात युध्द्धसदृश परिस्थिती निर्माण झाली होती.परिस्थिती हाताळणाच्या शासन यंत्रणेसोबत आघाडीवर असणारे डॉक्टर्स मंडळीला आज समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.करोना संकटावर मात करण्यासाठी तूर्तास तरी उपलब्ध औषधोपचार हा आयुर्वेदाशी निगडीत असल्याचे आढळून आले. तेव्हा वेदशास्त्राची परंपरा असणाऱ्या भारतीय संस्कृतीशी निगडीत या आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार होण्यास एक मोठे आधार ठरले आणि लोकांचा कल या आयुर्वेदिक उपचार पद्धति कडे



## पारसनाथ उपचार केंद्राचे उद्घाटन

वाढले आहे. असे प्रतिपादन खा. अमर काळे यांनी व्यक्त केले.

ते डॉ. संकेत विजय नाखले यांच्या पारसनाथ आयुर्वेदिक केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी वर्धेचे पोलीस अधिक्षक अनुराग जैन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतिश अंभोरे, पारसनाथचे संस्थापक डॉ. भालचंद्र महामुनी, डॉ. सोनिया महामुनी, डॉ. अरविंद वंजारी, डॉ. संकेत नाखले, डॉ. प्राची नाखले, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, ज्येष्ठ समाजसेवी मोहनबाबु अग्रवाल, श्यामसुंदर राठी, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, प्रहार समाज जागृती संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर आदी मान्यवर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. अनुराग जैन म्हणाले की, आपले जीवन एक संघर्ष असून जो संघर्षमय जीवन जगतो, तोच खऱ्या जीवनाचा आनंद घेऊ शकतो.

योग्य उपचार, आहार व सकारात्मक जीवनशैली अंगीकारल्यास जीवन चांगल्याप्रकारे व्यतीत करता येते. यावेळी कार्यकारी अभियंता सतिश अंभोरे, ज्येष्ठ समाजसेवी मोहनबाबु अग्रवाल आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

प्रस्तावना डॉ. भालचंद्र महामुनी संचालन नामदेव अखाडे, तर आभार इंजि. विजय नाखले यांनी व्यक्त केले. पारसनाथ केंद्रातर्फे आयोजित एकदिवसीय शिबिरांत मोठ्या संख्यानी लोकांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाला. डॉ विद्या राजु कळसाईत, शशांक चतारे, प्रा. खलील खतीब, राजेश शर्मा, अब्दुल गणी, प्रा. मुमताज खान एहसान राही, राजु लभाणे, प्रशांत पांडे, मंगेश भोंगाडे, डॉ. राठोड, डॉ. घोडखांडे, डॉ. शोएब शेख, डॉ. सातपुते, डॉ. झोरे, डॉ. नितीन मेशकर, डॉ. वाडीभसमे, डॉ. जाधव, डॉ. देवतळे, डॉ. शिंदे, अनिल गावंडे, साहेबराव गोडे, संतोष देशमुख, इम्रान राही आदी अनेक मान्यवर मंडळी आवर्जुन उपस्थित होते.

# कृत्रीम खाद्य रंग मुलांसाठी स्लो पॉयझन

**आष्टी(श.)/जनमाध्यम**

सध्याच्या व्यस्त आणि धकाधकीच्या जीवनशैलीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होताना दिसते लहानापासून तर ज्येष्ठांच्या खाण्यापिण्याच्या सवयीत मोठा बदल झाला आहे अपुरा वेळ आणि आळस यामुळे घरगुती अन्नपदार्थांपेक्षा प्रोसेस्ड फूड किंवा बाहेरून अन्नपदार्थ मागवण्यात येतात याचा आरोग्यावर फार वाईट परिणाम होत आहे, बाहेरच्या खाद्यपदार्थांमध्ये अन्नातील कृत्रिम रंग म्हणजे आर्टिफिशियल फूड कलरचा मोठा वापर होत असून हे साऱ्यांसाठी ठरू शकते काळजी घेण्याचे आवाहन बालरोग तज्ज्ञांनी केले आहे.




खाद्य रंगाचा रंग आणि चव सुधारण्यासाठी याचा वापर केला जातो मात्र या कृत्रिम खाद्य रंगामुळे कर्करोगासारख्या गंभीर रोगाची जोखीम असल्याचे बालरोग तज्ज्ञांनी सांगितले खाद्यपदार्थाचा रंग आणि चव सुधारण्यासाठी कृत्रिम खाद्य रंगाचा म्हणजे आर्टिफिशल फूड कलरचा वापर केला जातो पण काही अहवालानुसार अति सेवनामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजाराचा धोका असतो लाल रंगासाठी बीटा चा अर्क पिवळ्या रंगासाठी हळद हिरव्या रंगासाठी क्लोरोफिल हे नैसर्गिक खाद्य रंग आहेत. मात्र कृत्रिम खाद्य रंगातील पदार्थ प्रक्रिया केलेला असतात सुंदर लोभस दिसत असले तरी कृत्रिम खाद्यरंग रासायनिक असतात. या पदार्थांमुळे आरोग्य विषयक समस्या येतात कृत्रिम खाद्य रंग हे मिठाई शीतपेयातून ते पॅक स्नॅक्सच्या पदार्थातून शरीरात जातात. यामुळे कृत्रिम रंग आणि नैसर्गिक रंगातील फरक जाणून मुलांच्या आहाराबाबत पालकांनी जागरूक असावे असेही बालरोग तज्ञांनी सांगितले आहे.

घरी शिजवलेले अन्न खावे, घरगुती अन्नपदार्थ खावे ,पॅक बंद अन्नापासून शक्यतो दूर राहावे,कृत्रिम खाद्य रंगाचे तोटे,पदार्थांमध्ये बेंझिन आढळते यामुळे आजारांना आमंत्रण मिळते फूड कलर युक्त , पदार्थाचे अतिसेवन कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता बळावते,कृत्रिम फूड यामुळे एलर्जी ची समस्या उद्भवू शकते.

# सतत पेनकिलर खाणे आरोग्यासाठी धोकादायक

## डॉक्टरांच्या मते वाढू शकतो फुफ्फुसाचा त्रास

**साहूर/ जनमाध्यम**

आजच्या या आधुनिक युगात अनेकांचे खानपान पूर्णता बदलले असून व्यायामाचा अभाव व वेळी अवेळी चटक-मटक मसालेदार पदार्थ खाण्यामुळे अनेकांच्या आरोग्यात बिघाड आला आहे. हातपाय दुखणे. अंग दुखणे. डोके दुखणे ह्या समस्या आता नित्याच्या झाल्या असून अनेक नागरिक डॉक्टरच्या सल्ल्याने औषधी न घेता हातपाय किंवा अंग दुखल्यानंतर मेडिकलमध्ये जाऊन स्वतःच्या मनाने पेन किलर गोळ्या खातात परंतु अशा पेन किलर गोळ्या सतत खाणे आरोग्यासाठी धोकादायक असून त्यामुळे फुफ्फुसाचा त्रास वाढू शकतो असे डॉक्टर सांगतात

पेन किलर गोळ्या खाल्ल्याने अनेकदा आजार बरा होतो मात्र चुकीच्या पेन किलर किंवा अधिक प्रमाणात पेन किलर गोळ्या घेतल्याने आजारी व्यक्तीच्या जीवावर बेतू शकते पेन किलर गोळ्या मध्ये पॅरासिटॉमल आइब्रुप्रोफेन या गोळ्यांचा समावेश आहे, पॅराशिटामल ही गोळी साधारणता ताप आल्यावर घेतात मात्र पॅराशिटामल ही गोळी डॉक्टरांना न विचारता वारंवार घेतल्याने ॲसिडिटी आणि पोटात अल्सरचा त्रास होण्याचा धोका संभवत असल्याचे डॉक्टर सांगतात पॅरासिटॉमल ही सहा तासांमध्ये एकदाच खावी अन्यथा पेन किलर शरीराला हानिकारक ठरू शकते तर आइब्रुप्रोफेन आणि पॅरासिटॅमल या दोन गोळ्यांना एकत्र करून आयब्रुप्रोफेन पेन किलर बनवली जाते असे डॉक्टर सांगतात, या पेन किलरचे वारंवार सेवन केल्याने फुफ्फुसाचा त्रास वाढू शकतो आणि दमा होऊ शकतो असेही डॉक्टर सांगतात या व्यतिरिक्त रक्तदाब थायरॉईड सारखे आजार होऊ शकतात, त्यामुळे पेन किलर गोळ्याचे सेवन हे डॉक्टरांचा सल्ला घेऊनच करावे.

त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या मते कप सिरप मुळे खोकला आणि सर्दी सारखे रोग आजार बरे होतात मात्र याचे जास्त सेवन केल्याने शरीरात सुस्ती आणि वारंवार झोप येते तसेच कफ सिरपच्या अधिक सेवनाने दृष्टीही कमजोर होण्याचा धोका संभवतो त्यामुळे कफ सिरप हे डॉक्टरांचा सल्ला घेऊनच घ्यावे पेन किलर सारख्या गोळ्यांचे अधिक सेवन केल्यावर बद्धकोष्ठतेचा त्रासही होऊ शकतो त्यामुळे डॉक्टर पेन किलर देताना ॲसिडिटीच्या गोळ्या देतात कारण त्याने बद्धकोष्ठता होत नाही असे डॉक्टर सांगतात.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १३ **अंक** - २२४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम



# बाधित शेतकऱ्यांनी तात्काळ माहिती सादर करावी

## -तहसीलदार प्रदीप शेवाळे यांचे आवाहन

**धारणी/प्रतिनिधीः-** धारणी तालुक्यात २४ व २५ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील चार महसुल मंडळांमधील एकूण १२६ गावांतील मका, ज्वारी, सोयाबीन, धान व कपाशी आदी शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. धारणी, हरीसाल, साद्राबाडी व धुळघाट गट हे चार महसुल मंडळ या नुकसानीस बाधित आहेत.या घटनेनंतर शासनाने घेतलेल्या तात्काळ दखलीनंतर शासन निर्णय क्रमांक सीएलएस-२०२५/प्र.क्र.१९/म-३, दिनांक १८ मार्च २०२५ अन्वये शेतकऱ्यांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी आपले बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक कृषी सहाय्यक, ग्रामसेवक अथवा तलाठी यांच्याकडे सादर केले आहेत, त्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. परंतु अद्यापही अनेक बाधित शेतकऱ्यांनी आपली आवश्यक माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर केलेली नाही. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना धारणी तालुका प्रशासनातर्फे कळविण्यात येते की, ज्या शेतकऱ्यांचे नाव ऑगस्ट-२०२४ मध्ये झालेल्या नुकसानीच्या यादीत आहे त्यांनी तात्काळ आपली माहिती (बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक) गावातील कृषी सहाय्यक, ग्रामसेवक अथवा तलाठी यांच्याकडे जमा करावी. त्यामुळेच शासनाच्या अनुदान योजनेचा लाभ आपल्याला वेळेत मिळू शकेल.या बाबत कोणतीही अडचण असल्यास स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन तहसीलदार प्रदीप शेवाळे यांनी केले आहे.

# शिक्षणमहर्षी केशवराव टोंपे यांचे निधन



अमरावती/प्रतिनिधीः- अंबापेठ (अमरावती) येथील ज्येष्ठ समाजसेवक, शिक्षणमहर्षी केशवराव गोविंदराव टोंपे (वय ८३) यांचे आज, दि. ८ जुलै रोजी दुपारी १२.४५ वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे. स्व. केशवराव गोविंदराव टोंपे हे अखिल भारतीय नामदेव क्षत्रिय महासंघ आणि संत नामदेव महाराज राष्ट्रीय एकात्मता विश्व महासंमेलनाचे अध्यक्ष तथा भास्कर टोंपे व प्रा. विजय टोंपे यांचे पिताश्री होते. त्यांच्या निधनामुळे समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उभ्या असलेल्या दीपस्तंभाची अचानक हानी झाली आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात शिक्षण हा एकमेव खरा दीपस्तंभ मानून, गोरगरिबांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अपार मेहनत घेतली. त्यांच्या प्रयत्नांतून कित्येक कुटुंबांचे जीवन उजळून निघाले. समाजाच्या उत्थानासाठी त्यांनी आयुष्य वाहून घेतले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना-जावई, नातवंड असा परिवार आहे.

## स्वराज माहोरे यांचे निधन



**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या काही दिवसांपासून आजाराशी लढा देत असलेले पत्रकार स्वराज माहोरे यांचो घुईखेड येथे मध्यरात्री निधन झाले. घुईखेड येथे आज मंगळवारी (दि.८) दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. स्वराज माहोरे यांनी अमरावती येथील अनेक वृत्तपत्रात पत्रकारिता केली होती.

# गुरुपौर्णिमेच्या दिवशी 'एक पेड गुरु के नाम' अभियान

## १००० वृक्षांच्या वृक्षारोपणाचा संकल्प

अमरावती/प्रतिनिधीः- गुरुपौर्णिमेच्या अनुषंगाने गुरुवारी दि. १० जुलै २०२५ रोजी अध्यात्मिक मूल्य जाणवण्यासाठी वृक्षारोपण करण्याची संकल्पना राज्यस्तरावर ओशोध्यान केंद्र अमरावती यांनी ठेवली आहे. 'एक पेड गुरु के नाम' असे ह्या अभियानाला नाव देण्यात आले आहे. आपण एक साधा वृक्ष लावून आपल्या गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करणार आहोत. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने आणि मानवतेची सामाजिक जबाबदारी पार पाडण्याच्या अनुषंगाने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. तसेच एक हजार वृक्षांचे वृक्षारोपण संकल्प करण्यात आले आहे. ओशो ध्यान केंद्र अमरावती ह्यांच्या वतीने गुरुपौर्णिमा दिवशी 'एक पेड गुरु के नाम' ह्या अभियानाला सुरुवात करण्यात येणार आहे. गुरुपौर्णिमा हा पवित्र उत्सव असून आपण 'एक पेड गुरु के नाम' ह्या वृक्षारोपण संकल्पात सहभागी व्हावे व आपल्या गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एक पेड लावावे अशी विनंती करण्यात आली तसेच ओशो ध्यान केंद्र अमरावती,येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. सर्व नागरिकांनी वृक्षारोपणामध्ये सहभाग नोंदवून आपल्या गुरूच्या नावाने एक पेड लावावे. तसेच ध्यान केंद्र यांच्या मार्गदर्शनाने नजिकच्या मोकळ्या भूखंडावर वृक्षारोपण करावे व त्याची आपल्याकडून देखभाल करावी ह्या सूचना सर्वांनी कटाक्षाने पाळाव्यात यावी, आपणही या पवित्र कार्यात सहभागी व्हावे अशी विनंती आयोजकांनी केली आहे. अमरावती वनसंस्था, अमरावती नवनिर्माण, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली एक १००० रोपांचे पुरवठा करण्यात येणार आहे.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - १२७५/२०२५
भिमाबाई व इतर वि निरंक
पुढील तारीख २०.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :- १. **भिमाबाई खुशालराव देवरे**, वय ८२ वर्षे, धंदा - निल
रा.गवई मार्बल प्लॉट नं.६४,सातुर्णा साई नगर अमरावती ता.जि.अमरावती
२. **सुरेश खुशालराव देवरे**, वय ५६ वर्षे, धंदा - मजुरी
रा.एमआयडीसी रोड कुंभारवाडा जवळ, नवदुर्गा विहार साईनगर अमरावती, ता.जि.अमरावती
३. **अन्तकाला अरुणराव बेलसरे**, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.कठोरा गांधी पोस्ट बेलोरा खुर्द, ता.जि.अमरावती
४. **महानंदा भिमराव मनोरे**, वय ६१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.लोहगांव,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत खुशाल सुखाजी देवरे हे दि.२०/१२/२०२० रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार भिमाबाई खुशालराव देवरे व इतर** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **भिमाबाई खुशालराव देवरे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०५.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये,
शिक्का **सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**(C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१६२/२०२५** ने.ता.०८.०८.२०२५

**कमला -- वि --निरंक**

अर्जदार : १. **कमला रामजी खडसे**
२. **दीपक रामजी खडसे**
अ.क्र.१ व २ रा. दाभा ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि // निरंक**

ज्याअर्थी, **मयत रामजी जयराम खडसे यांचा मृत्यू दि.११.०१.२०२५ रोजी दाभा ,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. मयत यांचे अर्जदार क्र.१ पत्नी, अ.क्र.२ मुलगा आहे. अर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०४ जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशानुसार,**
शिक्का **सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**जाहीर नोटीस**
**विद्यमान श्री. पी.पी.देशमाने साहेब, ९ वे सहदिवाणी न्यायाधिश , (क.स्तर), अमरावती यांचे न्यायालयात**

**आर.एम.जे.सी.क्र.(सक्सेशन) ७९१/२०२५** **ने.ता.२४/०६/२०२५**

**अर्जदार :-** **सुवर्णा शेखर दातेराव**
वय ५२ वर्ष, धंदा-घरकाम,
रा.रुख्मीणी नगर रोड, बोधरा कॉम्प्लेक्स, विवेकानंद कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :-** **एल.आय.सी.इंडिया, शाखा अंजनसिंगी रोड,**
धामणगाव रेल्वे, तालुका धामणगाव रेल्वे, जि.अमरावती

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत रोहित शेखर दातेराव यांचे दिनांक ०३/०९/२०२३ रोजी अमरावती येथे मयत झाले.अर्जदार सुवर्णा शेखर दातेराव यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **Application under Section 372 of the Indian Succession Act** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **सुवर्णा शेखर दातेराव** वरीलप्रमाणे सदहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/०४ /२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**आदेशानुसार,**
शिक्का **सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,**
**अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्री.पी.के.धोंडगे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१२०७/२०२५
श्रीमती शारदा अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.०२.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Smt.Sharda Amarrao Makeshwar, Age 50 Yrs. Occu.: Service
2. Pankaj Amarrao Makeshwar, Age 26 Yrs. Occu.: Education
3. Sau.Harshada Ashwajit Sirsat, Age 24 Yrs. Occu.: Household
All R/o. Asegaon Purna, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अमर उत्तमराव माकेश्वर** हे दिनांक 18.11.2005 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **शारदा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शारदा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २६.०६.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्री.पी.के.धोंडगे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१२०९/२०२५
श्रीमती वंदना अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.०१.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Smt.Vandana Anil Abruk, Age 54 Yrs. Occu.: Household
2. Pratik Anil Abruk, Age 30 Yrs. Occu.: Agriculture
3. Roshan Anil Abruk, Age 28 Yrs. Occu.: Education
All R/o. Malkapur, Tq. & Dist. Akola.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अनिल नामदेवराव अब्रुक** हे दिनांक 26.02.2025 रोजी Malkapur, Tq. Dist. Akola येथे मयत झाले. अर्जदार **वंदना अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वंदना अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २६.०६.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**प्रो.क्र....../२०२५**

**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक २४५/२०२५ ने.ता.१३.०८.२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती पार्वताबाई शंकरराव मते, वय ८२ वर्षे, धंदा - निरंक
२. राजाभाऊ शंकरराव मते, वय ६० वर्षे, धंदा - मजुरी
३. विजय शंकरराव मते, वय ५७ वर्षे, धंदा - मजुरी
४. अशोक शंकरराव मते, वय ५४ वर्षे, धंदा - मजुरी
सर्व रा.टाकरखेडा संभू, ता.भातकुली, जि.अमरावती

**-- विरध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **शंकरराव पुंजाजी मते** हे दि.**०३.०३.२०११** रोजी मयत झाले. अर्जदार **श्रीमती पार्वताबाई शंकरराव मते,** वय ८२ वर्षे, व्यवसाय - निरंक, रा.टाकरखेडा संभू, ता.भातकुली, ता.जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे **कायदेशीर वारस प्रमाणपत्र** मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**२३.०६.२०२५** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **शंकरराव पुंजाजी मते** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **शंकरराव पुंजाजी मते** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २४.०६.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

आदेशान्वये,
शिक्का सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांसी याव्दारे सुचित करण्यात येते की, माझ्या अशीलांनी मौजे - राजापेठ, ता.जि.अमरावती येथील प्लॉट क्र.६०७, शिट क्र.८, क्षेत्रफळ ११८.१२ चौ.मी., धारणाधिकार -क, हा प्लॉट विकत घेण्याचा सौदा श्री.निळकंठ मारोतीराव ढोरे, रा.अमरावती यांचे सोबत केला आहे.

तरी सदर मिळकतीवर (प्लॉटवर) इतर कुणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा अथवा विसारहक्क असल्यास ही सुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन ३ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर तसा आक्षेप लेखी स्वरुपात व दस्ताऐवजांसह नोंदवावा. अन्यथा माझे अशील खरेदीखतान्वये सौदा पूर्ण करतील व त्यानंतर कुणाचाही उजर चालणार नाही.

**दिनांक ०६/०७/२०२५**

**स्वाक्षरी/-**
**व्ही.पी.देशमुख, ॲडव्होकेट**
**प्रजक्ता लेआऊट, शिवार्पण कॉलनी,**
**व्ही.एम.व्ही.रोड, अमरावती**
**ता.जि.अमरावती - ४४४ ६०४**
**मो.-९९७०३५६१२०**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१२७१/२०२५
श्रीमती कांचन अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.२८.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : १. श्रीमती कांचन संजय मुळे, वय ४५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. ऋतुजा संजयराव मुळे, वय २३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३. यश संजय मुळे, वय १९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
१ ते ३ रा.बारीपुरा, नांदगांव पेठ, ता, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **संजय मधुकरराव मुळे** हे दिनांक 15.08.2023 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **कांचन अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कांचन अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३०४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**जाहीरात**

नगर परिषद अचलपूर अंतर्गत द्वारा संचालित न.प.उर्दु उच्च माध्यमिक विद्यालय, परतवाडा (स्वयं अर्थसहायीत) करीता घड्याळी तासिका तत्वावर कार्य करण्यात इच्छुक उमेदवारांकडून शैक्षणिक सत्र २०२५-२६ करीता अर्ज दिनांक ०९/०७/२०२५ ते ११/०७/२०२५ ला सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहे. पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

| अ. क्र. | माध्यम | शैक्षणिक पात्रता | व्यावसायिक पात्रता | घड्याळी तत्वावर | एकुण जागा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | उर्दु | M.A.Urdu + M.A.English | B.Ed. | 300/- | 01 |
| ०२ | उर्दु | M.A.History + M.A.Political | B.Ed. | 300/- | 01 |
| ०३ | उर्दु | M.A.Geography + M.A.Sociology | B.Ed. | 300/- | 01 |

**अर्ज स्विकारण्याचा पत्ता** - आवक-जावक शाखा न.प.अचलपूर, जि.अमरावती
**मुलाखतीसाठी दिनांक** - १४/०७/२०२५
**स्थळ** - - नगर परिषद सभागृह, परतवाडा
**वेळ** - सकाळी ११.०० ते सायं.०५.०० वाजेपर्यंत

**अयाजोद्दीन अमिनोद्दीन सय्यद**
मुख्याध्यापक/प्राचार्य
न.प.उर्दु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (आर्टस), परतवाडा

शिक्का

**धिरज कुमार गोहाड**
मुख्याधिकारी,
न.प.अचलपूर

---

Shri Shivaji Education Society, Amravati
**Dr.Panjabrao Deshmukh College of Law, Morshi Road, Amravati**

**ADMISSION OPEN NOTICE**
**2025-2026**

**LL.M. 1st Sem - 2 Yrs. Degree Course**

**LL.M. (2 Yrs.) Eligibility Criteria :-**
**LL.B. Degree Course 3 Years / 5 Years Course successfully obtained from recognized university with 50 % marks in aggregate.**
(i) Seats for Admission are available in different specializations.

1. Criminal Law — 25 Seats
2. Constitutional & Admn.Law — 25 Seats
3. Business Law — 25 Seats
4. Corporate Law — 25 Seats
5. Human Rights — 25 Seats

**Note :** Candidate desirous of seeking admission may submit the application forms in college during working hours in between 10/07/2025 to 24/07/2025.

Procedure & detail information regarding admission forms and schedule is available on college website https://drpdclamt.org.

**Shri Harshavardhan P. Deshmukh,**
President
Shri Shivaji Education Society, Amravati.

**Dr.Varsha N.Deshmukh**
Principal,
Dr.Panjabrao Deshmukh College of Law, Amravati.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१२८५/२०२५
प्यारीबाई व ईतर -वि- निरंक
पुढील ता.१९.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : १. प्यारीबाई किसनलाल गुप्ता, वय ७७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. अंजुला संजय हिमाने, वय ५८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. संजू किसनलाल गुप्ता, वय ५६ वर्षे, व्यवसाय - व्यापार
नं.१ ते ३ रा.जुन्या मस्जिदच्या मागे, हमालपुरा, रुक्मिणीनगर, अमरावती
४. मनोज किसनलाल गुप्ता, वय ६२ वर्षे, व्यवसाय - डॉक्टर
रा.२७, जीवन छाया कॉलनी, रुक्मिणीनगर, अमरावती, ता.जि.अमरावती
५. मुकेश किसनलाल गुप्ता (मयत)
५-अ) ललिता मुकेश गुप्ता, वय ५० वर्षे, व्यवसाय - घरकाम
५-ब) गुंजन मुकेश गुप्ता, वय २६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
५-क) यश मुकेश गुप्ता, वय ३० वर्षे, व्यवसाय - व्यापार
नं.५अ ते ५क रा.हमालपुरा, न्यू रेल्वे स्टेशन, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **किसनलाल पर्वत गुप्ता** हे दिनांक 09.01.2011 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **प्यारीबाई किसनलाल गुप्ता व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्यारीबाई किसनलाल गुप्ता व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.११९५/२०२५
श्रीमती अन्नपुर्णा अधिक पाच -वि- निरंक
पुढील ता.०१.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Smt.Annapurna Mahadev Kale, Age 80 Yrs. Occu.: Household
2. Vinod Mahadeorao Kale, Age 47 Yrs. Occu.: Business
1 & 2 Both R/o. Near Bhagyashri Vidyalaya, Surabhi Colony, V.M.V. Amravati, Tq. Dist. Amravati
3. Rajendra Mahadeorao Kale, Age 53 Yrs. Occu.: Service
R/o. 27, Sapkal Layout, Jawahar Nagar, V.M.V. Amravati
4. Sheela Mahadeorao Kale
(After Marriage : Sheela Ramkrushan Kalbande)
Age 59 Yrs. Occu.: Retired
R/o. Ramanand Nagar, Near Podar School, Amravati.
5. Mangala Prakash Thakre, Age 56 Yrs. Occu.: Household
R/o. Bhakti Mandir, Kumbharwada, Amravati. Tq.Dist.Amravati
6. Kalpana Arvind Charhate, Age 47 Yrs. Occu.: Household
R/o. Yeoda, Tq.Daryapur, Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **महादेवराव दौलतराव काळे** हे दिनांक 04.09.2014 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **अन्नपुर्णा अधिक पाच विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अन्नपुर्णा अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्री.एस.एस.बिंगरदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१२२६/२०२५
श्रीमती रेखा -वि- निरंक
पुढील ता.०८.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Smt.Rekha Panjabrao Ingle,
Age 53 Yrs. Occu.: Housewife
R/o. Chandur Bazar Road at Naya Akola, Zopadpatti, Amravati, Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **पंजाबराव सुखदेवराव इंगळे** हे दिनांक 12.02.2025 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **रेखा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रेखा विरुध्द निरंक** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१२५३/२०२५
पद्मा व ईतर -वि- निरंक
पुढील ता.१८.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : १. पद्मा भविष्यकुमार बरडिया, वय ७० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.प्रभात रेसिडेन्सी, फ्लॅट नं.६, गांधी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
२. मोनिका निर्मल भंडारी, वय ३८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.देवरनकर नगर, बडनेरा रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
३. दिपीका नामितकुमार जैन, वय ३५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.बुधवारा चौक, नांदगांव खंडेश्वर, ता. नांदगांव खंडेश्वर , जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **भविष्यकुमार बन्सीलाल बरडिया** हे दिनांक 22.04.2025 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **पद्मा भविष्यकुमार बरडिया व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पद्मा भविष्यकुमार बरडिया व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### निवृत्तीवेतन नियमित चालू राहणार कोषागार कार्यालयाचे स्पष्टीकरण

**अमरावती-** निवृत्ती वेतन फॉर्म सादर केला नसल्यास निवृत्तीवेतन बंद होणार आहे, अशी अफवा समाजमाध्यमातून पसरविण्यात येत आहे. यात कोणतेही तथ्य नसून निवृत्तीवेतन नियमित सुरू राहणार आहे, असे स्पष्टीकरण जिल्हा कोषागार कार्यालयाने दिले आहे. व्हॉट्स ॲप आणि इतर प्रसार माध्यमातून निवृत्ती वेतन फॉर्म सादर केला नसल्यास माहे जुलैपासून निवृत्ती वेतन बंद होणार आहे, असे संदेश व्हॉट्स ॲप व इतर समाज माध्यमावर प्रसारीत होत आहेत. कोषागारामधून निवृत्ती वेतन स्विकारत असलेल्या राज्य शासनाच्या सर्व निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन धारकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये. निवृत्ती वेतन बंद करण्याबाबत शासनाकडून कोणत्याही सुचना कोषागारास प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना नियमित निवृत्ती वेतन चालू राहील. यासाठी कोषागार कार्यालयास भेट देण्याची गरज नाही. याची नोंद राज्य शासनाच्या सर्व निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन धाराकांनी घ्यावी, असे आवाहन कोषागार अधिकारी अमोल इखे यांनी केले आहे.



### 'एक पेड मा के नाम' अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम

खल्लार- छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पूर्णा येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला.पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या मोहिमे अंतर्गत 'एक पेड माँ के 'नाम यशस्वी करण्याकरिता निर्देशित केल्याप्रमाणे आणि मुख्यमंत्र्यांनी केलेल्या आव्हाना प्रमाणे तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे वृक्ष लागवड अभियाना अंतर्गत राबविण्याचे सूचित केले आहे.तसेच माजी मंत्री. बच्चु कडू यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयामध्ये जांभूळ, बकुळी, आंबा,कडुलिंब, पेरू,आवळा, कवट इ. प्रकारचे वृक्ष लावण्यात आले.प्राचार्य डॉ. रविंद्र इचे यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे उद्‌घाटन पार पडले. यावेळी महाविद्यालयातील डॉ. भारत कल्याणकर,डॉ. हरीष काळे, डॉ.प्रविण सदार, प्रा.विपिन लिल्हारे, सौ.मुक्ता निंभोरकर, जयश्री खंडारे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.आशिष काळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुवर्णा जवंजाळ, रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका प्राध्यापक, यांच्या हस्ते एक एक वृक्ष आले. एक पेड माँ के नाम वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी अथक परिश्रम घेऊन वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

### अंजनगाव बारी येथे आषाढी एकादशी उत्साहात

**अंजनगाव बारी-** दरवर्षी प्रमाणे यंदाही अंजनगाव बारी येथील 'विठ्ठल रखुमाई मंदीरात' आषाढी एकादशीचा कार्यक्रम अती उत्साहाने साजरा करण्यात आला. सर्वप्रथम सकाळी देवेंद्र कदम यांनी पत्नी वंदना कदम यांच्या हस्ते विठ्ठल रखुमाई मुर्तीचे पुजन करण्यात आले.गावातील सर्व पुरुष-भजन मंडळींनी भजनाच्या माध्यमातून विठ्ठल दर्शन घडविले.अखील भारतीय वारकरी भजन मंडळ यांनी गोपाळकाल्याचे भजन गुणवंत शेलोकार, नारायण न्यायखोरे, रुपराव तलमले, माणिक इंगोले, सुधाकर तलमले, महादेव सैरपगारे, मारोतराव भुरे,आकाश इंगोले, किसनराव गडलिंग, बबलू राठोड, श्रीकृष्ण सैरीसे, भारत श्रीखंड,अवधूत खडसे, प्रसाद किंदरले, प्रमोद जुमळे , विनायक बावनकार, आदी वारकऱ्यांनी सहभाग घेतला.

# 'शिवटेकडी हिरवे स्वप्न साकारते'-आयुक्त

## शिवटेकडीच्या विकासकामांची आयुक्तांकडून पाहणी

**अमरावती/का.प्र**

महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शिवटेकडी परिसराची पाहणी केली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केले. या पाहणीवेळी माजी गटनेते दिनेश बुब यांच्यासह सध्या सुरू असलेल्या कामांवर सविस्तर चर्चा झाली.

शिवटेकडी परिसरात महापालिकेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण, शिवसृष्टी निर्मिती आणि विविध सौंदर्यीकरण कामे झाली आहेत. या कामांची प्रगती तपासण्यासाठी आयुक्तांनी थेट भेट देत स्थलदर्शन केले. यावेळी त्यांनी परिसरात नव्याने वृक्षारोपणासाठी योग्य जागा शोधण्यावर भर देत नियोजनात्मक दृष्टिकोनातून सूचना दिल्या. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, 'पूर्वी टेकडीवरील वृक्षसंवर्धनाची स्थिती अत्यंत दुबळी होती. मात्र नागरिकांच्या सहकार्याने आज ही टेकडी हिरवळीत नटलेली आहे आणि



शिवसृष्टीमुळे ही जागा भविष्यातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ ठरणार आहे.'

१ते ३१ जुलै २०२५ दरम्यान राबविण्यात येणाऱ्या या अभियानाच्या यशासाठी नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नितीन बोबडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, उपअभियंता प्रमोद इंगोले, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, अभियंता दिनेश हंबर्डे, निरीक्षक श्रीकांत गिरी, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, कुंदन हडाले, मोहित जाधव, मनीष नकवाल, निलेश तंबोले, मिथुन वाघमारे, राजेश वानखडे, राजेश पिदडी यांच्यासह अनेक मनपा कर्मचारी उपस्थित होते.

### श्याम देशपांडे ग्रंथसखा पुरस्कार

## अभिजित जोंधळे यांना जाहीर

**छत्रपती संभाजीनगर-** येथील 'संडे क्लब' आणि देशपांडे परिवाराच्या वतीने दिल्या जाणाऱ्या 'श्याम देशपांडे ग्रंथसखा पुरस्कारासाठी अभिजित जोंधळे यांची निवड करण्यात आली आहे.



वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आयुष्यभर निरपेक्षपणे कार्यरत राहिलेल्या श्याम देशपांडे यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो. अकरा हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून त्याचे वितरण ३ ऑगस्टला केले जाईल. अभिजित जोंधळे हे अंबाजोगाईत अनुराग पुस्तकालय चालवतात. त्यांनी गेली दहा वर्षे' पुस्तकपेटा' हा अभिनव उपक्रम राबवला आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना वाचनीय पुस्तके उपलब्ध होत आहेत. गेल्या दहा वर्षात किमान १५ हजार विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ झाला आहे.श्याम देशपांडे ग्रंथसखा पुरस्काराचे यंदा चवथे वर्ष आहे. यापूर्वी मिर्झा अब्दुल कय्युम नदवी (छ. संभाजीनगर) जीवन इंगळे (खटाव, जि. सातारा) आणि मोहिनी कारंडे (पुणे) यांना हा पुरस्कार दिला गेला.

# तिवसा-मोझरी थांबा असतानाही 'लालपरी' थांबेना

## प्रवाशांमध्ये संतापाची लाट; परिवहन विभागाने दखल घेण्याची मागणी

**तिवसा/वार्ताहर**

ग्रामीण भागापासून तर शहरी भागापर्यंत धावणाऱ्या एस टी महामंडळाच्या 'लालपरी' ने पूर्वी थांबा असणाऱ्या महत्वाच्या ठिकाणी अचानक लालपरी थांबत नसल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील महत्वाचे ठिकाण असलेल्या श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरी व तालुका ठिकाण असलेल्या तिवसा या ठिकाणच्या नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.



अमरावतीवरून नागपूरकडे जाणारी एसटी महामंडळाची प्रत्येक बस ही श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरी व तिवसा याठिकाणी थांबत होती. गुरुकुंज मोझरी आश्रम हे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यभूमी आहे, हे ठिकाण म्हणजे शिक्षणाचे माहेरघर आहे. वैद्यकीय अभ्यासक्रम असलेला BAMS कॉलेज, अध्यापक विद्यालय D A D कॉलेज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाधीस्थळ, आश्रमिय परिसर, दासटेकडी,आय टी आय कॉलेज, आयुर्वेद रुग्णालय असे सर्व महत्वाचे कॉलेज, स्थळ व येथील नोकरदार, कर्मचारी वर्ग असल्याने याठिकाणचे महत्व लक्ष्यात घेता येथे नागपूर वरून अमरावती व अमरावती वरून नागपूर जाणारी प्रत्येक एस टी बस थांबायची व तसे सुचनाफलक देखील अमरावती बस स्थानकावर दर्शनी भागावर लावण्यात आले होते तर तिवसा हे तालुका मुख्यालय असल्याने याठिकाणी सुद्धा शासकीय कार्यालये व कर्मचारी,विद्यार्थी संख्या लक्षात घेता याठिकाणी सुद्धा लालपरी थांबायची मात्र आता कालांतराने एस टी महामंडळाच्या अनेक लालपरीचे चालक-वाहक हे सरळ-सरळ लालपरी थांबत नसल्याचे सांगत वादाला पेव फोडत आहे.

मोठ्या प्रमाणात विद्यार्थी संख्या, कर्मचारी, शिक्षक, डॉक्टर, व्यावसायिक, नोकरदार यांचा दैनंदिन प्रवास व यातून एसटी महामंडळ विभागाला मिळणारे उत्पन्न या दोन्ही गोष्टी लक्षात घेता गुरुकुंज मोझरी व तिवसा या दोन्ही ठिकाणी लालपरी ला थांबा देण्यात यावा,अशी मागणी प्रवासी जनतेकडून केल्या जात आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढविण्यात यावी

## संविधान सन्मान परिषदचे नगरपालिकेला निवेदन

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर शहरातील जुनी नगर परिषद समोरील संविधान चौकातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढविण्यात यावी यासाठी नुकतेच संविधान सन्मान परिषदेच्या वतीने नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.



दर्यापूर शहरातील समस्त आंबेडकरवादी आणि आंबेडकर प्रेमींचे प्रेरणास्थान असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क चे सुशोभिकरण करण्यात आले. हि चांगली बाब आहे मात्र हे करत असतांना आभाळा येवढे अफाट कार्य कर्तुवाची उंची असलेल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याकडे मात्र दुर्लक्ष होवून पुतळ्याची उंची खुपच कमी झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मध्ये अभिवादन करण्यास येणाऱ्या त्यांच्या अनुयांनमध्ये प्रर्कषाने हि खटकणारी बाब असल्याचे निर्दशनास येत आहे. परिणामी नगर परिषद प्रशासनाबद्दल तिव्र संताप आणि नाराजीचा सुर पसरत आहे. त्यामुळे या गंभीर बाबीची तात्काळ नगरपालिकेने दखल घेऊन व यावर तातडीने निर्णय घेवून पुतळ्याला आधि सारखे वैभव प्राप्त होण्यासाठी पुतळ्याची उंची वाढविण्यात यावी अशी मागणी संविधान सन्मान परिषद दर्यापूरच्या वतीने निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी संविधान सन्मान परिषदेचे अनिरुद्ध वानखडे, रोशन वानखडे, तेजस नितनवरे, प्रेम इंगळे,भैय्या वाकोडे, दीप वानखडे,उज्वल वर्धे,सुप्रीत राऊत व आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.

# आकाश वानखडे अकॅडमीकडून गुणवंत विद्यार्थ्यांना लॅपटॉप भेट व पालकसभा

**अमरावती/का.प्र.**

नुकत्याच लागलेल्या बारावी सायन्स व एमएचटीसीइटीच्या निकाल मध्ये राठी नगर स्थित आकाश वानखडे अकॅडमी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे व त्या अनुषंगाने अकॅडमी तर्फे शेगाव नाका स्थित अभियंता भवन येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पाडण्यात आला. या सत्कार सोहळ्यामध्ये ६० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा पालकांसोबत सत्कार करण्यात आला. तसेच जे विद्यार्थी आता अकरावी आणि बारावीत शिकत आहे त्यांची पालक सभा सुद्धा आयोजित करण्यात आली होती. एमएसटीसीइटीच्या निकालात पीसीएम ग्रुप मध्ये ९९.४१ पर्सेंटाइल गुण घेऊन अमेय उमप हा विद्यार्थी प्रथम आला तसेच त्याला बारावी बोर्ड परीक्षेमध्ये ८७% गुण मिळाले




आहे त्याबद्दल त्याला लॅपटॉप भेट देण्यात आला आहे व गौरी माहोरे हिला PCB CET 98% ke PCM CET 94% गुण मिळाले व हिला सुद्धा लॅपटॉप भेट देण्यात आला . इतर गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी ऋतिक ससाने पीसीबी ९८% पीसीएम ९५% श्रवण गांजरे पीसीएम ९८% सर्वेश काळे पीसीएम ९६% सुधांशू राऊत पीसीएम ९६% प्रथमेश रायकर पीसीएम ९६% अमित शिंगणे पीसीएम ९५% ईश्वरी शेगोकार पीसीबी ९४% पीसीएम ९१% तसेच यावर्षी बारावी सायन्सच्या निकालात अकॅडमी मधून ३५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ७५% पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत आणि एमएचटी-सीईटी च्या निकालामध्ये ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पीसीएम किंवा पीसीबी ग्रुप मध्ये ९० परसेंटाइल च्या वर गुण मिळालेले आहेत. तसेच पुढील प्रवेशा साठी विद्यार्थ्यांचे पीसीएम व पीसीबी ग्रुपचे पर्सेंटाइल विचारात घेतात. एका विषयाच्या पर्सेंटाइलवर पुढील प्रवेश मिळत नाही याची दखल पालकांनी घ्यावी असे आवाहन अकॅडमी तर्फे करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचे श्रेय हे अकॅडमी मधील आकाश वानखडे, ऋषिकेश मदनकर, राहुल जाधव व आनंद दरणे, शुभम व पालकांना दिले. तसेच अकॅडमीमध्ये अकरावी सायन्सच्या बॅचेस ला प्रवेश देणे सुरू आहे व विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन अकॅडमी तर्फे करण्यात आले आहे.

# अंडरपास परिसराची उपायुक्तांकडून पाहणी

**अमरावती/का.प्र.**

राजापेठ अंडरपास परिसरात पावसामुळे साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेत अमरावती महानगरपालिकेच्या उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित अभियंत्यांना तत्काळ उपाययोजना राबविण्याचे आदेश दिले. पाणी निचरा करण्यासाठी आवश्यक ते पंपिंग यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यास सांगितले तसेच भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची आखणी करण्याचे निर्देश दिले. राजापेठ अंडरपास परिसर हा वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असून पाणी साचल्यामुळे नागरिक आणि वाहनचालकांना अडथळ्यांना सामोरे जावे लागत होते. उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांच्या त्वरित हस्तक्षेपामुळे नागरीकांत समाधानाचे वातावरण आहे.महानगरपालिकेच्या संबंधित विभागांनी नियमित पातळीवर देखभाल करून पावसाळ्यातील समस्या लवकरात लवकर दूर करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.यावेळी उपअभियंता प्रमोद इंगोले, मंगेश कडू उपस्थित होते.



# रोटरी क्लबचा पदग्रहण समारंभ उत्साहात

## अध्यक्षपदी गौरव बंसल तर सचिवपदी ऋषी शाह



**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर-परतवाडा जुळया शहरात सामाजिक कार्यात सदैव तत्पर असणारी रोटरी क्लब अचलपूर या संस्थेचा पदग्रहण सोहळा स्थानिक गुलाब बाग येथे पार पडली.यावेळी नवनियुक्त अध्यक्ष गौरव बंसल व सचिवपदी ऋषी शाह यांनी पदभार स्वीकारला.यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव,रोटरी क्लबचे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर निखिलेश त्रिवेदी, तहसीलदार संजय गरकल, अभिनंदन बँकेचे अध्यक्ष विजय बोथरा, डॉ.जुगल चेरनिया, नंदू शेकोकार, निलेश पडतानी, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष राम ककरानिया आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी रोटरी क्लबचे नवनियुक्त अध्यक्ष गौरव बंसल यांनी रोटरी क्लब तर्फे जुळया शहरात गेल्या अनेक वर्षापासून राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमाची माहिती दिली आणि यापुढेही राबविण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रमाची माहिती दिली. अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव,तहसीलदार संजय गरकल यांनी आपल्या भाषणात रोटरी क्लबच्या कार्याची कौतुक केले. यावेळी रोटरी क्लबच्या या नवीन कार्यकारिणीतील सहसचिव परेश भंसाली, राम ककरानिया, श्याम मालू, कैलाश खंडेलवाल, आकाश भंसाली, विवेक लष्करी, कमल केजडीवाल, महेंद्र राठी, पंकज गुप्ता, मुकेश चौधरी, पंकज अग्रवाल, राजेंद्र भंसाली यांचा समावेश आहे. संचालन डॉ. प्रीती खोजरे यांनी केले. रोटरी क्लबमध्ये नवीन सदस्य म्हणून सारांश चौहान, मनीष सोनी, डॉ.निखिल गोतमारे, डॉ.श्रेयस कीटुकले, डॉ.वैभव बरडीया, संदीप गुप्ता आश्लेष लोढ़े, आदेश बरडीया यांचा समावेश आहे. यावेळी कमल बंसल, घनश्याम शाह, धर्मेन्द्र जैन, सर्वेश अग्रवाल, परेश भंसाली, राजभाऊ महाजन, राजेश अग्रवाल, पंकज शर्मा आदी उपस्थित होते.

# प्रत्येक शेतकऱ्यांना शेतकरी गटाला जोडणार-जिल्हाधिकारी

**अमरावती/का.प्र.**

शेतीची उत्पादकता वाढवून उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होणे गरजेचे आहे. राज्यभरात शेतीमध्ये होत असलेले विविध प्रयोग आणि त्यातून वाढलेली उत्पादकता याचा जिल्ह्यात प्रसार होणे आवश्यक आहे. यासाठी महिला बचत गटाप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्यांना जोडण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

## कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांचा गौरव

कृषी विभागाच्या वतीने राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत उत्पादकता वाढीसाठी कार्यशाळा आणि शेतकऱ्यांचा गौरव कार्यक्रम नियोजन भवनात घेण्यात आला. यावेळी कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, रेशिम उपसंचालक महेंद्र ढवळे आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची पूर्ण जबाबदारी कृषी विभागावर आहे. आज शेतीवर ५० टक्के लोकसंख्या अवलंबून असताना केवळ १५ टक्के शेतीतून उत्पादन होत आहे. हे उत्पादन वाढीसाठी विविध तंत्रज्ञान आणि प्रयोग करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी बाजारपेठेचा अभ्यास करून त्यानुसार पिक निवडणे गरजेचे आहे. शेतीचा लागवड खर्च वाढत असताना आर्द्रता पाहून फवारणी केल्यास ३० टक्के औषधांची बचत होत असल्याने या तंत्राचा उपयोग होणे गरजेचे आहे.



शेतीमध्ये उत्कृष्ट कार्य करणारे अमित कुकडे, गौतम गेडाम, राजा तिडके, सुभाष तायडे, प्रवीण वैद्य, परशराम भिलावेकर, श्रावण धुर्वे, तोताराम भिलावेकर, स्वप्निल फुंडकर, ओंकार चव्हाण, गजानन गोजरे, संजय सरदार, विनय बोथरा, देविदास ढोके, राहुल निमकर, तुषार माकोडे, शैलेंद्र देशमुख, रूपाली ठाकरे, अतुल खरबडे, प्रफुल सांबरतोडे, सुखराम धुर्वे, सुशील काकडे, ललिता महाजन, निलेश कुरवाडे, अभिषेक आसोले, सहायक कृषी अधिकारी सतीश निमकर, सुनील हर्ले, विनोद बोंडे, ज्योती ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विनय बोथरा यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच अहिल्यानगर येथील राहुल रसाळ यांनी आधुनिक शेती पद्धतीबाबत दूरदृष्यप्रणालीद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी नवीन पिकविमा योनजेच्या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले.सातपुते यांनी प्रास्ताविक केले.

## सातबारा कोरा आंदोलनास शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद

# संतप्त शेतकऱ्यांनी भाजपचे झेंडे पेरून सरकारविरोधात दिल्या घोषणा

## शेतकऱ्यांचा सरकारला तीव्र इशारा





**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या 'सातबारा कोरा कोरा' आंदोलनाला ग्रामीण भागात शेतकऱ्यांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. अमरावती जिल्ह्यातील पापळ गावातून या आंदोलनाची सुरुवात करण्यात आली असून, पहिल्याच दिवशी शेकडो शेतकरी रस्त्यावर उतरून सरकारविरोधात घोषणाबाजी करताना दिसले. या आंदोलनाचे केंद्रबिंदू ठरलेल्या सुकळी येथील शेतकरी प्रकाश चौधरी यांनी सरकारविरोधातील आपला रोष भाजपचे झेंडे पेरून व्यक्त केला. 'सरकारने ☞(पान २ वर)

# शहरात घातक शस्त्रसाठा जप्त - दोघांना अटक, दोन फरार

## ६ तलवारी, ११ चायना चाकू, कोयता जप्त



### गुन्हे शाखेची गवळीपुरा येथे कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गवळीपुरा भागात अवैधरित्या साठवून ठेवलेला धोकादायक शस्त्रसाठा उघडकीस आला आहे. गुन्हे शाखेच्या युनिट-२ पथकाने मंगळवारी दुपारी तीन वेगवेगळ्या घरांवर एकाचवेळी छापे टाकून तब्बल १.३० लाखांचा घातक शस्त्रसाठा हस्तगत केला. या कारवाईत ६ धारदार तलवारी (कोयते), ११ चायना बनावटीचे चाकू आणि १ मोठे धारदार शस्त्र पोलिसांनी जप्त केलं असून, यासोबत एक वाहनही ताब्यात घेण्यात आलं आहे.

या प्रकरणात गुलवेज ऊर्फ गोलू अहमद नुर अहमद (वय २५, बडनेरा) व शेख नाजिम ऊर्फ हुंगा (वय ३२, गवळीपुरा) यांना अटक करण्यात आला. बाबा ऊर्फ शेख जमीर व शेख समीर हे दोन संशयित फरार आहेत. त्यांचा ☞(पान २ वर)

# अंजनगांव मार्गावर सावळी दातूरा नजीक भीषण अपघात

## युवा व्यावसायिक अश्विन अग्रवाल यांचा घटनास्थळी मृत्यू





**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा ते अंजनगांव मार्गावरील सावळी दातुरा जवळ आज दि.८ जुलै रोजी दोन दुचाकीच्या धडकेत भीषण अपघात झाला. यात परतवाडा शहरातील युवा व्यवसायीक अश्विन शरदकुमार अग्रवाल यांना गंभीर दुखापत होऊन घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.

परतवाडा शहरातील बैतुल मार्गावर असणाऱ्या जिनींग फैक्टरी व ऑईलमिल व्यवसायींक अश्विन शरदकुमार अग्रवाल हे एक हसमुख ,मनमिळावू व्यक्तीमत्व म्हणून परिचित होते.प्रत्येकाशी सौजन्यशिल वागणूक, सामाजिक, धार्मिक कार्यात सहभाग असणारे अश्विन अग्रवाल आज आपल्या व्यवसायीक कामानिमित्त वेअरहाऊसकडे जात असतांना भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकी वाहन चालकाने त्यांना धडक दिली. त्यात मानेला गंभीर दुखापत होऊन अत्याधीक रक्तस्त्राव झाल्याने घटनास्थळीच मृत्यु झाला. ते आपल्या मागे पत्नी, दोन मुले असा आप्त परिवार सोडून गेले आहेत. परतवाडा शहरातील व्यवसायीक क्षेत्रात शोक संवेदना व्यक्त केल्या जात आहे. मृतक अश्विन अग्रवाल यांचे अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन केले जाणार आहे. परतवाडा - अंजनगांव मार्गावर सावळी दातूरा ते हनवतखेडा ☞(पान २ वर)

# रस्ते अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करा

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात पोलिसांनी १०० अपघाताची स्थळे निश्चित केली आहेत. या ठिकाणांची यंत्रणांनी संयुक्त पाहणी करावी. तसेच याठिकाणी अपघात होऊ नये, यासाठी कायमस्वरूप उपाययोजना करावीत, यासाठी आवश्यक असणारा निधी देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा रस्ते सुरक्षा विषयक बैठक घेण्यात आली. यावेळी अधिक्षक अभियंता रूपा गिरासे, प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, कार्यकारी अभियंता गिरी आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी महामार्ग यांच्यासह दुर्गम मेळघाटातील अरूंद रस्त्यांवरील अपघात रोखणे आव्हान आहे. त्याचबरोबर जिल्हा आणि तालुका मुख्यालयातील अपघाताचे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. यासाठी प्रादेशिक परिवहन, पोलिस आणि बांधकाम विभागाने एकत्रितरित्या उपाययोजना सुचविणे आणि त्यावर कार्य करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या गतीमुळे होणाऱ्या अपघातांवर उपाययोजना होणे आवश्यक आहे. यासाठी स्पीडगनचा सक्षमपणे उपयोग व्हावा. पावसाळ्यात रस्त्यांच्या दुतर्फा येणाऱ्या झाडांच्या फांद्या कापून रस्त्यांवरील दृष्यमानता खुली करावी. वन क्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्यांवर ही समस्या येत असल्याने बांधकाम विभागाने कार्यवाही करावी. यामुळे समोरील येणारे वाहन दिसण्यास मदत होईल. मेळघाटात अपघात झाल्यास याठिकाणी क्रेन आणि टोईंग वाहन येण्यास उशिर लागत ☞(पान २ वर)

# मेडिकल कौन्सिल नोंदणीचा तो निर्णय धोकादायक

## इंडियन मेडिकल असोसिएशनचा विरोध




**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाने १५ जुलै २०२५ पासून एक आदेश लागू करत ज्या होमिओपॅथी डॉक्टरांनी फार्माकोलॉजी या विषयात एक वर्षाचा ब्रीज कोर्स केला आहे, अशा डॉक्टरांची नोंदणी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल च्या स्वतंत्र रजिस्टर मध्ये करण्यात यावी असा निर्णय जारी केला आहे. हा निर्णय अत्यंत धोकादायक असून जनतेच्या आरोग्याशी थेट खेळणारा आहे. त्यामुळे हा निर्णय लवकरात लवकर रद्द करण्याच्या मागणीसाठी आज मंगळवार ८ जुलै रोजी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने करण्यात आले.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हा एक वर्षाचा ब्रिज कोर्स आहे जो होमिओपॅथी डॉक्टरांसाठी आणण्यात आलेला आहे. या कोर्समध्ये अत्यल्प प्रमाणात फार्माकॉलॉजी मेडिसिन याचे प्राथमिक ज्ञान दिले जाते. हा कोर्स कोणत्याही प्रकारे एमबीबीएस सरासरीच्या ५.५ वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या तुल्य नाही. जर ☞(पान २ वर)

# अंजनगावात अवैध गर्भपात केंद्रावर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अंजनगाव मध्ये चालणाऱ्या अवैध गर्भपात केंद्रावर जिल्हा व तहसील विभागाच्या पथकाने धाड टाकून औषधी व इतर साहित्य जप्त केले. अवैध केंद्र चालवणाऱ्या डॉ. युवराज पाटील (वय ४८) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

माहितीनुसार शहरात संजीवनी व नर्सिंग हॉस्पिटल आहे. या हॉस्पिटल वर सोमवारच्या सायंकाळी वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नालाट यांच्या माहितीनुसार धाड टाकण्यात आली. रुग्णालयाच्या तपासणी दरम्यान लक्षात आले की डॉ.युवराज पाटील यांच्या जवळ कोणतीही आवश्यक कागदपत्र नाही ,तर त्यांनी रुग्णालयाची नोंदणी पण केली नव्हती. नोंदणी न करता येथे अवैध गर्भपात केला जात होता. डॉक्टर जवळ शैक्षणिक अहर्ता व मान्यता प्राप्त कागदपत्रही नव्हते. कोणतेही प्रमाणपत्र तपासणी दरम्यान डॉ.पाटील यांनी उपलब्ध करून दिले नाही. रुग्णालयात करण्यात आलेल्या गर्भपातचे ☞(पान २ वर)

# पीआर कार्डसाठी लोटांगण आंदोलन

## गडगडेश्वर येथील नागरिक धडकले मनपावर



**अमरावती/प्रतिनिधीः-** गडगडेश्वर प्रभागमध्ये राहणाऱ्या नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. वेळोवेळी निवेदन देऊनही प्रशासनाने कोणताही निर्णय घेतला नाही. यामुळे संतापलेल्या नागरिकांनी प्रभाकर वाळसे यांच्या नेतृत्वात महानगरपालिकेवर लोटांगण आंदोलन केले. मनपा आयुक्त सोम्या शर्मा यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गडगडेश्वर प्रभागमध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. यामुळे येथे सफाई अभियान राबविण्याची गरज आहे. शेकडो वर्षापासून परिसरात रहिवासी असणा-या माता खिडकी, हनुमान नगर, गांधी आश्रम, आनंद नगर, औरंगपुरा परिसरातील नागरिकांना पीआर कार्ड देण्यात यावे. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे पुतळ्याचा प्रश्न उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्यायालयीन प्रक्रियेमध्ये ☞(पान २ वर)

# नोकरीचे आमिष दाखवून सहा जणांना ८४ लाखाने गंडविले

## बनावट कॉल लेटर,ओळखपत्रं; नागपुरीगेट पोलिसात गुन्हा दाखल




**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑर्डनन्स फॅक्टरीत नोकरी लावून देतो असे सांगत दोन ठगांनी अमरावती आणि नागपूर येथील सहा युवकांकडून तब्बल ८४ लाख रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी हाफिज खान भुरे खान पठाण (रा. सुफियान नगर, लालखडी) आणि मोसिन खान (रा. अमरावती) यांच्याविरोधात नागपुरीगेट पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. धामणगाव रेल्वे येथील अंकुश सुरेशराव मुटकुरे (वय ३०) याला नोकरीची गरज होती. त्याने त्याच्या जावायामार्फत प्रमोद पोकळे या ओळखीच्या व्यक्तीकडे मदत मागितली. प्रमोदने त्याला सांगितले की, एक ओळखीचा माणूस (हाफिज खान) याच्या संरक्षण मंत्रालयात ओळखीने नोकरी लावून देतो. हाफिजने अंकुशला नागपूरच्या ऑर्डनन्स फॅक्टरीत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत एकूण १८ लाख रुपयांची मागणी केली. त्यानुसार, अंकुशने हाफिजला टप्प्याटप्प्याने ६ लाख, ६ लाख आणि नंतर ४ लाख रुपये ☞(पान २ वर)

# उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी केली ऑक्सिजन पार्कची पाहणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रभाग क्रमांक ८ येथील जोग स्टेडियम शेजारील ऑक्सिजन पार्क परिसराची पाहणी महानगरपालिका उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी आज केली. पाहणी दरम्यान परिसरात साचलेल्या कचऱ्याची दखल घेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कारवाईचे निर्देश दिले. या ठिकाणचा कचरा तात्काळ उचलून तेथील बांधकाम मटेरियल जेसीबीच्या साहाय्याने समतल (लेव्हल) करण्यात यावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. यासाठी अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. यावेळी स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार उपस्थित होते.

# गुजरात क्रांती भवनमध्ये बॉम्ब असल्याचा फोन

## पोलीस विभागात खळबळ



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील टॉकीज आणि वसंत चौकातील बस मध्ये बॉम्ब असल्याचा फोन कॉल सोमवारच्या सायंकाळी आल्याने खळबळ उडाली होती तर आज मंगळवारी ८ जुलैला दुसऱ्या दिवशी अज्ञात आरोपीने फोन करून हॉटेल गुजरात क्रांती भवन मध्ये बॉम्ब असल्याची माहिती दिली. यामुळे पोलीस विभागाची डोकेदुखी वाढली आणि त्यांनी घटनास्थळावर जाऊन तपासणी केली. तपासणी दरम्यान हा फोन कॉलही फेक असल्याचे पोलिसांना समजले. पोलिसांनी संपूर्ण परिसर पिंजून काढला पण त्यांच्या हाती काही लागले नाही. माहितीनुसार मंगळवारी दुपारी बारा वाजताच्या सुमारास राठोड नावाच्या इसमाने पोलीस कंट्रोल रूम मध्ये फोन करून सरोज टॉकीज जवळील हॉटेल गुजरात क्रांती भवन मध्ये बॉम्ब असल्याची माहिती दिली. या बॉम्बचा केव्हाही विस्फोट होऊ शकते असेही त्याने सांगितले. माहिती मिळाल्यावर पोलीस बॉम्ब शोधक व डॉग स्कॉटसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संपूर्ण परिसरात ☞(पान २ वर)

# तळवेल ते जवळा रस्ता चिखलमय,नागरिक त्रस्त



**टाकरखेडा संभू / प्रतिनिधीः-** चांदुरबाजार तालुक्यातील तळवेल ते जवळा जिल्हा परिषद शाळेच्या पूर्वेकडील रस्ता सध्या अतिशय वाईट स्थितीत असून नागरिकांचे हाल सुरु आहेत. सततच्या पावसामुळे गुडघ्याएवढा गारा व चिखल साचल्यामुळे संपूर्ण रस्ता चिखलमय झाला आहे. सदरील रस्त्यावरून कोणतीही वाहने-दुचाकी किंवा चारचाकी चालवणे अशक्य झाले आहे. नागरिकांना पायदळ येणे-जाणेदेखील अशक्य झाले असून, अत्यंत जीवघेणा रस्ता बनला आहे. या परिस्थितीमुळे दळणवळण पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

गावातील शाळेच्या दिशेने जाणारा रस्ता देखील चिखलाने भरलेला असून, विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचणे ☞(पान २ वर)

# नांदगाव तालुक्यात शेतकऱ्यांची प्रथम पसंती सोयाबीनलाच

## -खरिपातील ९७ टक्के पेरणी पूर्ण



नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- तालुका कृषी विभागाच्या अहवालावरून नांदगाव तालुक्यात खरीपातील ९७ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. यावर्षी सुद्धा तालुक्यातील शेतकऱ्यांनी सोयाबीनलाच पेरणी क्षेत्रात प्रथम पसंती दर्शवली असून तुरीचे पेरणी क्षेत्र दुसऱ्या क्रमांकावर तर कापसाच्या पेरणी क्षेत्रात घट होऊन तिसऱ्या क्रमांकावर आहे. सतत तीन वर्षापासून सोयाबीनला भाव मिळत नाही ही शेतकऱ्यांची ओरड असून सुद्धा यावर्षी तालुक्यात ४६ हजार ९७० हेक्टरवर सोयाबीनचा पेरा झाला आहे. कमी दिवसात नगदी पैसा मिळवून देणारे पीक असल्याने पुन्हा शेतकरी यावर्षी सुद्धा सोयाबीन पिकाकडे मोठ्या प्रमाणात वळला असल्याचे दिसून येते. तालुक्यात तुरीचे क्षेत्रात विशेष वाढ नसून ९४३४ हेक्टर तुरीचे पेरणी क्षेत्र आहे. कापूस वेचणीला मजुरी देऊन सुद्धा मजूर मिळत नाही. शिवाय कापसाला मिळणारा भाव सुद्धा परवडत नसल्याने शेतकऱ्यांची कापूस पिकाबद्दल नाराजी असल्यामुळे कापसाच्या क्षेत्रात घट होऊन फक्त तालुक्यात ६६४४ हेक्टरवर कापसाचा पेरा आहे. कधी काळी नांदगाव तालुका मुगाच्या पिकासाठी अग्रेसर होता. परंतु जंगली जनावराचा वाढत्या त्रासाला कंटाळून मुंग व उडीद या पिकाच्या पेरणीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली असल्याने पेरणी क्षेत्रावरुन दिसून येते. तालुक्यात मुगाचे क्षेत्र फक्त २३ हेक्टर असून उडीदाचे पेरणी क्षेत्र ३४ हेक्टर आहे. तालुक्यात ७ जुलै पर्यंत १३७ मिली पावसाची नोंद झाली. पेरणीचा डाव सरळ पडला असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. पेरणी योग्य पाऊस झाल्याने ७ जुलै पर्यंत तालुक्यात ९७ टक्के पेरणी पूर्ण झाली.

**पीक निहाय पेरणी क्षेत्र**

| | | |
|---|---|---|
| सोयाबीन | ४६९७० | हेक्टर |
| तुर | ९४३४ | हेक्टर |
| कापूस | ६६४४ | हेक्टर |
| मुंग | २३ | हेक्टर |
| उडीद | ३४ | हेक्टर. |
| इतर | २०५ | हेक्टर |

# तरुणीवर लैंगिक अत्याचार

## आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल -पीडितेची प्रकृती खालावली



अमरावती/प्रतिनिधीः- गावाहून अमरावती शहरातील गोपालनगर येथे राहायला आलेल्या २५ वर्षीय तरुणीवर स्थानिक एका तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना ६ जुलै रोजी रात्री ७.३० वाजता घडली. या प्रकरणी पीडितेने ७ जुलै रोजी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनेनंतर पीडितेची तब्येत बिघडल्याने पोलिसांनी तिला उपचारासाठी इर्विन रुग्णालयात दाखल केले आहे. पीडितेने दिलेल्या माहितीनुसार, ती दोन महिन्यांपूर्वी गावाहून शहरात आली असून गोपालनगरमध्ये भाड्याच्या खोलीत एकटी राहत होती. तिच्या घरासमोरच आरोपी मयूर संतोष कराडे (वय २५, गोपालनगर, अमरावती) आपल्या मित्रासोबत राहत होता. ६ जुलैच्या रात्री पीडिता एकटी असताना मयूरने जबरदस्तीने घरात प्रवेश केला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. घटनेनंतर मानसिक व शारीरिक धक्क्यामुळे पीडिता पूर्णपणे कोसळली. ☞(पान २ वर)